




# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, मंगळवार २८ जूलै २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०







# लवकरच बाजारात येणार १०-२० च्या प्लास्टिक नोटा



- RBIच्या प्रस्तावाला केंद्राची मंजुरी
- देशभरात होणार फील्ड ट्रायल
- कागदी नोटा बंद होणार नाहीत

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** भविष्यात तुमच्या हातात १० किंवा २० ची प्लास्टिक (पालिमर) नोट आली, तर आश्चर्य वाटून घेउ नका. केंद्र सरकारने भारतीय रिझर्व्ह बँकेच्या प्रस्तावाला मंजुरी दिली असून, देशभरात १० आणि २० च्या पालिमर नोटांची फील्ड ट्रायल करण्यात येणार आहे. सरकारने स्पष्ट केले की, हा केवळ प्रायोगिक उपक्रम असून, सध्या चलनात असलेल्या कागदी नोटा बंद करण्याचा कोणताही निर्णय घेतलेला नाही. लोकसभेत एका लेखी उत्तरात केंद्रीय वित्त राज्यमंत्री पंकज चौधरी यांनी सांगितले की, RBIच्या प्रस्तावाला केंद्र सरकारने मंजुरी दिली आहे. या अंतर्गत १० आणि २० च्या पालिमर नोटा जारी करून भारतीय हवामान, वापर आणि व्यवहारांच्या परिस्थितीत त्यांची टिकाउपणा आणि कार्यक्षमता तपासली जाणार आहे.सरकारने स्पष्ट केले आहे की, सध्याच्या कागदी नोटा बंद करण्याचा कोणताही प्रस्ताव विचाराधीन नाही. पालिमर नोटा या विद्यमान कागदी नोटांसोबतच चलनात राहतील. फील्ड ट्रायल यशस्वी ठरल्यासच भविष्यात या नोटा मोठ्या प्रमाणावर जारी करण्याबाबत निर्णय घेतला जाईल.

**मोठ्या प्रमाणावर छापल्या जाणार पालिमर नोटा**

फील्ड ट्रायलसाठी RBI १० आणि २० च्या पालिमर नोटांची मोठ्या प्रमाणावर छपाई करणार आहे. या नोटा देशातील विविध भागांमध्ये व्यवहारासाठी वापरल्या जातील. विविध हवामान, दैनंदिन वापर आणि आर्थिक व्यवहारांमध्ये या नोटा किती टिकतात, याचा अभ्यास या चाचणीदरम्यान केला जाणार आहे. RBIच्या मते, पालिमर नोटा पारंपरिक कागदी नोटांपेक्षा अधिक काळ टिकतात. (पान २ वर)

## नेपाळमध्ये 200 व 500 रूपयांच्या भारतीय नोटांना परवानगी



***काठमांडू :*** नेपाळने भारतीय आणि नेपाळी नागरिकांना २०० आणि ५०० रुपयांच्या भारतीय नोटा देशात आणण्याची किंवा बाहेर नेण्याची परवानगी दिली आहे. यामुळे २०१६ च्या नोटाबंदीनंतर लागू असलेली आणि केवळ १०० रुपयांपर्यंतच्या नोटांना परवानगी देणारी जवळपास दशकभराची बंदी संपुष्टात आली आहे. नेपाळ राष्ट्र बँकेने गुरुवारी पुन्हा जारी केलेल्या एका सूचनेत म्हटले आहे की, विद्यमान नियमांनुसार भारतीय आणि नेपाळी नागरिक (पान २ वर)

# पवार गट थेट एनडीएत; राजकारणात खळबळ!

## सुप्रिया सुळे अमित शाहांच्या भेटीला



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**गेल्या काही दिवसांपासून शरद पवार यांची राष्ट्रवादी एनडीएमध्ये सामील होणार आहे, असे बोलले जात आहे. त्यासाठी पडद्यामागे मोठ्या हलाचाली सुरू आहेत, असं बोललं जातंय. विशेष म्हणजे एकीकडे ही चर्चा सुरू असताना दुसरीकडे राज्यातील भाजपा, शिंदे गट आणि शरद पवार यांच्या राष्ट्रवादीतील नेत्यांची दिल्लीवारी वाढलेली आहे. असतानाच आता राज्याच्या राजकारणात खळबळ उडवून देणारी माहिती समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार पवार गटाच्या नेत्या तथा खासदार सुप्रिया सुळे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाहांची भेट घेतली आहे. समोर आलेल्या माहितीनुसार सुप्रिया सुळे यांनी अमित शाहांची भेट घेतली आहे. या भेटीदरम्यान खासदार बजरंग सोनवणे हेदेखील सोबत होते. यावेळी सुप्रिया सुळे आणि अमित शाहा यांच्यात वेगवेगळ्या मुद्द्यांवर चर्चा झाली आहे. परंतु चर्चेचे मुद्दे नेमके कोणते होते, हे अद्याप समोर आलेले नाही. याआधी मोदी यांची भेट-सुप्रिया सुळे आणि खासदार शरद पवार यांनी याआधी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली होती. एकीकडे काकरोच जनता पार्टीचे आंदोलन सुरू असताना दुसरीकडे ही भेट घडून आली होती. या भेटीचीही तेव्हा सगळीकडे चर्चा झाली होती. त्यानंतर आता सुप्रिया सुळे यांनी अमित शाहांची भेट घेतली.

**दिल्लीतून संदेश आला, पवार एनडीएसोबत?-** दरम्यान, एकीकडे या घडामोडी घडत असताना दुसरीकडे दिल्लीतील भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांनी महाराष्ट्रातील भाजपा नेत्यांना संदेश पाठवल्याचे बोलले जात आहे. शरद पवार यांचा पक्ष एनडीएत सहभागी होणार आहे, त्यासाठी (पान २ वर)

## आसाममध्ये 68 जणांचा मृत्यू

**शिवसागर/वृत्तसंस्था :** आसाममध्ये निर्माण झालेल्या पूरपरिस्थितीमुळे, मृतांचा आकडा ६८ वर पोहोचला आहे. पाच जिल्ह्यांमध्ये ५२.४ लाखांहून अधिक लोक अजूनही पुराच्या तडाख्यात आहेत. आसाम राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने सांगितले की, चराईदेव, गोलाघाट, जोरहाट, नागाव आणि शिवसागर जिल्ह्यांमध्ये ५ लाखांहून अधिक लोक प्रभावित झाले आहेत.रविवारी रात्री उशिरा जारी केलेल्या बुलेटिनमध्ये म्हटले आहे की, गेल्या २४ तासांत चराईदेव जिल्ह्यात पुराच्या पाण्यात बुडून दोन जणांचा मृत्यू झाला असून त्यामुळे एकूण मृतांचा आकडा वाढला आहे. चराईदेव जिल्ह्याला सर्वाधिक फटका बसला (पान २ वर)

# सोनम वांगचुक हॉस्पिटलमधून डिस्चार्ज, राजघाटला पोहोचले

## बापूंना श्रद्धांजली वाहिली

### हिंसेने प्रकरण चिघळले असते, म्हणून वेळेआधी उपोषण संपवले



**गुरु ग्राम/वृत्तसंस्था :**सामाजिक आणि पर्यावरण कार्यकर्ते सोनम वांगचुक, ज्यांना गुरु ग्राम येथील मेदांता रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, त्यांना सोमवारी डिस्चार्ज देण्यात आला. दुपारी १:४५ वाजता डिस्चार्ज मिळाल्यानंतर, त्यांनी पत्नी डॉ. गीतांजली यांच्यासह दिल्लीतील राजघाटला भेट देउन महात्मा गांधींना आदरांजली वाहिली. माध्यमांशी बोलताना सोनम वांगचुक म्हणाले, 'मला देशाला सांगायचे आहे की, बापूंनी दाखवलेला मार्ग १०० वर्षांपूर्वी जितका योग्य आणि समर्पक होता, तितकाच तो आजही आहे. शांततापूर्ण आंदोलनामुळे आम्ही जिंकलो आहोत. जर हिंसाचार झाला असता, तर परिस्थिती आणखी बिघडली असती. म्हणूनच मी माझे उपोषण वेळेपूर्वीच संपवले.' लडाख आणि नीट पेपरफुटीशी संबंधित मुद्द्यांच्या निषेधार्थ वांगचुक दिल्लीतील जंतर मंतर येथे २६ दिवसांच्या (पान २ वर)

# भारताला कॉमनवेल्थ गेम्समध्ये पाचवे पदक

- ज्ञानेश्वरीने 199 किलो वजन उचलून रौप्य पदक जिंकले,
- वेटलिफ्टिंगमध्ये चौथे पदक मिळाले



**ग्लासगो/नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** भारताला कॉमनवेल्थ गेम्स २०२६ मध्ये पाचवे पदक मिळाले आहे. ज्ञानेश्वरी यादवने महिलांच्या ५३ किलो वेटलिफ्टिंग स्पर्धेत एकूण १९९ किलो (८८ किलो स्नॅच अ १११ किलो क्लीन अँड जर्क) वजन उचलून रौप्यपदक पटकावले. यासोबतच वेटलिफ्टिंगमधील भारताचे हे चौथे आणि एकूण पाचवे पदक ठरले. यापूर्वी रविवारी मीराबाई चानूने महिलांच्या ४८ किलो गटात १९० किलो (८५अ१०५) वजन उचलून भारताला या खेळांमधील पहिले सुवर्णपदक मिळवून दिले होते. चानूने सलग तिस-यांदा कामनवेल्थ गेम्सचे सुवर्णपदक जिंकले. यापूर्वी तिने २०१८ च्या गोल्ड कोस्ट आणि २०२२ च्या बर्मिंगहॅम गेम्समध्येही सुवर्णपदक जिंकले होते. २०१४ च्या ग्लासगो गेम्समध्ये तिने रौप्यपदक जिंकले होते. भारताला वेटलिफ्टिंगमध्ये आणखी दोन रौप्यपदकेही मिळाली आहेत. ऋषिकांत सिंगने पुरुषांच्या ६० किलो गटात २६४ किलोग्राम (१२१+१४३) वजन उचलून रौप्यपदक जिंकले, तर राजा मुथुपांडीने पुरुषांच्या ६५ किलो गटात २८६ किलोग्राम (पान २ वर)

## बिंद्यारानीचे राष्ट्रकुल स्पर्धेत सलग दुसरे पदक

ग्लास्को येथील राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत मणिपूरच्या बिंद्यारानी देवी सोरोखैबाम हिने वेटलिफ्टिंगमधील भारताचा दबदबा कायम राखला. महिलांच्या ५८ किलो वजनी गटात तिने एकूण १९९ किलो वजन उचलत कांस्य पदक पटकावले. २०२२ मध्ये बर्मिंगहॅम येथे झालेल्या स्पर्धेनंतर सलग दुस-या स्पर्धेत तिने देशासाठी पदकी कामगिरी करून दाखवली. याआधीच्या राष्ट्रकुल स्पर्धेत तिने ५५ किलो वजनी गटात रौप्य पदकाची कमाई केली होती. महिलांच्या ५८ किलो वजनी गटात नायजेरियन रिफियातू हिने स्नँचमध्ये १०३ आणि क्लीन अँण्ड जर्कमध्ये १२६ किलो असे एकूण २२९ किलो विक्रमी वजन उचलत सुवर्ण पदक पटकावले.




# लोकसभेत परीक्षा सुधारणा विधेयक सादर, आज चर्चा होउ शकली नाही

## विद्यार्थ्यांना मारहाणी प्रकरणावर चर्चेसाठी विरोधक ठाम; गोंधळामुळे सदन 4 वेळा स्थगित

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** सोमवारी लोकसभेत सार्वजनिक परीक्षा सुधारणा विधेयक सादर करण्यात आले. मात्र, विरोधी पक्षांच्या गदारोळामुळे चर्चा थांबली. विरोधी पक्षांनी विद्यार्थी मारहाणीच्या मुद्द्यावर चर्चेचा आग्रह धरला. या गदारोळामुळे होते. अध्यक्ष ओम बिर्ला म्हणाले की, विधेयकावर चर्चा करण्यासाठी सत्ताधारी आणि विरोधी पक्षाच्या खासदारांनी एकमताने निर्णय घ्यावा. यानंतर बिरला यांनी काँग्रेसचे खासदार के. सी. वेणुगोपाल आणि समाजवादी पक्षाचे खासदार अखिलेश यादव यांची भेट आहे. यात पेपरफुटीच्या आरोपींसाठी अधिक कठोर शिक्षा आणि दंडाची तरतूद आहे.राज्य सरकारांना आणि केंद्रशासित प्रदेशांना विशेष फास्ट ट्रॅक कोर्ट स्थापन करण्याचा अधिकार मिळेल, जिथे प्रकरणांची दररोज सुनावणी होईल. हा कायदा केंद्र सरकार विद्यार्थी आंदोलनांनंतर ही दुरुस्ती आणली आहे. पंतप्रधान मोदींनी २३ जुलै रोजी कायदा अधिक कठोर करण्याची घोषणा केली होती. नंतर, इन्फोसिसचे सह-संस्थापक नंदन नीलेकणी यांच्या अध्यक्षतेखाली परीक्षा सुधारणांसाठी उच्च-अधिकार कार्यदल (हाय-पावर्ड टास्क फोर्स) स्थापन करण्याचीही घोषणा करण्यात आली.

**खर्गे म्हणाले, 'अमित शाह यांनी सभागृहात येउन निवेदन द्यावे-** काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे म्हणाले, 'आम्ही चर्चेला घाबरत




विरोधी पक्षाच्या खासदारांनी सोमवारी सकाळी मकर दरवाजाजवळ निदर्शने केली.

दिवसभरात लोकसभेचे कामकाज चार वेळा तहकूब करण्यात आले. जेव्हा जेव्हा कामकाज पुन्हा सुरू झाले, तेव्हा काँग्रेस आणि समाजवादी पक्षाचे खासदार बॅनर घेउन सभागृहाच्या मध्यभागी (वेलमध्ये) प्रवेश करून घोषणाबाजी सुरू करत घेतली. सकाळी ११ वाजता केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांनी पेपरफुटीशी संबंधित सार्वजनिक परीक्षा सुधारणा विधेयक सभागृहात सादर केले.

केंद्र सरकारने २०२४ मध्ये बनवलेल्या कायद्यात बदल करण्यासाठी सुधारणा विधेयक आणले आणि त्याच्या एजन्सींद्वारे आयोजित सार्वजनिक परीक्षांना लागू होईल. यात UPSC, SSC, रेल्वे भरती, बँकिंग भरती परीक्षा, NTA आणि इतर केंद्रीय भरती व प्रवेश परीक्षांचा समावेश आहे. सरकारने NEET पेपरफुटी वाद आणि देशभरातील नाही. अमित शाह यांनी सभागृहात येउन लाठीचार्जचा आदेश का दिला याचे स्पष्टीकरण द्यावे, अशी माझी इच्छा आहे. सायंकाळी ५:१५ वाजता राज्यसभेचे कामकाज पुन्हा सुरू झाले. किरेन रिजिजू म्हणाले, 'चर्चेसाठी वेळ देण्यात आला आहे.






# दिलेले आश्वासन पाळा, नाहीतर देशव्यापी आंदोलन करु

## कॉकरोच जनता पार्टीचा सरकारला अल्टीमेटम



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**माजी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर आणि केंद्र सरकारसोबत झालेल्या तीन फे-यांच्या चर्चेनंतर कॉकरोच जनता पार्टीने आपले आंदोलन मागे घेतले होते. मात्र, आंदोलन शांत होताच पोलिसांकडून विद्यार्थ्यांवर सुरू असलेल्या कारवाईमुळे कॉकरोच जनता पार्टीने पुन्हा एकदा केंद्र सरकारविरोधात एल्गार पुकारला आहे. आंदोलक विद्यार्थ्यांवरील पोलीस कारवाई तात्काळ थांबवून सर्व गुन्हे मागे न घेतल्यास आणि २५ जुलैच्या कराराची लेखी प्रत उद्यापर्यंत न मिळाल्यास पुन्हा देशभरात तीव्र आंदोलन छेडू, असा थेट इशारा कॉकरोच जनता पार्टीने केंद्र सरकारला दिला आहे.राज्यसभेचे खासदार आणि ज्येष्ठ विधिज्ञ कपिल सिब्बल यांच्यासोबत घेतलेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत कॉकरोच जनता पार्टीने सरकारवर गंभीर आरोप केले. पत्रकार परिषदेत सीजेपीचे प्रवक्ते सौरव दास म्हणाले की, 'आंदोलनाची तीव्रता कमी होताच सरकार विद्यार्थ्यांना एकेक करून लक्ष्य करेल, अशी शंका आम्हाला आधीपासूनच होती. सरकारचे हे जुनेच आहे. २५ जुलै रोजी केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा आणि डॉ. जितेंद्र सिंह यांच्यासोबत झालेल्या बैठकीत आंदोलकांवर (पान २ वर)




जनमाध्यम
paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय

# गोवंश वाहतुक करणारे दोघे ताब्यात

## वाहनासह २ लाख ६० हजारांचा मुद्देमाल जप्त

**मोर्शी/प्रतिनिधीः-** पोलीस स्टेशन मोर्शी हद्दीत गोवंशाची अवैधरित्या वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती प्राप्त झाल्यानंतर मोर्शी पोलिसांनी तात्काळ सापळा रचून कारवाई केली. या कारवाईत गोवंशाची वाहतूक करणाऱ्या दोन आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून, वाहतुकीसाठी वापरण्यात आलेले वाहन जप्त करण्यात आले आहे.



सदर कारवाईदरम्यान एकूण २,६०,००० किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, आरोपींविरुद्ध संबंधित कायद्यानुसार गुन्हा नोंद करून पुढील तपास सुरू आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अप्पर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड तथा उपविभागीय पोलीस अधिकारी उमेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल आठवले यांच्या नेतृत्वात करण्यात आली.कारवाईत पो. उपनि. तुषार चव्हाण,पो. उपनि. शिवराज पवार,पो. अंमलदार छत्रपती करपते, पो. अंमलदार स्वप्नील बायस्कर, पो. अंमलदार अथर्व कोहळे सहभागी होते.

पोलीस स्टेशन मोर्शीकडून अवैध कृत्यांविरोधात अशाच प्रकारच्या प्रभावी कारवाया भविष्यातही सुरू राहणार असून, नागरिकांनी कोणतीही संशयास्पद माहिती तात्काळ पोलिसांना कळवावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## शाळा गुणवत्ता मूल्यांकन आणि आश्वासन आराखडा

# जिल्ह्यातील 141 शाळांचे होणार बाह्य मूल्यमापन

**अमरावती/प्रतिनिधी :** शाळा गुणवत्ता मूल्यांकन आणि आश्वासन आराखडा या शासनाच्या धोरणानुसार जिल्ह्यातील १४१ शाळांचे दुस-या टप्प्यात बाह्य मूल्यमापन केले जाणार आहे. शासन स्तरावरून त्या शाळांची यादी जाहीर करण्यात आली आहे.

महाराष्ट्रातील शाळांमध्ये गुणवत्ता वाढीस लागावी व विद्यार्थ्यांचा विकास व्हावा त्याचबरोबर शाळांची गुणवत्ता सुधारावे यासाठी १५ मार्च २०२४ रोजी स्वतंत्र राज्यशाळा मानक प्राधिकरण निर्मित करण्यात आले .त्यानुसार प्रत्येक शाळांना दरवर्षी स्वयं मूल्यमापन करणे अनिवार्य आहे. स्वयं मूल्यमापन नंतर त्या शाळांचे बाह्य मूल्यमापन होणार आहे .पहिल्या टप्प्यात काही शाळांचे बाह्य मूल्यमापन करण्यात आले होते. आता दुस-या टप्प्यात ऑगस्ट च्या पहिल्या आठवड्यात जिल्ह्यातील १४१ शाळांचे बाह्य मूल्यमापन केले जाणार आहे. यामध्ये ज्या शाळांचे स्वयं मूल्यमापनात सर्वाधिक गुण मिळवले अशा पाच टक्के शाळांची मूल्यमापन केले जाणार आहे. यामध्ये खाजगी अनुदानित ,विनाअनुदानित ,नगरपालिका, महानगरपालिका ,स्वयं शासित विद्यालय ,स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा या सर्व शाळांचे मूल्यमापन केले जाणार आहे.

अमरावती जिल्ह्यातील ज्या शाळांचे मूल्यमापन करण्यात येणार आहे त्यामध्ये भातकुली तालुका ८, चांदूरबाजार १० ,चांदूर रेल्वे ५ ,मोर्शी ८ , तिवसा ६, अमरावती तालुका ९, चिखलदरा ११ ,नांदगाव खंडेश्वर ८ ,वरु ड १० ,अचलपूर १४, दर्यापूर ११ ,अंजनगाव सुरजी ९ ,धामणगाव रेल्वे ६, धारणी ११ ,तर अमरावती महानगरपालिकेच्या क्षेत्रातील १५ शाळांचा समावेश आहे.



SQAAF शाळा गुणवत्ता मूल्यांकन आणि आश्वासन आराखडा हा तपासणी कार्यक्रम नसून शाळा गुणवत्ता विकास मार्गदर्शन कार्यक्रम आहे . या संदर्भात स्वयं मूल्यांकन करताना १२८ मानकांपैकी लागू असलेले स्तर निश्चित केले असेल त्याच स्तरासंदर्भात आवश्यक पुरावे बाह्य मूल्यांकन पथकांकडे सादर करावे . ही पुरावे वस्तुनिष्ठ तसेच पथकाचे समाधान करणारे असावेत . शालेय गुणवत्ता विकासाकरीता असलेला हा कार्यक्रम म्हणजे निरंतर चालणारी प्रक्रिया आहे .

**गजानन मानकर**
स्काफ निर्मिती सदस्य
तथा मुख्याध्यापक राष्ट्रीय शेतकी विद्यालय
खोलापूर

# लग्नाचे आमिष दाखवून अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**अमरावती/प्रतिनिधीः-**

**लग्नाचे आमिष दाखवून १५ वर्षीय अल्पवयी मुलीवर अत्याचार केल्या प्रकरणी गाडगे नगर पोलिसांनी २० वर्षीय ऋतुराज संदीप राऊत याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. माहितीनुसार, आरोपीने सोशल मीडियाच्या माध्यमातून पीडित मुलीशी ओळख वाढवली. त्यानंतर २५ मे रोजी श्रीराम नगर, राठी नगर येथील मित्राच्या फ्लॅटवर नेऊन तिच्यावर अत्याचार केला. लग्न करेन आणि कधीच सोडणार नाही असे आमिष आरोपीने मुलीला दाखवले होते. हा प्रकार १८ जुलै रोजी उघडकीस आला जेव्हा उपचारासाठी मुलीला पीडीएमसी रुग्णालयात दाखल करण्यात आले. पीडितेच्या आईच्या तक्रारी वरून पोलिसांनी आरोपी विरुद्ध बीएनएसची कलम ६९ आणि पोक्सो कायद्याचे कलम ४ व ६ अंतर्गत गुन्हा नोंदवला आहे. पोलिसांनी पुढील तपास सुरू केला आहे.**

# तीन वेळा सूचना करून गोळीबार केला असता; महिलांवरही खालच्या पातळीवर टीका

■ हिंदुत्ववादी नेत्याचे दिल्ली आंदोलनाबाबत वादग्रस्त वक्तव्य ■ जंतरमंतरवरील आंदोलनावर टी. जी. मोहनदास यांचे वादग्रस्त वक्तव्य

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** काक्रोच जनता पार्टीच्या नेतृत्वाखाली दिल्लीत जंतरमंतरवर झालेल्या आंदोलनाबाबत, केरळमधील हिंदुत्ववादी नेते आणि भाजपाच्या इंटेलेक्चुअल सेलचे माजी प्रमुख टी. जी. मोहनदास यांनी वादग्रस्त वक्तव्य केले आहे. नीट पेपरफुटीप्रकरणी धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी झालेले आंदोलन त्यांनी कसे हाताळले असते? यावर मोहनदास यांनी भाष्य केले आहे. मोहनदास यांनी त्यांच्या पत्रिका या युट्युब चॅनेलवर याबाबत एक व्हिडीओ प्रसिद्ध केला आहे. या व्हिडीओत मोहनदास आंदोलकांवर गोळीबार करण्यासह महिलांवर अत्यंत खालच्या पातळीवर बोलताना दिसत आहेत.

टी. जी. मोहनदास यांनी रविवारी त्यांच्या पत्रिका या युट्युब चॅनेलवर ३० मिनिटांचा व्हिडीओ प्रसिद्ध केला आहे. आंदोलन कसे हाताळले असते याबाबत बोलताना मोहनदास म्हणतात की, मी जंतरमंतरच्या भागात सुमारे चार चौरस किलोमीटर परिसरात संचारबंदी लागू केली असती. जमावाला पांगवण्यासाठी तीन वेळा सूचना केली असती आणि त्यानंतर गोळीबार केला असता. जीव वाचवण्यासाठी सगळे सैरावरा पळाले असते. यात काही जणांचा मृत्यू झाला असता, काही अपंग झाले असते. चार तासांत परिस्थिती शांत झाली असती.

**मृतदेह रुग्णालयात पाठवले असते- मोहनदास**

परिस्थिती शांत झाल्यानंतर, मृतदेह गोळा करून रुग्णालयात पाठवले असते, असे मोहनदास पुढे या व्हिडिओत म्हणत आहेत. दुस-या एका व्हिडिओमध्ये मोहनदास यांनी आंदोलनांमध्ये सहभागी होणा-या महिलांबाबत देखील अत्यंत खालच्या पातळीवर टीका केली.

**महिलांबाबत आक्षेपार्ह वक्तव्य-** गँगरेप झाले असते. कोणतीही तक्रार आली नसती, कारण या महिलांना बलात्कार करून घ्यायला आवडतो, अशाच या महिला आहेत. विशेषत? डाव्या विचारसरणीच्या, सेक्युलर, लोकशाहीवादी महिलांना बलात्कार आवडतो. यात कोणाचा मृत्यू झाल्यास त्याला हुतात्मा केले जाईल, असे वादग्रस्त वक्तव्य मोहनदास यांनी केले.



**मोहनदास यांच्या विधानावरुन टीका-** मोहनदास यांच्या विधानाचे तीव्र पडसाद राजकीय वर्तुळात उमटले असून, डेमोक्रेटिक युथ फेडरेशन ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि राज्यसभा खासदार ए. ए. रहिम यांनी मोहनदास यांच्यावर टीका केली. यातून भाजपाचा खरा चेहरा समोर येतो. समाजात फूट पाडण्याच्या उद्देशाने अशी विधाने केली जात आहेत. प्रक्षोभक विधानांबाबत सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वीही स्पष्ट इशारा दिलाय. याप्रकरणी कायदेशीर कारवाईसाठी व्हिडीओ वकिलांकडे पाठवला आहे, अशी प्रतिक्रिया खासदार रहिम यांनी द हिंदूला दिली आहे. टी. जी. मोहनदास यांच्या या व्हिडीओवरुन सोशल मीडियावर देखील संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत.

पान १ व १० वरून

## लवकरच बाजारात येणार

विशेषत १० आणि २० सारख्या कमी मूल्याच्या नोटा वारंवार वापरामुळे लवकर खराब होतात. त्यामुळे त्या पुन्हा छापणे आणि नष्ट करणे यावर मोठा खर्च होतो. पालिमर नोटांचा वापर केल्यास हा खर्च कमी होण्याची शक्यता आहे.

**बनावट नोटांवरही बसू शकतो आळा-** डएक्ष्च्या मते, पालिमर नोटांमध्ये अत्याधुनिक सुरक्षा वैशिष्ट्ये समाविष्ट करणे अधिक सोपे असते. या नोटांमध्ये पारदर्शक विंडो, विशेष सेक्युरिटी थ्रेड धागा, प्रगत सुरक्षा तंत्रज्ञान यांसारखी वैशिष्ट्ये देता येतात. त्यामुळे बनावट नोटा तयार करणे अधिक कठीण होउ शकते.

## पवार गट थेट एनडीएत;

तयार राहा, अशाआशयाची ही सूचना असल्याचे संगितले जातेय. त्यामुळे ही माहिती खरी ठरली तर लवकरच शरद पवार यांची राष्ट्रवादी ही एनडीएत सहभागी होउ शकते. सुप्रिया सुळे यांनी अमित शाहांची भेट घेण्याआधी राष्ट्रवादी (अजित पवार गट) पक्षाचे खासदार सुनिल तटकरे यांनीदेखील शाहांची भेट घेतली होती. त्यामुळे आता भविष्यात काय होणार, ते पाहणे आता रंजक ठरणार आहे.

## नेपाळमध्ये 200 व 500 रूपयांच्या

९ नोव्हेंबर २०१६ रोजी किंवा त्यानंतर जारी केलेल्या २०० आणि ५०० रुपयांच्या भारतीय नोटा, प्रति व्यक्ती २५,००० रुपयांच्या मर्यादेपर्यंत सोबत बाळगू शकतात.आवश्यक नियम तयार केल्यानंतर ११ फेब्रुवारी रोजी नेपाळच्या राजपत्रामध्ये (गॅझेट) प्रकाशित सूचनेद्वारे या तरतुदींची माहिती आधीच देण्यात आली होती; तरीही, नियमांची पुन्हा आठवण करून देण्यासाठी आणि त्यांच्या अंमलबजावणीबाबत स्पष्टता आणण्यासाठी एनआरबीने ही सूचना पुन्हा जारी केली.

**नेपाळी नागरिकांनाही भारतीय चलनाबाबत नियम लागू-** नवीन नियमांचे स्पष्टीकरण देताना ठफइ चे प्रवक्ते गुरु प्रसाद पौडेल यांनी शनिवारी सांगितले की, नेपाळी नागरिक भारताव्यतिरिक्त इतर कोणत्याही देशातून नेपाळमध्ये भारतीय चलन आणू शकत नाहीत. तसेच, ते नेपाळमधून भारताव्यतिरिक्त तिस-या देशात भारतीय चलन नेउ शकत नाहीत.त्यांनी सांगितले की, या सुधारित तरतुदीमुळे नेपाळला भेट देणा-या भारतीय पर्यटकांना आणि भारतासोबत व्यापार व व्यवसाय करणा-या नेपाळी नागरिकांना सोयीचे ठरेल.

**परदेशी पर्यटकांना ५,००० अमेरिकन डालर्सचा नियम-** सूचनेत असेही म्हटले आहे की, नेपाळी नागरिक आणि परदेशी पर्यटक ५,००० अमेरिकन डालर्स किंवा इतर परकीय चलनातील त्यास सममूल्य रक्कम कोणत्याही कस्टम्स डिक्लेरेशनशिवाय (सीमाशुल्क घोषणा) नेपाळमध्ये आणू शकतात.५,००० अमेरिकन डालर्सपेक्षा जास्त रक्कम असल्यास, नेपाळमध्ये आगमन झाल्यावर कस्टम्स विभागाकडे त्याची घोषणा करणे आवश्यक आहे.

## आसाममध्ये 68 जणांचा

असून अंदाजे १.९ लाख लोक प्रभावित झाले आहेत. शिवसागरमध्ये १.५ लाखांहून अधिक लोक, तर जोरहाटमध्ये अंदाजे १.४ लाख लोक प्रभावित झाले आहेत. शनिवारी सहा जिल्ह्यांमध्ये अंदाजे ६५.५ लाख लोकांना फटका बसला होता. आसाम राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या माहितीनुसार, अधिकारी चार जिल्ह्यांमध्ये ३५४ मदत शिबिरे आणि मदत वितरण केंद्रे चालवत असून बेघर लोकांना निवारा देत आहेत.

लष्कर, एनडीआरएफ, एसडीआरएफ, अग्निशमन आणि आपत्कालीन सेवा आणि पोलिस अप्पर आसामच्या विविध भागांमध्ये बचाव कार्य करत आहेत. सध्या राज्यभरातील ७६३ गावांमध्ये पुराचे पाणी शिरले असून ४८ हजार हेक्टरपेक्षा जास्त शेतजमिनीचे नुकसान झाले आहे. आसाम राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने सांगितले की, अनेक जिल्ह्यांमध्ये बंधारे, रस्ते, पूल आणि इतर सार्वजनिक पायाभूत सुविधांचेही नुकसान झाले आहे. त्यात पुढे म्हटले आहे की, नुमालीगडमधील धनसिरी नदी अजूनही धोक्याच्या पातळीच्या वर वाहत आहे.

## सोनम वांगचुक हॉस्पिटलमधून

उपोषणावर होते. दिल्ली उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, दिल्लीतील सफदरजंग रुग्णालयात दाखल केल्यानंतर पोलिसांनी त्यांना गुरुग्राम येथील मेदांता रुग्णालयात दाखल केले होते.

सोनम वांगचुक म्हणाले, ‘अनेक लोक म्हणतात की अशा राजवटीत गांधीजींची पद्धत चालणार नाही, पण माझा विश्वास आहे की ही पद्धत सरकारपेक्षा लोकांच्या हृदयापर्यंत अधिक पोहोचते. सरकार आमचे ऐकेल किंवा नाही, पण जनता नक्कीच ऐकते. मी गांधीजींचा हा प्रयोग यशस्वी होताना पाहिला आहे. यापूर्वी, आम्हीही त्यांच्याच मार्गावर चालून लडाखमध्ये एक आंदोलन सुरू केले होते. आता मला जाणवते की ही पद्धत राष्ट्रीय स्तरावरही तितकीच प्रभावी आहे.‘

**हा मार्ग कठोर हृदयालाही पाघळवू शकतो-** वांगचुक पुढे म्हणाले, ‘मला माझ्या देशबांधवांना सांगायचे आहे की त्यांनी बापूंनी दाखवलेल्या मार्गाचे अनुसरण करावे. यामुळे निश्चितपणे तोडगा निघेल. याला वेळ लागू शकतो, पण तो कधीही आंधळा नसेल. यश पहिल्याच प्रयत्नात मिळेलच असे नाही, पण सातत्यपूर्ण प्रयत्नांनी ते मिळते. आपण इतरांना त्रास देण्याऐवजी स्वतःच अडचणींचा सामना केला पाहिजे.‘ हा मार्ग कठोर हृदयालाही पाघळवू शकतो.‘

ते म्हणाले, ‘मी देशातील तरुणांचे अभिनंदन करू इच्छितो. ज्यांनी हे आंदोलन शांततेने केले, त्या सर्वांचेही मी आभार मानतो. आपण हे समजून घेतले पाहिजे की, जर तोडगा निघाला असेल, तर तो आपल्या ताकदीने, काठ्यांनी किंवा दगडांनी नव्हे, तर शांतता आणि संयमाने निघाला आहे. आम्ही स्वतः त्रास सहन केला, त्यामुळे गोष्टी पुढे सरकल्या. जर हिंसाचार झाला असता, तर परिस्थिती आणखी बिघडली असती. म्हणूनच मला नियोजित वेळेच्या आधीच शांततापूर्ण आंदोलनही थांबवावे लागले.‘

**राजीनाम्यानंतर सुधारणेची आशा-** शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याबाबत वांगचुक म्हणाले, ‘मला पूर्ण आशा आहे की व्यवस्थेत सुधारणा होईल. ही फक्त सुरुवात आहे. विधेयकावर संसदेत चर्चा सुरू आहे. यानंतर जी काही योग्य व्यवस्था असेल, ती स्वीकारली पाहिजे. मला पूर्ण आशा आहे की सर्व आश्वासने पूर्ण केली जातील. ज्यांनी शांततेने आंदोलन केले त्यांच्यावर कोणतीही कारवाई होणार नाही. जिथे जिथे जनता प्रश्न उपस्थित करेल, तिथे मंत्री आणि नेत्याने उत्तर दिलेच पाहिजे.‘

**मी माझा आवाज उठवत राहीन-** रुग्णालयातून घरी सोडण्यापूर्वी, सोनम वांगचुक यांनी एक व्हिडिओ प्रसिद्ध करून सांगितले, ‘माझी तब्येत आता खूप सुधारली आहे. मी हळूहळू जेवत आहे आणि माझी शक्ती परत येत आहे. स्वित्झर्लंडहून परतल्यानंतर उपवास सुरू करण्यापूर्वी ज्याप्रमाणे मी राजघाटावर बापूंना आदरांजली वाहिली आणि त्यानंतर जंतर मंतरकडे गेलो, तीच परंपरा आज पुन्हा पाळली जाईल. यानंतर मी लडाखमधील माझ्या घरी परत जाईन.‘ देशभरातील, सर्व स्तरांतील, तरुण-वृद्ध, जवळचे-दूरचे लोक या मोहिमेत एकत्र आले आणि त्यांनी आपला आवाज बुलंद केला. सर्वांच्या पाठिंब्याने हे आंदोलन यशस्वी झाले आहे आणि भविष्यातही आम्ही सार्वजनिक मुद्द्यांवर एकत्र आवाज उठवत राहू.‘

## भारताला कॉमनवेल्थ गेम्समध्ये

(१२६अ१६०) वजन उचलून रौप्यपदक पटकावले. याशिवाय, झंडू कुमारने पॅरा पावरलिफ्टिंगमध्ये कांस्यपदक जिंकून भारताचे खाते उघडले होते. भारत पदक तालिकेत ८व्या स्थानावर पोहोचला. ऑस्ट्रेलिया १७ सुवर्ण पदकांसह एकूण ३९ पदकांसह पहिल्या स्थानावर आहे.

**सचिन सिवाच उपांत्यपूर्व फेरीत पोहोचले-** कामनवेल्थ गेम्सच्या राउंड ऑफ १६ सामन्यात भारतीय बाक्सर सचिन सिवाचने इंग्लंडच्या विल्यम हेविटला ४-१ च्या फरकाने हरवले. तो पुरुषांच्या ६० किलो वजनी गटाच्या उपांत्यपूर्व फेरीत पोहोचला. पाचपैकी चार पंचांनी सचिनच्या बाजूने निर्णय दिला. चार पंचांनी सचिनला २९-२७ ने विजेता घोषित केले. तर एका पंचाने २९-२७ च्या गुणांसह हेविटला सरस मानले. उपांत्यपूर्व फेरीत त्याचा सामना बोत्सवानाच्या ट्रेझर मोरेमीशी होईल.

**श्रीशंकर अंतिम फेरीत पोहोचले-** भारताचा लांब उडीचा खेळाडू मुरली श्रीशंकर अंतिम फेरीत पोहोचला आहे. पात्रता फेरीदरम्यान, श्रीशंकरने आपल्या पहिल्याच उडीत ८.०१ मीटर अंतर कापून अंतिम फेरीत स्थान मिळवले. २०२२ च्या बर्मिंगहॅम राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत श्रीशंकरने रौप्य पदक जिंकले होते. अंतिम फेरीसाठी पात्र होण्यासाठी ८ मीटर अंतर कापणे आवश्यक होते.

**साजन प्रकाशही अंतिम फेरीत पोहोचला-** जलतरणपटू साजन प्रकाश पुरुषांच्या २०० मीटर बटरफ्लायच्या अंतिम फेरीत पोहोचले आहेत. साजन प्रकाशने हीट २ मध्ये १:५८.५९ वेळेसह दुसरे स्थान पटकावले, जे त्याच्या १:५७.०९ च्या वैयक्तिक सर्वोत्तम (घए) वेळेपेक्षा थोडे जास्त होते. ते रात्री १:४४ वाजता होणा-या अंतिम फेरीत पदकासाठी आव्हान देतील.

## दिलेले आश्वासन पाळा,

कोणतीही पोलीस कारवाई केली जाणार नाही, असा शब्द देण्यात आला होता. मात्र, सरकारने या कराराचा पूर्णपणे भंग केला आहे.‘

यावेळी सीजेपीची कायदेशीर बाजू सांभाळणा-या सिंह यांनी विविध राज्यांतील पोलीस कारवाईची आकडेवारी सांगितली. बिहारमध्ये पोलिसांकडून अमानुष अत्याचार सुरू असून तब्बल ८६ विद्यार्थ्यांना अटक करण्यात आली आहे. त्यांच्यावर थेट हत्येच्या प्रयत्नासारखे गंभीर गुन्हे दाखल करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला. कोलकाता येथे ११ जणांना अटक करण्यात आली. आसाममध्ये आंदोलकांवर ७ ते ८ नवे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. दिल्लीत आंदोलकांना स्वयंसेवकांना ताब्यात घेतले जात असून फेस रिकग्निशन वापरून त्यांना शोधले जात आहे.

**कपिल सिब्बल यांच्याकडून १ कोटी रुपयांच्या निधीची घोषणा-** दुसरीकडे, ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी विद्यार्थ्यांना कायदेशीर संरक्षण देण्यासाठी १ कोटी रुपयांचा निधी देण्याची घोषणा केली.‘शांततापूर्ण मार्गाने आंदोलन करणा-या नागरिकांवर किंवा विद्यार्थ्यांवर कोणतीही कारवाई होता कामा नये. सरकारविरोधातील आवाज दाबण्याचा हा प्रयत्न आहे. या निधीतून एक विशेष वेबसाईट तयार केले जाईल, ज्याद्वारे पीडित विद्यार्थी देशभरातील वकिलांशी थेट संपर्क साधू शकतील,‘ असे कपिल सिब्बल म्हणाले. सरकारने २५ जुलै रोजी दिलेल्या आश्वासनांचे पालन करण्यासाठी सीजेपीने २४ तासांची मुदत दिली आहे. त्यामुळे पुढील २४ तास हे आंदोलन पुन्हा पेटणार की शांत राहणार, हे ठरवण्यासाठी अत्यंत निर्णायक ठरणार आहेत.

## आदिवासी मंत्र्यांच्या दौऱ्यानंतर पुन्हा

विशेष म्हणजे, तिटंबा आश्रमशाळेतील घटनेनंतर आदिवासी विकास मंत्री यांनी नुकतीच भेट देऊन संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या होत्या. मात्र त्यानंतर अल्पावधीतच बीजुधावाडी आणि सावलीखेडा येथेही विद्यार्थ्यांची तब्येत बिघडल्याच्या घटना घडल्याने आदिवासी आश्रमशाळांतील भोजन व्यवस्थेवर पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

या घटनांचे नेमके कारण अद्याप अधिकृतपणे स्पष्ट झालेले नसून, प्रशासनाकडून अन्नाचे नमुने तपासणीसाठी पाठविणे आणि घटनांची चौकशी सुरू असल्याची माहिती मिळाली आहे. चौकशी अहवालानंतरच विद्यार्थ्यांची तब्येत बिघडण्यामागील नेमके कारण स्पष्ट होणार आहे.

## मकोका आरोपींचा घटनास्थळी

महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (मकोका) अंतर्गत कारवाई करण्यात आली. तपासाचा भाग म्हणून सोमवारी सर्व आरोपींना असोरिया पेट्रोल पंप परिसरात आणून घटनाक्रमाची पुनर्रचना (रिक्रिएशन) करण्यात आली. यावेळी नागपुरी गेट पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक मनोहर कोटनाके, पोलिस उपनिरीक्षक विकास मनपिया, गुन्हे शाखेची दोन्ही पथके, आरसीपीचे जवान तसेच मोठा पोलीस फौजफाटा तैनात करण्यात आला होता.

## मनपा आयुक्त डॉ.मंगेश गोंदावले

पालिका शाळा क्र. ३ ला भेट देऊन शाळेच्या परिसरातील स्वच्छता, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, शौचालयांची स्वच्छता तसेच विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या मूलभूत सुविधांची पाहणी केली. शालेय परिसर नेहमी स्वच्छ ठेवण्याबरोबरच विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक सर्व सुविधा दर्जेदार स्वरूपात उपलब्ध राहतील याची दक्षता घेण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

ट्रान्सपोर्ट परिसरातील कचरा संकलन केंद्राची पाहणी करताना आयुक्तांनी कचरा संकलन, वर्गीकरण व विल्हेवाट प्रक्रियेचा आढावा घेतला.

त्यानंतर झोन कार्यालय व भाजीबाजार परिसरात स्वच्छतेची पाहणी करण्यात आली.

ट्रान्सपोर्ट नगर येथील अग्निशमन केंद्रालाही आयुक्तांनी भेट देऊन तेथील परिसराची स्वच्छता, मूलभूत सुविधा तसेच आपत्कालीन परिस्थितीसाठी उपलब्ध असलेल्या व्यवस्थेची पाहणी केली. आपत्कालीन सेवा अधिक सक्षम ठेवण्यासाठी आवश्यक त्या सर्व सुविधा कार्यरत राहतील याची खात्री करण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

या पाहणीवेळी झोन सभापती खॉ. आसिया अंजुम वहिद, नगरसेवक सैय्यद राशद अली सै. शौकत अली, सादिक शाह, अहमद भाई, उपायुक्त भाग्यश्री बोरेकर, वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ. अजय जाधव, सहाय्यक आयुक्त मनोज शहाळे, वैद्यकीय अधिकारी डॉ. फिरोज खान, उपअभियंता विवेक देशमुख, ज्येष्ठ स्वास्थ्य निरीक्षक राजेश राठोड, स्वास्थ्य निरीक्षक, कोणार्क कंपनीचे सुपरवायझर तसेच महानगरपालिकेचे संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## हेल्मेट घाला, जीव वाचवा

वाहन चालविताना कोणताही पोलिस कर्मचारी आढळल्यास त्याच्यावरही सामान्य नागरिकांप्रमाणेच दंडात्मक कारवाई करण्याचे स्पष्ट निर्देश पोलिस आयुक्त राकेश ओला यांनी दिले आहेत.

या मोहिमेचा सकारात्मक परिणाम शहरात दिसून येत आहे. अनेक विद्यार्थी आपल्या मित्रांना वाढदिवसानिमित्त हेल्मेट भेट देत आहेत. तसेच काही पालक मुलांच्या वाढदिवसानिमित्त पाहुण्यांना ‘रिटर्न गिफ्ट’ म्हणून हेल्मेट देऊन सुरक्षित वाहतुकीचा संदेश देत आहेत. या उपक्रमाचे शहरात कौतुक होत आहे.

दंडात्मक कारवाईबरोबरच सामाजिक बांधिलकी जपत शहर पोलिसांनी जनजागृती मोहिमेदरम्यान आर्थिकदृष्ट्या दुर्बल दुचाकीस्वारांना मोफत हेल्मेटचे वितरण केले आहे. सुरक्षित प्रवासासाठी प्रत्येकाने हेल्मेटचा वापर करावा, असा संदेश या उपक्रमातून देण्यात येत आहे.

## हॉटेल व्यावसायिकाच्या घरातून

(किंमत २,१८,७९२), २६.३४० ग्रॅम वजनाची सोन्याची चेन (किंमत ४,८४,१५२) तसेच ४ हजारांची रोख रक्कम असा एकूण ७,०६,९४४ किमतीचा ऐवज चोरीला गेल्याचे निदर्शनास आले. घटनेची माहिती मिळताच हेमराज साहू यांनी नागपुरी गेट पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यावरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंदवून परिसरातील सीसीटीव्ही फुटेज व अन्य तांत्रिक पुराव्यांच्या आधारे तपास सुरू केला आहे.

## कंपनीविरुद्ध गुन्हा दाखल

उईके यांनी तातडीने धारणी येथे भेट देत उपचार घेत असलेल्या विद्यार्थ्यांची भेट घेतली. त्यांनी वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून विद्यार्थ्यांच्या प्रकृतीची सविस्तर माहिती जाणून घेतली. तसेच पालकांशी संवाद साधून त्यांना धीर दिला. यानंतर मंत्री डॉ. उईके यांनी थेट टिटंबा आश्रमशाळेत जाऊन घटनास्थळाची पाहणी केली. विद्यार्थी, पालक, आदिवासी संघटनांचे प्रतिनिधी आणि प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत त्यांनी सविस्तर बैठक घेतली. विद्यार्थ्यांच्या आरोग्याला सर्वोच्च प्राधान्य देत टिटंबा आश्रमशाळेसाठी सेंट्रल किचनमधून पुरविले जाणारे भोजन तात्काळ बंद करण्याचा निर्णयही मंत्री डॉ. उईके यांच्या उपस्थितीत घेण्यात आला. यापुढे अशा प्रकारच्या घटना घडू नयेत, यासाठी संपूर्ण व्यवस्थेचा पुनर्विचार करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.यावेळी मंत्री डॉ. अशोक उईके यांनी दोषी अधिकारी, कर्मचारी अथवा संबंधित संस्थेला कोणीही पाठीशी घालणार नाही. चौकशी अहवालानुसार कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, असे सांगितले. बैठकीत विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा मुद्दा मांडण्यात आला. विद्यार्थ्यांच्या हितासाठी सेंट्रल किचन व्यवस्था बंद करणे, दोषींवर गुन्हे दाखल करणे आणि भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली. चर्चेनंतर मंत्री डॉ. उईके यांच्या हस्तक्षेपामुळे प्रशासनाने महत्त्वाचे निर्णय जाहीर केले आणि लेखी आश्वासन दिले. त्यानंतर विद्यार्थी, पालक व आदिवासी संघटनांनी सुरू असलेले आंदोलन मागे घेत मंत्री डॉ. उईके यांचे आभार मानले.

## नशामुक्त युवा फॉर विकसित

माय भारत, अमरावती जिल्हा कार्यालयाशी संपर्क साधावा, तसेच १५ ते २९ वर्षे वयोगटातील युवक-युवतींनी सहभागी व्हावे, असे आवाहन ’माय भारत’चे जिल्हा युवा अधिकारी अक्षय निपाणे यांनी केले आहे.

## महिलेच्या पोटातील १० किलोची

आकाराची आणि अंदाजे १० किलो वजनाची मोठी गाठ आढळून आली. ही गाठ आतड्यांच्या लूप्सना घट्ट चिकटलेली होती. तसेच महाधमनी (र्दू), आयव्हीसी (घ्न्र) आणि आयएमए (घ्र्ं) यांसारख्या अत्यंत महत्त्वाच्या रक्तवाहिन्यांच्या जवळ असलेल्या मेसेंटरीच्या भागातून ती निर्माण झालेली होती. गाठ मोठ्या आतड्याच्या उतरत्या भागाला (अेमह्‌गु ण्दत्दह) तसेच रेक्टोसिग्मॉइड भागालाही घट्ट चिकटलेली असल्याने ही शस्त्रक्रिया अत्यंत आव्हानात्मक होती.

तज्ज्ञांच्या चमूने अत्यंत काळजीपूर्वक आणि बारकाईने महत्त्वाच्या रक्तवाहिन्या, आतडी व इतर अवयवांना कोणतीही इजा न होता संपूर्ण गाठ यशस्वीरीत्या काढली. शस्त्रक्रियेदरम्यान गर्भाशयात सुमारे ५ सें.मी. आकाराची आणखी एक गाठ आढळल्याने गर्भाशयासह दोन्ही अंडाशय आणि अंडवाहिन्याही काढण्यात आल्या. या शस्त्रक्रियेसाठी रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.अमोल नरोटे व विशेष कार्य अधिकारी डॉ.मंगेश मेंढे यांचे मार्गदर्शन व रुग्णालय प्रशासनाचे संपूर्ण सहकार्य लाभले

ही अत्यंत गुंतागुंतीची शस्त्रक्रिया स्त्रीरोग कर्करोगतज्ज्ञ डॉ. आयुष हेडा ,भूलतज्ज्ञ डॉ. सपना अग्रवाल आणि डॉ. माधुरी गाडेकर तसेच अधीसेविका चंदा खोडके, मालती प्रधान यांच्या सूचनेनुसार इन्चार्ज सिस्टर बिल्की शेख ,कोमल, जया वाघमारे, वंदना जाधव, पायल अंभोरे, करण सदार, ज्योत्स्ना मुंदाने, प्रियंका, स्वप्निल, शंकर झटाले, सागर गणोरकर, लक्ष्मी सोनवणे आणि सचिन शारे यांनी मोलाचे योगदान होते.

विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय (सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल), अमरावती येथे अशा प्रकारच्या मोठ्या, गुंतागुंतीच्या आणि आव्हानात्मक शस्त्रक्रिया नियमितपणे यशस्वीरीत्या करण्यात येत आहेत. त्यामुळे अमरावतीसह धारणी व विदर्भातील दुर्गम भागातील रुग्णांना अत्याधुनिक आणि प्रगत शस्त्रक्रिया उपचार त्यांच्या जवळच्या शासकीय रुग्णालयात उपलब्ध होत असून, दर्जेदार आरोग्यसेवा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचत आहे.

## शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे

मुख्यमंत्रीपदी विराजमान होऊन नेतृत्व करो असे साकडे शिवसैनिकाच्या वतीने आई अंबादेवीच्या चरणी घालण्यात आले. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख मनोज कडू ,आसावरी देशमुख, प्रतिभा बोपशेट्टी, लक्ष्मी शर्मा, पंजाबराव तायवाडे ,अशोक इसळ, सागर ढोके, रविकांत काकडे, शिवराज चौधरी, सचिन ठाकरे, अतुल सावरकर,विनोद शर्मा , बंडू काठीलकर, आदित्य ठाकरे ,विनोद मंडळकर, विकी गुहे, शरद वानखडे यांच्यासह असंख्य शिवसैनिक उपस्थित होते.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ मंगळवार, २८ जुलै २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# रस्ता मे अखेरीस तयार... मग बायोमायनिंगचा 'महामार्ग' नेमका कोणता?

## डंपिंग ग्राऊंडवरील दोन कामांची कालरेषाच संशयाच्या भोव-यात

■ ॲड. समीर ठाकूर ■

**अकोट :** अकोट नगर परिषदेच्या २.०७ कोटी रुपयांच्या बायोमायनिंग प्रकल्पावर उपस्थित होत असलेल्या प्रश्नांमध्ये आता आणखी एका नव्या मुद्द्याची भर पडली आहे. तो म्हणजे डंपिंग ग्राऊंडकडे जाणाऱ्या खडीकरणाच्या रस्त्याचा. उपलब्ध कागदपत्रांतील कालरेषा आणि स्थानिकांकडून व्यक्त होत असलेल्या निरीक्षणांनुसार, रस्त्याचे काम आणि बायोमायनिंग प्रकल्पाची अंमलबजावणी जवळपास एकाच कालावधीत झाल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे एवढ्या मोठ्या प्रमाणावर यंत्रसामग्री, बायोकल्चर आणि हजारो मेट्रिक टन कचऱ्याची हाताळणी प्रत्यक्षात कशा पद्धतीने झाली, हा प्रश्न आता अधिकच गडद होत चालला आहे. उपलब्ध माहितीनुसार, डंपिंग ग्राऊंडकडे जाणाऱ्या खडीकरणाच्या रस्त्याचा कार्यारंभ आदेश मार्च २०२५ अखेरीस देण्यात आला. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार प्रत्यक्ष काम यावर्षीच्या एप्रिल - मे महिन्यात सुरू झाले आणि जुलैच्या प्रारंभी पूर्ण झाले. दुसरीकडे, बायोमायनिंग प्रकल्पाचा कार्यारंभ आदेश ११ मे २०२६ रोजी देण्यात आला असून, नगर परिषद आणि कंत्राटदाराच्या भूमिकेनुसार आदेश मिळताच काम सुरू करण्यात आले.

यामुळे दोन्ही कामांची कालरेषा एकमेकांशी जुळत असल्याचे दिसते. मात्र, याच ठिकाणी सर्वात महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होत आहे की, ज्या डंपिंग ग्राऊंडकडे जाणारा रस्ताच त्या काळात तयार होत होता, त्याच



संग्रहित छायाचित्र

कालावधीत हजारो मेट्रिक टन कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी आवश्यक यंत्रणा आणि साहित्य तेथे नेमके कोणत्या मार्गाने पोहोचले? 'रस्ता नंतर... प्रक्रिया आधी?' अशी चर्चा शहरात रंगू लागली असून, या चर्चेची सत्यता सक्षम चौकशीतूनच स्पष्ट होऊ शकते.

### ट्रॉमल मशीन गेली कशी? बायोकल्चर पोहोचले कुठून?

बायोमायनिंग प्रक्रियेसाठी ट्रॉमल मशीन, जेसीबी, पोकलेन, डंपर, इंधन टँकर, बायोकल्चर आणि इतर यंत्रसामग्रीची आवश्यकता असते. एवढी मोठी यंत्रसामग्री आणि साहित्य डंपिंग ग्राऊंडवर कोणत्या मार्गाने नेण्यात आले? त्या वाहतुकीची नोंद, वाहन क्रमांक, गेट एन्ट्री, लॉगबुक किंवा इतर अभिलेख नगर परिषदेकडे उपलब्ध आहेत का? याबाबत अद्याप अधिकृत माहिती समोर

### रस्ता झाला... पण दर्जा झाला का?

डंपिंग ग्राऊंडकडे जाणारा सुमारे १८०० मीटर लांबीचा आणि ४ मीटर रुंदीचा खडीकरणाचा रस्ता आता स्वतःच चर्चेचा विषय ठरला आहे. स्थानिक नागरिकांकडून या रस्त्याच्या गुणवत्तेबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत. अंदाजपत्रकातील सर्व तांत्रिक अटी व शर्तींचे पालन करूनच हे काम पूर्ण करण्यात आले का? आवश्यक जाडी, दर्जेदार साहित्य, कॉम्पॅक्शन आणि इतर निकषांचे पालन झाले का? की काही महत्त्वाचे आयटम वगळून काम घाईघाईत पूर्ण करण्यात आले? अशा स्वरूपाचे प्रश्न उपस्थित होत आहेत. या शंकांची अधिकृत चौकशी झालेली नसली, तरी अंतिम देयकापूर्वी स्वतंत्र तांत्रिक तपासणी व्हावी, अशी मागणी जोर धरत आहे.

आलेली नाही. स्थानिक नागरिकांकडून व्यक्त होत असलेल्या प्रश्नांनुसार, जर त्या काळात रस्त्याचेच काम सुरू होते, तर एवढ्या मोठ्या प्रमाणातील वाहतूक प्रत्यक्षात कशी पार पडली? आभाळ मार्गातून तर ही सर्व वाहतूक झाली नाही ? असा खोचक टोला नागरिक मार्ट

■ ट्रॉमल मशीन, बायोकल्चर आणि हजारो टन कचरा नेमका पोहोचला कसा?
■ खडीकरणाच्या रस्त्याच्या गुणवत्तेवरही प्रश्न
■ अंतिम देयकापूर्वी स्वतंत्र तांत्रिक पाहणीची मागणी

असून या उद्भवणाऱ्या सर्व प्रश्नांची स्वतंत्र पडताळणी होणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे.

### ६० टक्के देयक अदा... अंतिम बिलाचीही तयारी?

माहितीनुसार, या रस्त्याच्या कामासाठी मंजूर रकमेपैकी सुमारे ६० टक्के देयक नगर परिषदेकडून अदा करण्यात आले आहे. उर्वरित अंतिम बिलाच्या प्रक्रियेलाही गती दिली जात असल्याची चर्चा आहे. अशा परिस्थितीत स्थापत्य विभागाच्या कनिष्ठ अभियंता, उपअभियंता किंवा अन्य स्वतंत्र तांत्रिक अधिकाऱ्यांकडून प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून दर्जा प्रमाणित झाल्यानंतरच अंतिम देयक अदा करण्यात यावे, अशी मागणी नागरिकांकडून पुढे येत आहे.

### कागदपत्रे आणि प्रत्यक्ष वास्तव जुळते का?

या प्रकरणात आता केवळ बायोमायनिंगच नव्हे, तर त्यास पूरक असलेल्या रस्त्याच्या कामाची कालरेषा, वाहतूक व्यवस्था, यंत्रसामग्रीची हालचाल आणि अभिलेख यांचाही सखोल ताळमेळ तपासण्याची गरज व्यक्त केली जात आहे. दोन्ही कामांच्या कालावधीतील साम्य लक्षात घेता, संपूर्ण प्रकरणाची तांत्रिक, आर्थिक आणि अभियांत्रिकी दृष्टिकोनातून स्वतंत्र चौकशी झाली, तरच वस्तुस्थिती स्पष्ट होईल, असे मत जाणकार व्यक्त करत आहेत.

### कायदेशीर सूचना

या वृत्तातील सर्व मुद्दे उपलब्ध कागदपत्रे, प्रशासकीय नोंदी, स्थानिक नागरिकांकडून व्यक्त करण्यात आलेली निरीक्षणे आणि सार्वजनिक हिताच्या दृष्टीने उपस्थित करण्यात आलेल्या प्रश्नांवर आधारित आहेत. यामधील कोणताही कथित गैरव्यवहार, आर्थिक नुकसान किंवा अनियमितता सक्षम चौकशी यंत्रणेने अद्याप सिद्ध अथवा पुष्टी केलेली नाही. संबंधित नगर परिषद, अधिकारी, कंत्राटदार किंवा लोकप्रतिनिधी यांची अधिकृत भूमिका प्राप्त झाल्यास तीही त्याच प्राधान्याने प्रसिद्ध करण्यात येईल.

---

## राजाभाऊ डोणगावकर यांना विदर्भ रत्न पुरस्कार प्रदान



■ प्रतिनिधी | कारंजा ■

सामाजिक ,आर्थिक व सहकार क्षेत्रातील आपल्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वामुळे, उत्कृष्ट व्यवस्थापनामुळे आणि सभासदाभिमुख कार्यपद्धतीमुळे सर्वत्र परिचित असलेले कारंजा नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष राजाभाऊ डोणगांवकर यांना ' विदर्भ रत्न पुरस्कार' मिळाल्याबद्दल श्री दिगंबर जैन महासमिती कारंजा लाड संभाग तथा वाशिम जिल्हा दिगंबर जैन महासमिती च्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. रिसील डाट इन या संस्थेच्या वतीने महाराष्ट्रातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तीचा सन्मान दरवर्षी ' विदर्भ रत्न पुरस्कार ' देऊन केला जातो. यावर्षी हा पुरस्कार सामाजिक , आर्थिक व सहकार क्षेत्रातील कार्याची दखल घेऊन जैन समाजातील ज्येष्ठ व्यक्तीमत्व असलेले व दिगंबर जैन महासमिती वाशिम जिल्हा व कारंजा लाड संभाग चे जेष्ठ मार्गदर्शक राजाभाऊ डोणगांवकर यांना प्रदान करण्यात आला.

## उपवर्गीकरण सामाजिक ऐक्याला खिंडार पाडणारे -तेजराव वानखडे

■ प्रतिनिधी | वाशिम ■

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले च्या वतीने संपूर्ण महाराष्ट्रात उपवर्गीकरणाला विरोध करण्यासाठी निदर्शने करण्यात येत आहेत. त्यानुसार वाशिम जिल्ह्यामध्ये पक्षाच्यावतीने जिल्हाध्यक्ष तेजराव वानखेडे यांच्या नेतृत्वात उपवर्गीकरण अ ब क ड ला विरोध करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालया समोर निदर्शने करून मा.जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले. याप्रसंगी तेजराव वानखेडे म्हणाले की उपवर्गीकरणामुळे समाजातील ५९ जातीमध्ये अंतर्गत फूट निर्माण होण्याची शक्यता आहे .अनुसूचित जातीला संविधानाने एकत्रितपणे आरक्षणाचा हक्क दिला आहे .कारण या समाजाने



शतकांनुशतके अस्पृश्यता आणि सामाजिक अन्याय सहन केला आहे. त्यामुळे हा हक्क जाती जातीत विभागून देण्यासाठी नाही. उपवर्गीकरणासाठी चालवलेले प्रयत्न अत्यंत अपारदर्शक आहेत .न्यायमूर्ती अनंत बदर समितीचा अहवाल गुलदस्त्यात ठेवून त्यावर निर्णय घेणे किंवा पुढील प्रक्रिया राबवणे हे असंवैधानिक असून उपवर्गीकरण सामाजिक न्यायाला खिंडार पाडणारे आहे असे जिल्हाध्यक्ष तेजराव वानखेडे यांनी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. सध्या देशात २०२७ पर्यंत जातीय जनगणनेची प्रक्रिया सुरू आहे २०२७ च्या जनगणनेतून प्रत्येक समाज घटकांची वास्तविक लोकसंख्या स्पष्ट होणार आहे. त्यामुळे जनगणनेचे अधिकृत निष्कर्ष समोर आल्यानंतरच उपवर्गीकरणाबाबत निर्णय घेणे न्याय आणि सर्वसमावेशक ठरेल. घाईघाईने घेतलेले कोणतेही निर्णय सर्व समाज घटकावर अन्याय करणारे ठरू शकतात असे तेजराव वानखडे म्हणाले.

## जिल्ह्यात सुरक्षित भविष्यासाठी निवृत्ती नियोजनाची गरज वाढली

**अकोला :** भारतात ज्येष्ठ नागरिकांची संख्या वेगाने वाढत असून, वाढते आयुर्मान आणि बदलती कौटुंबिक रचना लक्षात घेता निवृत्तीनंतर आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी राहण्यासाठी वेळेत आर्थिक नियोजन करणे अत्यंत आवश्यक बनले आहे. नियमित बचत आणि दीर्घकालीन गुंतवणुकीच्या माध्यमातून निवृत्तीनंतरचा काळ अधिक सुरक्षित आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवता येऊ शकतो.आयसीआयसीआय प्रु गोल्ड पेन्शन सेव्हिंग्ज ही योजना सुरक्षित बचत, बोनसद्वारे निधीत वाढ, गरज पडल्यास २५ टक्क्यांपर्यंत अंशतः पैसे काढण्याची सुविधा तसेच निवृत्तीनंतर नियमित उत्पन्नाची संधी उपलब्ध करून देते.

## बाल शिवाजी मराठी विद्यानिकेतन येथे चिमुकल्यांची वारी अतिशय उत्साहात



■ प्रतिनिधी | मालेगाव ■

स्थानिक बाल शिवाजी मराठी विद्यानिकेतन येथे अखंड महाराष्ट्राच्या सोहळा आषाढी एकादशीनिमित्त शाळेतील चिमुकल्यांनी स्थानिक मालेगाव येथील विठ्ठल मंदिरात पायी दिंडीचे आयोजन केले होते सर्वप्रथम संस्थेचे अध्यक्ष अरविंद देशमुख व संस्थेच्या सचिव रंजना देशमुख यांच्या हस्ते दिंडीचे विधिवत पूजन करून दिंडीची सुरुवात करण्यात आली दिंडी शिव चौक स्थित विठ्ठल मंदिरात नेण्यात आली तिथे विद्यार्थ्यांनी विठू नामाचा गजर केला नर्सरी ते चौथीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी अतिशय सक्रिय सहभाग नोंदवत काहींनी भक्ती गीत तर काहींनी फुगड्या खेळत विठ्ठल भक्तीचा आनंद घेतला चिमुकल्यांनी वारकरी वेशभूषा करत स्थानिकांची मनी जिंकली तर चिमुकल्यांच्या भावपूर्ण वातावरणाचे सदस्य वल्लभ देशमुख तसेच शाळेचे मुख्याध्यापक प्रशांत देशमुख यांनी भरभरून कौतुक केले कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन जयश्री नानाराव सरकटे , पूनम रमेशराव रहाटे , भाग्यशाली खोटे जगदीश देवकर यांनी केले.

---

## ग्रामीण भूमिहीन महिला श्रमिकांच्या प्रश्नांवर संशोधन
### प्रा. मंगेश भुताडे यांना आचार्य (Ph.D.) पदवी



■ प्रतिनिधी | वाशिम ■

स्थानिक श्री रामराव सरनाईक समाजकार्य महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापक मंगेश भुताडे यांनी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या अंतर्गत आचार्य (इप.ऊ.) पदवी संपादन केली आहे. गुलाम नबी आझाद समाजकार्य महाविद्यालय, पुसद येथील संशोधन केंद्रात दि.२४ जुलै रोजी प्रा. डॉ. अनंत देशमुख, प्रा. डॉ. संजय गवई यांच्या उपस्थितीत त्यांना पदवी बहाल करण्यात आली. सामाजिक न्याय, महिला सक्षमीकरण आणि ग्रामीण विकासाशी निगडित विषयावरील त्यांच्या संशोधनाला शैक्षणिक क्षेत्रातून विशेष दाद मिळत असून, त्यांच्या या यशाबद्दल विविध स्तरांतून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

प्र्या समाजाभिमुख विषयावर संशोधन पूर्ण केले आहे. या संशोधनामध्ये ग्रामीण भूमिहीन महिला श्रमिकांच्या जीवनातील संघर्ष, श्रमाचे अवमूल्यन, सामाजिक उपेक्षा तसेच जात, वर्ग आणि पुरुषसत्ताक व्यवस्थेमुळे निर्माण झालेल्या संरचनात्मक विषमतेचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे.

संशोधनातून ग्रामीण महिला श्रमिकांच्या सक्षमीकरणासाठी आवश्यक धोरणात्मक उपाययोजना, प्रभावी सामाजिक हस्तक्षेप आणि विविध कल्याणकारी योजनांच्या परिणामकारक अंमलबजावणीसंदर्भात महत्त्वपूर्ण निष्कर्ष समोर आले आहेत. त्यामुळे हे संशोधन ग्रामीण विकास, महिला सक्षमीकरण आणि लोकाभिमुख धोरणनिर्मितीसाठी मार्गदर्शक ठरणार असल्याचे मत अभ्यासकांनी व्यक्त केले आहे.

## ग्रंथदिंडी व वृक्षदिंडी काढत विद्यार्थ्यांनी साजरी केली आषाढी एकादशी



■ प्रतिनिधी | मानोरा ■

आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त पीएमश्री जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, विठोली येथे ग्रंथदिंडी व वृक्षदिंडीचे आयोजन उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी वाचन संस्कृतीचा प्रसार आणि पर्यावरण संवर्धनाचा प्रभावी संदेश दिला. कार्यक्रमाची सुरुवात संत ज्ञानेश्वर महाराज व संत तुकाराम महाराज यांच्या प्रतिमांचे पूजन करून करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी ग्रंथ आणि वृक्षांची रोपे हातात घेऊन गावातून दिंडी काढली. 'वाचाल तर वाचाल', 'झाडे लावा, झाडे जगवा', 'ग्रंथ हेच खरे मित्र' अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.यावेळी विद्यार्थ्यांनी अभंग, हरिपाठ व भक्तिगीते सादर केली. शिक्षकांनी संत परंपरा, वाचन संस्कृतीचे महत्त्व आणि पर्यावरण संवर्धनाबाबत मार्गदर्शन केले.

## स्मृतिशेष दादासाहेब गवई यांना कृतज्ञ अभिवादन
### मोफत आरोग्य शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

■ प्रतिनिधी | कारंजा ■

दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट, अमरावतीद्वारे संचालित तक्षशिला आयुर्वेद कॉलेज, हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर, खेर्डा येथे शनिवार, दि. २५ जुलै रोजी स्मृतिशेष दादासाहेब गवई यांच्या स्मृतिदिनानिमित्त विनम्र अभिवादन कार्यक्रम तसेच भव्य मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. सामाजिक बांधिलकी, जनसेवा आणि आयुर्वेदाच्या माध्यमातून आरोग्य संवर्धनाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाला परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, आयुर्वेदाचे जनक भगवान धन्वंतरी आणि स्मृतिशेष श्री. दादासाहेब गवई यांच्या प्रतिमांचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर महाविद्यालयातील प्राध्यापक, सर्व कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी मेणबत्त्या प्रज्वलित करून पुष्पांजली अर्पण करत स्मृतिशेष दादासाहेब गवई यांना भावपूर्ण अभिवादन केले.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रदीप पांडव यांनी आपल्या मनोगतात स्मृतिशेष श्री. दादासाहेब गवई यांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि जनसेवेतील उल्लेखनीय कार्याचा गौरवपूर्ण आढावा घेतला. समाजातील वंचित आणि गरजू घटकांच्या उन्नतीसाठी त्यांनी केलेले योगदान प्रेरणादायी असल्याचे सांगत त्यांच्या विचारांचा वारसा जपण्याचे आवाहन केले.

यानंतर आयोजित करण्यात आलेल्या भव्य मोफत आरोग्य तपासणी शिबिरात परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

---

## धावती कार उभ्या वाहनावर धडकल्याने एक ठार



■ प्रतिनिधी | मालेगाव ■

वाशिम ते अकोला महामार्गावरील अमानी येथे दि. २७ जुलै रोजी सकाळी २ वा. च्या सुमारास रोडच्या बाजूला उभ्या असलेल्या केटीसी गाडीवर वर स्विफ्ट डिझायर धडकल्याने एक जण जागीच ठार शिरपूर येथील दीपक लक्ष्मण भांदुर्गे असे मृतकाचे नाव आहे. महामार्गावरील बेशिस्त पार्किंग दिपक साठी ठरली शेवटची रात्र दोन वर्षाची चिमुकली झाली पोरकी वृद्धापकाळात वडिलांचा आधार हिरावून घेतला आहे. मिळालेल्या प्राप्त माहिती नुसार दिनांक २६ जुलै रोजी मा. पं. स. सदस्य लक्ष्मण भांदुर्गे यांचा मुलगा दिपक भांदुर्गे हा वाशिम येथे त्याच्या मित्राच्या लग्न समारंभासाठी गेला होता तो लग्न समारंभ करुन २७ जुलै रोजी सकाळी २ वाजताच्या सुमारास स्विफ्ट डिझायर गाडी क्रमांक एम एच ३७ व्ही ९८४० या गाडीने वाशिम इथून शिरपूर कडे निघाला होता परंतु अकोला ते वाशिम हायवेवर अमानी जवळ त्याला गाडी चालवत असताना त्याला अचानक डुलकी लागली असावी त्यामुळे गाडीवरचा ताबा सुटून समोर उभ्या असलेल्या केटीसी गाडीवर धडकून त्यामध्ये तो जागीच ठार झाला आहे हा अपघात एवढा भयानक होता की गाडीचा चक्का चूर झाला त्याला गाडीतून ओढून काढावे लागले दिपक भांदुर्गे यांची निधनाची बातमी कळताच शिरपूर गावावर मोठी शोक कळा पसरली आहे. सकाळी ११ वाजता शोकाकुल वातावरणात हजारो लोकांच्या उपस्थित अंत्यसंस्कार करण्यात आले. मृतक दिपक लक्ष्मण भांदुर्गे याला दोन वर्षेची एक मुलगी आहे.

## रविवारी श्रीराम ग्रुपची वार्षिक गायगाव पायदळ यात्रा

**अकोला :** गत २३ वर्षांपासून अकोला ते गायगाव येथील गणेश मंदिरा पर्यंत पायदळ यात्रा आयोजित करण्याऱ्या जय श्रीराम ग्रुपच्या वतीने या वर्षी ही भव्य गायगाव पायदळ यात्राचे आयोजन केले आहे. राजस्थानी समाजाचा पवित्र श्रावण मासच्या प्रथम चतुर्थी दिनी रविवार दि २ आगस्ट रोजी सकाळी ६-१५ वाजता राजराजेश्वर मंदिरात सामूहिक पूजा अर्चना करून या नंतर दाबकी रोड उड्डाणपूल परिसरातून सकाळी ६-३० वाजता गायगावच्या गणेश मंदिर पर्यंत ही पायदळ यात्रा निघणार आहे. नागरिकांना सकाळी आरोग्यासाठी पायी चालण्याची सवय लागावी या साठी हा उपक्रम अनेक वर्षांपासून आयोजित करण्यात येत आहे.

## आषाढी एकादशीला भक्तीचा महासागर
### रवि भुतडा परिवाराकडून महाप्रसाद वाटप

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त नागरदास येथील श्री जगदंबा देवी संस्थान परिसरात भक्ती, सेवा आणि सामाजिक बांधिलकीचा अनोखा संगम अनुभवायला मिळाला. शहरातील दानशूर व्यक्तिमत्त्व रवि भुतडा यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य फराळ वाटप उपक्रमाला भाविकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. दिवसभरात १० ते १३ हजारांहून अधिक भाविकांनी साबुदाणा उसळ, खिचडी, ड्रायफ्रूट लाडू, केळी आणि चहाचा महाप्रसाद स्वीकारला.

गेल्या वीस वर्षांपासून अखंडपणे सुरू असलेली ही सेवा परंपरा यंदाही अत्यंत भक्तिमय



वातावरणात पार पडली. सकाळी ७ वाजता विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात मूर्तीचे विधिवत पूजन, अभिषेक व महाआरती झाल्यानंतर फराळ वाटपास प्रारंभ करण्यात आला. सायंकाळी सात वाजेपर्यंत हजारो भाविकांसाठी अखंड सेवा सुरू होती.

यावेळी १३ क्विंटल साबुदाण्यापासून तयार करण्यात आलेल्या उसळीचे वाटप करण्यात आले.

त्यासोबत साबुदाणा खिचडी, ड्रायफ्रूट लाडू, केळी व गरम चहाचाही प्रसाद भाविकांना देण्यात आला. दिवसभर दर्शनासाठी आलेल्या भाविकांच्या प्रचंड गर्दीमुळे श्री जगदंबा देवी संस्थान परिसराला यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले.

या सेवाकार्यात श्रीमती विमलादेवी भुतडा, सौ. कल्पना भुतडा, अनिल भुतडा, मधुर भुतडा, श्रीकिसन मानधने, उमेश मानधने, डॉ. निलेश मानधने, सुभाष काबरा, हरीष सोनी, योगेश काळे, राजेश बळी, हरीष जाजू, योगेश जाजू, गजानन देवळे, महादेव देवळे (सरपंच), आनंदा देवळे, सुभाष देवळे, डॉ. पुरुषोत्तम देवळे, कैलास देवळे, विश्वनाथ देवळे, नंदकिशोर काळे, संतोष शेटे यांच्यासह जगदंबा देवी हरिपाठ महिला मंडळ, ग्राम स्वच्छता मंडळ नागरदास, अष्टभुजा ॲग्रो फुड्सचे सर्व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

जनमाध्यम
e paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २४१ ■ मंगळवार २८ जुलै २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.००रु

# आयकर भरता... अन् रेशनही घेता शासनाचा धक्का ; ५८७ शिधापत्रिकाधारक रडारवर

## मोफत धान्याला 'ब्रेक'; अपात्र लाभार्थ्यांवर कारवाईची तलवार, सेलू तालुक्यात खळबळ

**सेलू अभय बेदमोहता :** शासनाच्या मोफत व सवलतीच्या धान्य योजनेचा लाभ घेणाऱ्या आयकरदात्यांवर आता प्रशासनाने कठोर भूमिका घेतली आहे. सेलू तालुक्यातील तब्बल ५८७ शिधापत्रिकाधारक आयकर भरत असल्याचे पडताळणीत उघड झाल्याने त्यांना स्वस्त धान्य योजनेतून वगळण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. या निर्णयामुळे तालुक्यात एकच खळबळ उडाली असून, अपात्र लाभार्थ्यांच्या गोटात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा लाभ केवळ खऱ्या अर्थाने गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांपर्यंत पोहोचावा, या उद्देशाने शासनाने राज्यभर शिधापत्रिकांची व्यापक पडताळणी सुरू केली आहे. या मोहिमेदरम्यान राशनकार्डधारकांची माहिती प्राप्तिकर विभागाच्या नोंदींशी जुळवून पाहण्यात आली. त्यात सेलू तालुक्यातील ५८७ लाभार्थी नियमित आयकर भरत असल्याचे समोर आले.

शासनाच्या निकषांनुसार आयकर भरणारे नागरिक अंत्योदय व प्राधान्य कुटुंब योजनेअंतर्गत सवलतीच्या धान्याचे पात्र लाभार्थी ठरत नाहीत. त्यामुळे या सर्वांची नावे शिधापत्रिकांमधून वगळण्याची प्रक्रिया सुरू असून, येत्या काही दिवसांत त्यांना स्वस्त धान्य दुकानांमधून धान्य मिळणे बंद होण्याची शक्यता आहे.





पुरवठा विभागाने स्पष्ट इशारा दिला आहे की, आर्थिकदृष्ट्या सक्षम असूनही शासनाच्या योजनेचा लाभ घेणाऱ्यांवर आवश्यक ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल. पात्र लाभार्थ्यांच्याच हाती अन्नधान्य पोहोचावे, यासाठी ही मोहीम अधिक तीव्र करण्यात आली आहे.

दरम्यान, काही लाभार्थ्यांनी आयकर भरत असले तरी त्यांची आर्थिक परिस्थिती प्रत्यक्षात हलाखीची असल्याचा दावा केला आहे. अशा कुटुंबांना अपात्र ठरविण्यापूर्वी सुनावणीची संधी द्यावी, अशी मागणी पुढे येत आहे. मात्र शासनाचा निर्णय कठोरपणे राबविण्याच्या हालचालींमुळे सेलू तालुक्यात या विषयाची जोरदार चर्चा सुरू झाली आहे.

# दिल्लीचे अधिवेशन सोडून मित्रासाठी धावले खासदार

## माझ्या जिवलगाचे शेवटचे दर्शन होईपर्यंत अंत्ययात्रा थांबवा.. अमर काळेंच्या अश्रूंनी शिरपूर गावही गहिवरले

**विरूळ (आकाजी) जनमाध्यम :** राजकारणाच्या गर्दीतही मैत्रीचे ऋण विसरले नाही, याचा हृदयस्पर्शी प्रत्यय आर्वी तालुक्यातील शिरपूर येथे आला. खासदार अमर काळे यांचे बालपणापासूनचे जिवलग मित्र किसन मिस्कीन यांचे अल्पशा आजाराने निधन झाल्याची बातमी दिल्लीतील लोकसभा अधिवेशनादरम्यान समजताच खासदार काळे अक्षरशः गहिवरून गेले. मला दिल्लीवरून येऊ द्या.. माझ्या मित्राचे शेवटचे दर्शन घेऊ द्या, असा निरोप त्यांनी कुटुंबीयांना दिला. त्यानंतर त्यांच्या येण्याची वाट पाहत अंत्ययात्रा थांबविण्यात आली.



दिल्लीहून तातडीने विमानाने परतलेल्या खासदार काळे यांनी शिरपूर येथे पोहोचताच मित्राच्या पार्थिवाचे दर्शन घेतले. तो क्षण अत्यंत भावनिक ठरला. जिवलग मित्राला अखेरचा निरोप देताना त्यांच्या डोळ्यांतून अश्रू ओघळले आणि उपस्थितांच्याही भावना अनावर झाल्या. स्वर्गीय माजी आरोग्यमंत्री शरदराव काळे यांच्या काळापासून किसन मिस्कीन यांचे काळे कुटुंबाशी अतूट जिव्हाळ्याचे संबंध होते. प्रत्येक निवडणुकीत नियोजन, कार्यकर्त्यांचा समन्वय आणि संघटन उभारणीत त्यांनी मोलाची भूमिका बजावली होती. त्या ऋणाची जाणीव ठेवत खासदार अमर काळे यांनी लोकसभा अधिवेशनापेक्षाही मित्राच्या अखेरच्या निरोपाला प्राधान्य दिले. स्थानिक मोक्षधामावर शेकडो नागरिकांच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार पार पडले. या प्रसंगाने उपस्थितांच्या मनात एकच भावना उनाही पद, प्रतिष्ठा आणि सत्ता यापेक्षा मैत्रीचे नाते मोठे असते आणि खरा मित्र शेवटच्या क्षणापर्यंत साथ सोडत नाही.

# नाकेबंदीत दारूतस्करांवर एलसीबीची कारवाई

## २४ पेट्या मद्यासह १०.८० लाखांचा मुद्देमाल जप्त



**वर्धा जनमाध्यम :** स्थानिक गुन्हे शाखेने अवैध मद्यतस्करीविरोधात धडक कारवाई करत नाकेबंदीदरम्यान देशी दारूच्या २४ पेट्या आणि चारचाकी वाहनासह १० लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईत दोन संशयित आरोपी पोलिसांना चकवा देत पसार झाले असून, एकाला ताब्यात घेण्यात आले आहे. या प्रकरणी अल्लीपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पुलगाव विभागात अवैध धंद्यांविरोधात गस्त घालत असताना, वायगाव (निपाणी) येथील रामेश्वर कारमोरे व चेतन महाकाळकर हे मारुती सुझुकी फ्रॉन्क्स (एमएच-३२-एएक्स-७०३९) या वाहनातून गोडेगाव येथील रामकृष्ण विष्णूजी डुबडुबे याला देशी व विदेशी मद्याचा साठा पोहोचविण्यासाठी येत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी तत्काळ नाकेबंदी करून वाहन अडविले.

पोलिसांची चाहूल लागताच रामेश्वर कारमोरे आणि चेतन महाकाळकर हे घटनास्थळावरून पसार झाले. मात्र, रामकृष्ण डुबडुबे हा घटनास्थळी आढळून आला. वाहनाची झडती घेतली असता डिकीत व मागील आसनावर गोवा नंबर-१ देशी दारूच्या २४ पेट्या आढळून आल्या. पोलिसांनी दारूचा साठा आणि वाहन असा एकूण १०.८० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

या प्रकरणी पसार आरोपींसह संबंधितांविरुद्ध अल्लीपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, फरार आरोपींचा शोध सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल व अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद चौधरी यांच्या नेतृत्वात शेखर डोंगरे, मनोज धात्रक, महादेव सानप, विकास मुंडे, विनोद कापसे, सुगम चौधरी, शुभम राऊत आणि हर्षल सोनटक्के यांच्या पथकाने केली.

# गाय ठार... भरपाई गायब

## रिधोरा शेतकऱ्याची शासनाला हाक

## दोन महिन्यांपासून भरपाईचा पत्ता नाही

**सेलू जनमाध्यम :** तालुक्यातील रिधोरा शिवारात वाघाच्या वाढत्या वावरामुळे शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून वनविभागाच्या दिरंगाईमुळे नुकसानग्रस्त शेतकरी हवालदिल झाला आहे. मौजा रिधोरा येथील शेतकरी भीमराव झिंगुजी खैरकर यांच्या सर्वे क्रमांक १६/१ मधील शेतातील गोठ्यात ११ मे २०२६ च्या रात्री वाघाने घुसून दुधाळ गाईचा फडशा पाडला. विशेष म्हणजे याच शेतात यापूर्वीही वन्यप्राण्यांकडून पाळीव जनावरांवर हल्ल्याच्या घटना घडल्या आहेत.

घटनेची माहिती मिळताच वन विभागाचे क्षेत्र सहाय्यक एस. आर. कोटजावरे व वनरक्षक ए. एम. ढाले यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. शासकीय नियमानुसार नुकसानभरपाई लवकर मिळेल, असे आश्वासनही देण्यात आले. मात्र दोन महिन्यांहून अधिक कालावधी उलटूनही भरपाई मिळालेली नसल्याचा आरोप शेतकरी भीमराव खैरकर यांनी केला आहे.

दुधाळ जनावरे आणि शेती हेच कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचे साधन असल्याने आर्थिक संकट अधिक गडद झाले आहे. वनविभागाकडून शेतीभोवती संरक्षक कुंपण, गोठ्यांची सुरक्षित व्यवस्था तसेच सौर दिव्यांची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

रिधोरा परिसरात वारंवार होत असलेल्या वाघाच्या हल्ल्यांमुळे शेतकऱ्यांमध्ये दहशत पसरली आहे. अनेकदा मागणी करूनही ठोस उपाययोजना होत नसल्याने संताप व्यक्त केला जात आहे. माझी फाईल अजून प्रक्रियेत आहे, एवढेच उत्तर मिळते. शासनाकडून माझा हक्क जिवंतपणी मिळणार की नाही असा प्रश्न भीमराव खैरकर यांनी उपस्थित केला. वनविभागाने विलंब न करता नुकसानभरपाई अदा करून शेतकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी परिसरातून जोर धरत आहे.

# झोपेत विषारी सापाचा दंश; विद्यार्थिनीचा दुर्दैवी मृत्यू

**आंजी (मोठी) जनमाध्यम :** आंजी मोठी येथील वार्ड क्रमांक ४ मधील रहिवासी पवन बोरसरे यांची कन्या कु. भाविका बोरसरे (१६) हिचा विषारी सर्पदंशामुळे दुर्दैवी मृत्यू झाल्याने गावावर शोककळा पसरली आहे. या हृदयद्रावक घटनेने संपूर्ण परिसर हळहळला आहे.



माहितीनुसार, भाविका शनिवारी मध्यरात्री घरी झोपलेली असताना तिच्या पायाला विषारी सापाने दंश केला. सुरुवातीला तिला याची कल्पना आली नाही. काही वेळाने जाग आल्यानंतर पायाला काहीतरी चावल्याची जाणीव झाल्याने तिने घरच्यांना माहिती दिली. त्यानंतर तिची प्रकृती झपाट्याने खालावू लागल्याने वडील पवन बोरसरे यांनी तिला तातडीने आंजी मोठी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले. तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी प्राथमिक उपचार करून तिला पुढील उपचारासाठी त्वरित वर्धा येथे हलविण्याचा सल्ला दिला.

यानंतर भाविकाला सेवाग्राम रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, तेथील डॉक्टरांनी तपासणीनंतर तिला मृत घोषित केले. दहावीत शिक्षण घेणारी भाविका अभ्यासू व मनमिळावू स्वभावाची असल्याने तिच्या अकाली निधनाने गावात शोककळा पसरली. मृत्यूची वार्ता समजताच बोरसरे कुटुंबाच्या घरी नागरिकांनी मोठी गर्दी केली. दुपारी मृतदेह गावात पोहोचल्यानंतर महिलांसह पुरुषांच्या डोळ्यांत अश्रू तरळले होते. शोकाकुल वातावरणात आंजी मोठी येथील हिंदू स्मशानभूमीत तिच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

# डेंग्यूचा धोका वाढला; प्रत्येक प्रभागात तातडीने फवारणी करा

## विशाल हजारे यांचे नगराध्यक्षांना निवेदन



**वर्धा जनमाध्यम :** पावसामुळे शहरात अनेक ठिकाणी पाणी साचल्याने डेंग्यू व मलेरियाचा धोका वाढत असून, प्रत्येक प्रभागात तातडीने धुरळीकरण, औषध फवारणी आणि स्वच्छता मोहीम राबविण्याची मागणी माजी शहर उपाध्यक्ष विशाल हजारे यांनी नगराध्यक्ष सुधीर पांगुळ यांच्याकडे केली आहे. याबाबत त्यांनी निवेदन सादर करून नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने त्वरित उपाययोजना करण्याची गरज व्यक्त केली.निवेदनात शहरातील नाल्यांची नियमित साफसफाई, डासांच्या अळ्यांचे निर्मूलन, घराघरांत ताप सर्वेक्षण तसेच ज्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात कचरा साचतो तेथे ब्लिचिंग पावडरची फवारणी करण्याची मागणी करण्यात आली आहे. प्रभाग क्रमांक १ मध्ये झाडांच्या वाढलेल्या फांद्यांमुळे नागरिकांना ये-जा करताना अडचणी निर्माण होत असल्याने त्या तातडीने छाटण्याची मागणीही करण्यात आली.विशाल हजारे यांनी सांगितले की, पावसाळ्यानंतर डासांची उत्पत्ती झपाट्याने वाढत असून तापाच्या रुग्णांची संख्याही वाढत आहे. त्यामुळे नगरपालिकेने प्रतिबंधात्मक उपाययोजना युद्धपातळीवर राबविणे आवश्यक आहे. नागरिकांनीही घराच्या परिसरात पाणी साचू न देणे, पाण्याची भांडी नियमित स्वच्छ ठेवणे आणि ताप, थंडी, अंगदुखी किंवा डोकेदुखीची लक्षणे दिसल्यास तातडीने वैद्यकीय सल्ला घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.निवेदन देताना महेश जगदने, रंजीत रेवतकर, उदय बनकर, सुरेंद्र राजधानी, गौतम देशभर आणि धीरज वाघ यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते. नगरपालिकेने तातडीने कारवाई करून नागरिकांना डेंग्यू व मलेरियाच्या संकटापासून दिलासा द्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

# जनतेनेच खेचली सरपंचांच्या खुर्चीची पायाभरणी

## झाडगावात अविश्वासाचा कौल : २४१ मतांनी सरपंचांना घरचा रस्ता

**वर्धा जनमाध्यम :** ग्रामपंचायतीत मनमानी कारभार आणि सदस्यांना विश्वासात न घेता निर्णय घेतल्याच्या आरोपांमुळे अखेर झाडगाव (गो.) येथील सरपंच भोजराज दुधाराम भागडे यांच्याविरुद्ध ग्रामस्थांनीच अविश्वासाचा कौल दिला. सोमवारी झालेल्या विशेष ग्रामसभेतील गुप्त मतदानात २४१ मतांनी अविश्वास ठराव मंजूर झाला. अविश्वासाच्या विरोधात १६५ मते पडली, तर ५६ मते अवैध ठरली. या निकालामुळे गावच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे.

सन २०२२ मध्ये थेट जनतेतून निवडून आलेल्या भोजराज भागडे यांच्यावर ग्रामपंचायत सदस्यांना विश्वासात न घेता एकतर्फी निर्णय घेण्याचा आरोप सातत्याने होत होता. या पार्श्वभूमीवर १३ जुलै २०२६ रोजी ग्रामपंचायतीच्या मासिक सभेत सदस्यांनी त्यांच्याविरुद्ध अविश्वास ठराव मंजूर करून प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविला होता.

जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांच्या निर्देशानुसार वर्धा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी समर्थ शेवाळे यांच्या उपस्थितीत सोमवारी विशेष ग्रामसभा घेण्यात आली. संपूर्ण प्रक्रिया गुप्त मतदानाद्वारे पार पडली. एकूण ४६२ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. मतमोजणीत २४१ मते अविश्वासाच्या बाजूने पडल्याने ठराव मंजूर झाल्याची अधिकृत घोषणा करण्यात आली.

# दारूच्या नशेत पत्नीवर जीवघेणा हल्ला; पतीला पाच वर्षांचा सश्रम कारावास

**वर्धा जनमाध्यम :** पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन लोखंडी खलबत्त्यासारख्या वस्तूने तिच्यावर जीवघेणा हल्ला करणाऱ्या आरोपी पतीला हिंगणघाट येथील सत्र न्यायालयाने पाच वर्षांचा सश्रम कारावास आणि २५ हजार रुपयांचा दंड अशी शिक्षा सुनावली. दंड न भरल्यास सहा महिन्यांचा साधा कारावास भोगावा लागणार आहे.

या प्रकरणातील आरोपी गजानन मारोती ठाकरे (वय ५०, रा. मोहदा, ता. केळापूर, जि. यवतमाळ, सध्या रा. तळेगाव (टा.)) याच्याविरुद्ध अल्लीपूर पोलीस ठाण्यात भादंवि कलम ३०७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. जखमी चंदा गजानन ठाकरे या आरोपीच्या पत्नी असून दोघेही मागील अडीच वर्षांपासून भाड्याच्या घरात राहत होते व रोजमजुरी करून उदरनिर्वाह करत होते. आरोपी दारूच्या नशेत घरी आल्यानंतर पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेत वाद घालत तिच्या चेहऱ्यावर लोखंडी वस्तूने वार करून तिला ठार मारण्याचा प्रयत्न केला होता.

या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक नितीन नलवडे यांनी करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. सरकार पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता दीपक वैद्य यांनी प्रभावी युक्तिवाद केला. पैरवी अंमलदार उमा कचाटे यांनी साक्षीदारांना न्यायालयात वेळोवेळी हजर करून महत्त्वाची भूमिका बजावली. तसेच अल्लीपूर पोलीस ठाण्याच्या ठाणेदार सहाय्यक पोलीस निरीक्षक संगीता हेलोंडे यांनी साक्षीदारांचे मार्गदर्शन करून खटल्याच्या सुनावणीत समन्वय साधला. उपलब्ध पुरावे, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आणि वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या साक्षीच्या आधारे न्यायालयाने आरोपीला दोषी ठरवत पाच वर्षांचा सश्रम कारावास व २५ हजार रुपयांचा दंडाची शिक्षा सुनावली.

# रमेश बुरघाटे यांचे निधन



**वर्धा :** न्यू म्हाडा कॉलनी, पिंपरी (मेघे) येथील रहिवासी रमेश रामरावजी बुरघाटे पाटील (वय ५२) यांचे सोमवारी दुपारी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सून तसेच मोठा आप्तपरिवार आहे.

**ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद वर्धा**
**निविदा सूचना कमांक १४/२०२६-२७, दि.२८.०७.२०२६**

ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, वर्धा अंतर्गत जलजीवन मिशन अंतर्गत मौजा रिमडोह, ता.हिंगणघाट रु.५१,९५,९०७/- येथील पाणी पुरवठा योजनेचे उर्वरित काम करणे, २) जिल्हा परिषद सेसफंड अंतर्गत वर्धा जिल्ह्यातील ७ प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांकरीता सन २०२६-२७ वार्षिक ॲलम व ब्लिचिंग चे पुरवठा करणे रु.४७,९३,८१२/- या कामाचे E-Nivida दिनांक २८.०७.२०२६ ते ०४.०८.२०२६ या कालावधीमध्ये ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहे. सविस्तर तपशील व कामाच्या अटी व शर्ती दिनांक २८.०७.२०२६ पासून www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर व कार्यालय ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जि.प.वर्धा चे सुचना फलकावर पहावयास मिळेल, याची नोंद घ्यावी.

(डी.एस.परांडे)
कार्यकारी अभियंता,
ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,
जिल्हा परिषद, वर्धा

(पराग सोमण, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, वर्धा

**सार्वजनिक जाहीर नोटीस**
**(हरविलेल्या मूळ विक्रीखताबाबत व हरकत मागविण्याबाबत)**

सर्व संबंधितांना याद्वारे जाहीर नोटीस देण्यात येते की,

माझे अशिल श्री. विलास महादेवराव वाणी हे मौजा सावंगी मेघे, मौजा क्र. १३८ प.ह. क्र. १९, ता. व जि. वर्धा येथील सर्व्हे क्र. २०३ मधील प्लॉट क्र. ६३, एकूण क्षेत्रफळ १८४.०१चौ. मी. (१९८०.००चौ. फूट) तसेच त्यावरील ४८.१४ चौ. मी. बांधकामासह असलेल्या स्थावर मालमत्तेचे कायदेशीर व निर्विवाद मालक आहेत.

**सदर मालमत्तेच्या चतु:सीमा पुढीलप्रमाणे आहेत :**
**पूर्वेस : प्लॉट क्र. ५९**
**पश्चिमेस : ले-आऊट रोड**
**उत्तरेस : प्लॉट क्र. ६१ व ६२**
**दक्षिणेस : प्लॉट क्र. ६४**

सदर मालमत्ता श्री. दिनेश देवरावजी हजारे यांनी त्यांच्या पत्नी सौ. वंदना दिनेश हजारे यांच्या संमतीने माझे अशिल श्री. विलास महादेवराव वाणी यांना दि. १७/१२/२०२५ रोजी नोंदणीकृत विक्रीखत दस्त क्र. ५४५९/२०२५ अन्वये विक्री केली असून त्याअन्वये माझे अशिल सदर मालमत्तेचे कायदेशीर मालक व ताबेदार झाले आहेत.तथापि, सदर मालमत्तेच्या हक्कसाखळीतील खालील मूळ विक्रीखते हरविलेली असून ती सर्वतोपरी शोधूनही मिळून आलेली नाहीत :

दि. १४/०२/२०१२ रोजीचे नोंदणीकृत विक्रीखत, दस्त क्र. १३४१/२०१२ दि. ०९/०३/२०१० रोजीचे नोंदणीकृत विक्रीखत, दस्त क्र. २०७१/२०१० सदर मूळ विक्रीखते हरविल्याबाबत माझे अशिल श्री. विलास महादेवराव वाणी यांनी संबंधित पोलीस ठाण्यात हरवल्याची तक्रार (एफ.आय.आर) नोंदविलेली आहे.तसेच, माझे अशिल यांनी सदर मालमत्तेच्या तारणावर द टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स यांचेकडे गृहकर्जासाठी अर्ज केला असून त्यानिमित्ताने ही सार्वजनिक जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे.यास्तव सर्व संबंधितांना याद्वारे जाहीर करण्यात येते की, वरील मालमत्तेबाबत, सदर व्यवहाराबाबत अथवा हरविलेल्या मूळ विक्रीखतांबाबत कोणाचाही कोणताही हक्क, दावा, हितसंबंध, तारणहक्क, आक्षेप, न्यायालयीन वाद किंवा अन्य कोणताही अधिकार असल्यास अथवा सदर हरविलेली मूळ विक्रीखते कोणास मिळाल्यास, त्यांनी या जाहीर नोटीसच्या प्रसिद्धीपासून ७ (सात) दिवसांच्या आत आवश्यक कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर लेखी स्वरूपात संपर्क साधावा.अन्यथा, कोणासही सदर मालमत्तेबाबत किंवा हरविलेल्या विक्रीखतांबाबत कोणताही हक्क, दावा किंवा आक्षेप नसल्याचे गृहीत धरून माझे अशिल तसेच संबंधित वित्तीय संस्था पुढील कायदेशीर कार्यवाही करतील. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

स्थळ : -वर्धा
दिनांक : -२८/०७/२०२६

**ॲड. आर. आर. तिवारी**
अधिवक्ता, जिल्हा व सत्र न्यायालय,
वर्धा रामनगर, वर्धा.
मोबा. क्र.: -९९२२४२६१६८

**सार्वजनिक जाहीर नोटीस**
**(हरविलेल्या मूळ विक्रीखताबाबत व हरकत मागविण्याबाबत)**

सर्व संबंधितांना याद्वारे जाहीर नोटीस देण्यात येते की,

माझे अशिल श्री. होनेश्वर मधुकर बारई हे मौजा चांदणी, मौजा क्र. ४७, ता. आर्वी, जि. वर्धा, ग्रामपंचायत चांदणी हद्दीतील जुना फील्ड सर्व्हे क्र. १०३/३, नवीन फील्ड सर्व्हे क्र. २९ मधील प्लॉट क्र. २७, क्षेत्रफळ १९२.८४ चौ. मी. या स्थावर मालमत्तेचे कायदेशीर व निर्विवाद मालक आहेत.

**सदर मालमत्तेच्या चतु:सीमा पुढीलप्रमाणे आहेत :**
**पूर्वेस : प्लॉट क्र. २४,**
**पश्चिमेस : ले-आऊट रोड**
**उत्तरेस : प्लॉट क्र. २६,**
**दक्षिणेस : कनामवार नगर**

सदर मालमत्ता श्री. गोविंद रूपलालजी मोहितीरे यांनी माझे अशिल श्री. होनेश्वर मधुकर बारई यांना दि. २७/०५/२०२० रोजी नोंदणीकृत विक्रीखत दस्त क्र. ५६७/२०२० अन्वये विक्री केली असून त्याअन्वये माझे अशिल सदर मालमत्तेचे कायदेशीर मालक व ताबेदार झाले आहेत.

तथापि, सदर मालमत्तेच्या हक्कसाखळीतील दि. ०७/०३/२०१८ रोजीचे नोंदणीकृत मूळ विक्रीखत, दस्त क्र. ४३५/२०१८ हे हरविले असून सर्वतोपरी शोध घेऊनही ते मिळून आलेले नाही.

सदर मूळ विक्रीखत हरविल्याबाबत माझे अशिल श्री. होनेश्वर मधुकर बारई यांनी संबंधित पोलीस ठाण्यात हरवल्याची तक्रार (एफ.आय.आर) नोंदविलेली आहे.तसेच, माझे अशिल यांनी सदर मालमत्तेच्या तारणावर महिंद्रा रुरल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड (महीन्द्रा रुरल हाउसिंग फायनान्स लिमीटेड ) यांचेकडे गृहकर्जासाठी अर्ज केला असून त्यानिमित्ताने ही सार्वजनिक जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे.यास्तव सर्व संबंधितांना याद्वारे जाहीर करण्यात येते की, वरील मालमत्तेबाबत, सदर व्यवहाराबाबत अथवा हरविलेल्या मूळ विक्रीखताबाबत कोणाचाही कोणताही हक्क, दावा, हितसंबंध, तारणहक्क, आक्षेप किंवा अन्य कोणताही अधिकार असल्यास अथवा सदर हरविलेले मूळ विक्रीखत कोणास मिळाल्यास, त्यांनी या जाहीर नोटीसच्या प्रसिद्धीपासून ७ (सात) दिवसांच्या आत आवश्यक कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर लेखी स्वरूपात संपर्क साधावा.अन्यथा, कोणासही सदर मालमत्तेबाबत किंवा हरविलेल्या विक्रीखताबाबत कोणताही हक्क, दावा किंवा आक्षेप नसल्याचे गृहीत धरून माझे अशिल तसेच संबंधित वित्तीय संस्था पुढील कायदेशीर कार्यवाही करतील. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

स्थळ : -वर्धा
दिनांक : -२८/०७/२०२६

**ॲड. आर. आर. तिवारी**
अधिवक्ता, जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा
रामनगर, वर्धा.
मोबा. क्र.: -९९२२४२६१६८

e paper www.janmadhyam.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## कर्जमाफीच्या यादीत नाव न आल्याने
# शेतक-याची आत्महत्या

यवतमाळ/ प्रतिनिधी-राज्य सरकारने नुकताच कर्जमाफी झालेल्या शेतक-यांची यादी जाहीर केली. ही यादी जाहीर होताच शेतक-यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. बँकेमध्ये रांगा लावून शेतकरी आपली कर्जमाफी झाली की नाही हे तपासत आहेत. अशामध्येच यवतमाळमधून एक मन सुन्न करणारी घटना घडली. कर्जमाफीच्या यादीमध्ये नाव न आल्याने शेतक-याने आत्महत्या केली. राळेगाव तालुक्यातील भांब गावात ही हृदयद्रावक घटना घडली.

राजू बापूराव चुड्डके (४९ वर्षे) असे आत्महत्या केलेल्या शेतक-याचे नाव होते. यवतमाळच्या राळेगाव तालुक्यातील भांब गावामध्ये ते कुटुंबीयांसोबत राहत होते. हा शेतकरी बँकेमध्ये कर्जमाफीच्या यादीमध्ये नाव आले की नाही हे तपासण्यासाठी



गेला होता. पण त्याला यादीमध्ये आपले नाव दिसले नाही. त्यामुळे ते नैराश्येत गेले. बँकेतून घरी आल्यानंतर त्यांनी विष प्राशन करून आयुष्य संपविले.

राजू चुड्डके या शेतक-यांच्या कटुंबीयांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांच्या नावाचा कर्जमाफीच्या यादीत समावेश न झाल्याने ते मानसिक तणावाखाली आले होते. त्यांच्या नावावर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे तसेच चार मायक्रो फायनान्स कंपन्यांचे कर्ज असल्याचे बोलल्या जात आहे. त्यांच्या नावावर मुधापूर ऊजाड येथे १ हेक्टर ३९ आर शेती आहे.

राजू चुड्डके यांनी रात्री १० वाजता विष प्राशन केल्यानंतर कुटुंबीयांनी त्यांना तात्काळ राळेगाव ग्रामीण रुग्णालयात ऊपचारासाठी नेले. ऊपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. राजू यांच्या पाश्चात पत्नी आणि दोन लहान मुलं असा परिवार आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून कर्जबाजारी शेतक-यांच्या प्रश्नांकडे पुन्हा एकदा लक्ष वेधले गेले आहे. या घटनेची नोंद करत पोलिसांनी तपास सुरू केला

# 'नीट'नंतर 'औषध निरीक्षक' परीक्षेचा पेपर फुटला
## तब्बल 90 प्रश्न व्हॉट्सॲपवर व्हायरल?



**मुंबई /प्रतिनिधी**-नीट पेपरफुटी प्रकरणानंतर कोकरोच जनता पार्टीने केलेल्या आंदोलनानंतर अखेर धर्मेंद्र प्रधान यांना केंद्रीय शिक्षण मंत्रीपदाचा राजीनामा द्यावा लागला. एकीकडे नीट पेपरफूटीचे प्रकरण ताजे असतानाच टीईटीचा देखील पेपर फुटला आणि आता महाराष्ट्रात आणखी एक पेपर फुटल्याची माहिती समोर आली आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोग मार्फत घेण्यात आलेल्या औषध निरीक्षक भरतीप्रक्रियेत गैरप्रकार झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.या परीक्षेतील १०० पैकी ९० प्रश्न व्हाट्सॲपवर व्हायरल झाल्याचा विद्यार्थ्यांकडून दावा करण्यात आला आहे. याबाबतचे काही स्क्रीन श?ट्स देखील समोर आले आहेत. ज्यात स्पष्टपणे संबंधित प्रश्न औषध निरीक्षक भरती परीक्षेचे असल्याचा दावा केला जात आहे. दोन ऊमेदवारांनी पुराव्यांसह महाराष्ट्र लोकसेवा आयोग आणि अन्न व औषध प्रशासन विभागाकडे लेखी तक्रार दाखल केली आहे.तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार, २२ मार्च २०२६ रोजी झालेल्या औषध निरीक्षक भरती परीक्षेपूर्वी काही प्रश्न आणि त्यांची ऊत्तरे व्हाट्सॲपवर व्हायरल झाली होती. या प्रश्नांबाबतचे अनेक स्क्रीन शाट विद्यार्थ्यांच्या ग्रुप वर २० मार्च रोजी व्हायरल झाले होते. तसेच प्रश्न फोडण्यासाठी लाखो रुपयांची लाच घेतल्याचा देखील आरोप विद्यार्थ्यांनी केला आहे. यासाठी पाच लाख रुपयांची लाच मागितल्याचा दावा चॅटींगमधून समोर आला आहे. या संपूर्ण भरती प्रक्रियेची स्वतंत्र चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

**आयोगाकडून स्पष्टीकरण**-दरम्यान, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने या प्रकरणावर भूमिका स्पष्ट करत भरती प्रक्रिया अद्याप पूर्ण झालेली नसल्याचे सांगितले आहे. प्राप्त तक्रारीतील तथ्यांची पडताळणी करून आवश्यक ती कार्यवाही केली जाईल, असे आयोगाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

**महेबुब शेख यांची पोस्ट**-राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष महेबुब शेख यांनी एक्सवर या प्रकरणाबाबत पोस्ट करत म्हटले आहे की, टढरऊऔषध निरीक्षक परीक्षा हा केवळ एका पेपरचा प्रश्न नाही, तर हजारो विद्यार्थ्यांच्या भविष्याचा प्रश्न आहे. आज एमपीएससी औषध निरीक्षक परीक्षेबाबत अत्यंत गंभीर प्रश्न ऊपस्थित झाले आहेत.परीक्षेपूर्वी काही ऊमेदवारांकडे प्रश्नपत्रिका ऊपलब्ध असल्याचा प्रकार समोर येत आहे. जर हे सत्य असेल, तर हा केवळ पेपरफुटीचा विषय नाही, तर संपूर्ण परीक्षा व्यवस्थेवरील विश्वासाला हादरा देणारा प्रकार आहे. एका प्रश्नपत्रिकेची किंमत काही पानांची नसते. तिच्यामागे हजारो विद्यार्थ्यांची अनेक वर्षांची मेहनत, पालकांचे कष्ट, त्याग आणि ऊज्ज्वल भविष्याची स्वप्ने असतात. काही मोजक्या लोकांच्या गैरप्रकारामुळे प्रामाणिक विद्यार्थ्यांच्या आयुष्याशी खेळ करण्याचा अधिकार कोणालाही नाही.आमचा लढा विद्यार्थ्यांना न्याय मिळावा यासाठी

आमचा लढा कोणत्याही व्यक्तीविरोधात नाही. आमचा लढा विद्यार्थ्यांना न्याय मिळावा, परीक्षा प्रक्रिया पारदर्शक व्हावी,जनतेचा विश्वास कायम राहावा यासाठी आहे.या संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र, निष्पक्ष आणि सखोल चौकशी झालीच पाहिजे. आमच्याकडे ऊपलब्ध असलेली माहिती आणि पुरावे संबंधित यंत्रणेकडे सादर करण्यास आम्ही तयार आहोत. दोषी कोणताही असो, त्याला कोणतेही राजकीय किंवा प्रशासकीय संरक्षण न देता कठोर कारवाई झाली पाहिजे.

# 'एमपीएससी' पेपरफुटीच्या दाव्यावरून रोहित पवार आक्रमक; सरकारला 10 दिवसांचा अल्टीमेटम

**बारामती / प्रतिनिधी**-राज्यात टीईटी, पोलीस भरती आणि नीट परीक्षेतील पेपरफुटीचे प्रकार ऊघडकीस आले असतानाच, आता थेट महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या पारदर्शकतेवरच मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. एमपीएससी मार्फत घेण्यात आलेल्या औषध निरीक्षक भरती परीक्षेचा पेपर फुटल्याचा दावा करण्यात आला आहे.

महाराष्ट्रातील पेपर लीकचा काळा अध्याय या नावाने पत्रकार परिषद घेत पवारांनी या कथित पेपरफुटीचे धागेदोरे, व्हाट्सॲपवरील पुरावे आणि थेट एमपीएससीच्या ऊच्चपदस्थ अधिका-यांच्या कार्यपद्धतीवर गंभीर आरोप केले आहेत. या प्रकरणी तातडीने कारवाई न झाल्यास येत्या १० दिवसांत रस्त्यावर ऊतरून तीव्र आंदोलन छेडण्याचा थेट इशाराही त्यांनी राज्य सरकारला दिला आहे.

**नंदुरबार कनेक्शन आणि व्हाट्सॲपचा खेळ**- रोहित पवार यांनी या पत्रकार परिषदेत पेपरफुटीची संपूर्ण कार्यपद्धती ऊलगडून दाखवली. त्यांच्या दाव्यानुसार, २२ मार्च २०२६ रोजी औषध निरीक्षक पदाची परीक्षा होती. मात्र, नंदुरबारच्या कौटिल्य अकादमीतील काही विद्यार्थ्यांना २० मार्चलाच म्हणजेच दोन दिवस आधी परीक्षेतील ९० टक्के प्रश्न ऊपलब्ध झाले होते.पैसे दिल्यानंतर संबंधित व्यक्ती



व्हाट्सॲपवर प्रश्न पाठवायचा आणि दोन-तीन मिनिटांतच डिलीट फार ऑल करायचा. मात्र, एका विद्यार्थ्याने ते डाउनलोड केलेले प्रश्न आपल्या मित्राला पाठवले, ज्यामुळे या गैरव्यवहाराचे डिजिटल पुरावे आता आपल्या हाती लागले आहेत, असा दावा रोहित पवारांनी केला आहे.या कथित घोटाळ्याचा थेट संबंध नागरिकांच्या आरोग्याशी जोडत पवारांनी संताप व्यक्त केला. ते म्हणाले, पैसे देउन, पेपर विकत घेउन जर एखादा व्यक्ती औषध निरीक्षक झाला, तर तो प्रामाणिकपणे काम करेल का? त्याचे पहिले टार्गेट गुंतवलेले पैसे वसूल करणे हेच असेल. काही दिवसांपूर्वी कफ सिरपमुळे २२ मुलांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. अशा औषधांची तपासणी करण्याची जबाबदारी याच अधिका-यांवर असते. भ्रष्ट मार्गाने आलेले अधिकारी जनतेच्या जीवाशी खेळ करणार नाहीत कशावरून?

**१० दिवसांचा अल्टीमेटम**-ऑनलाइन परीक्षा पद्धतीवर तीव्र आक्षेप घेत, रोहित पवारांनी एमपीएससी च्या सर्व परीक्षा पूर्वीप्रमाणे ऑफलाइनच घेण्याची ठाम मागणी केली. एमपीएससीने हा घोळ शोधला नाही तर सरकारला हे खूप महागात पडेल. नीट परीक्षेच्या बाबतीत जे झाले ते सरकारने पाहिले आहे. त्यामुळे पुढील १० दिवसांत योग्य कारवाई न झाल्यास आम्ही पुणे किंवा मुंबईत रस्त्यावर ऊतरून मोठे जनआंदोलन ऊभारू, असा इशारा रोहित पवार यांनी दिला आहे.

# 'नीट' फेरपरीक्षेतील अपयशामुळे 19 वर्षीय विद्यार्थिनीची आत्महत्या

**अहिल्यानगर** : वैद्यकीय प्रवेशासाठी अत्यंत महत्त्वाची मानली जाणारी नीट (ग़क्क्च) फेरपरीक्षा देउनही अवघ्या ११ गुणांनी कट ऑफ हुकल्यामुळे आणि ड?क्टर होण्याचे स्वप्न भंगल्यामुळे एका १९ वर्षीय विद्यार्थिनीने गळफास घेउन आत्महत्या केल्याची मन हेलावून टाकणारी घटना घडली आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील जलालपूर येथे ही दुर्दैवी घटना घडली असून अंकिता सुरेश सांगळे (वय १९) असे या मृत विद्यार्थिनीचे नाव आहे. या घटनेमुळे संपूर्ण कर्जत तालुक्यासह अहिल्यानगर जिल्ह्यात तीव्र शोककळा पसरली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अंकिताने २१ जून रोजी झालेली नीट फेरपरीक्षा दिली होती. या फेरपरीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर तिला १६६ गुण मिळाले होते. प्रवेशासाठी आवश्यक असलेला कट ऑफ १७७ गुणांचा असल्याने अवघ्या ११ गुणांनी तिची प्रवेशाची संधी हुकली. अपेक्षेप्रमाणे गुण न मिळाल्याने अंकिता गेल्या काही दिवसांपासून प्रचंड मानसिक तणाव आणि नैराश्याखाली होती.

घटनेच्या दिवशी अंकिताचे वडील आणि भाउ पंढरपूर येथे दर्शनासाठी गेलेले होते. घरामध्ये आई आणि अंकिता दोघीच होत्या. आई घरातील कामांमध्ये व्यस्त असताना, अंकिता अभ्यासासाठी दिलेल्या आपल्या स्वतंत्र खोलीत गेली





आणि तिने सिलिंग फॅनला गळफास लावून घेतला. बराच वेळ झाला तरी अंकिताची कोणतीही हालचाल किंवा आवाज न आल्याने आईने खोलीचा दरवाजा ऊघडून पाहिले असता ही धक्कादायक घटना ऊघडकीस आली. आईच्या आक्रोशानंतर शेजा-यांनी धाव घेत पोलिसांना घटनेची माहिती दिली.

**माझ्या मृत्यूसाठी कोणालाही जबाबदार धरू नका सुसाइड नोट**

घटनास्थळी पोलिसांना अंकिताने लिहिलेली एक भावूक सुसाइड नोट मिळून आली आहे. या चिठ्ठीमध्ये तिने ड?क्टर होण्याचे स्वप्न अपूर्ण राहिल्याची खंत व्यक्त केली आहे.मला परीक्षेत अपेक्षित यश मिळाले नाही आणि कट ऑफपेक्षा कमी गुण मिळाल्याने मी हे पाउल ऊचलत आहे. माझ्या या निर्णयासाठी माझे आई-वडील, भाउ किंवा इतर कोणालाही जबाबदार धरू नये, असा स्पष्ट ऊल्लेख तिने या सुसाइड नोटमध्ये केला आहे.

**पोलीस कारवाई आणि जनप्रतिक्रिया**- घटनेची माहिती मिळताच कर्जत पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक हनुमान गायकवाड यांनी पथकासह घटनास्थळी भेट देउन पाहणी केली. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेउन ऊपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवला असून अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. या घटनेनंतर लोकप्रतिनिधींनी सांगळे कुटुंबीयांची भेट घेउन सांत्वन केले असून, नीट परीक्षेतील गोंधळ आणि स्पर्धात्मक परीक्षांच्या वाढत्या तणावामुळे विद्यार्थ्यांवर येणा-या मानसिक दबावाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

# देशव्यापी नीट परीक्षेवर बंदी आणा

**नवी दिल्ली** : अलीकडच्या काळात झालेल्या पेपरफुटी आणि परिक्षेतील घोटाळ्यांमुळे नॅशनल टेस्टिंग एजन्सीच्या (एनटीए) कार्यक्षमतेवर तसेच परीक्षेच्या



पारदर्शकतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहेत. याच पार्श्वभूमीवर द्रमुक पक्षाने देशव्यापी वैद्यकीय प्रवेश परीक्षा नीटवर तात्काळ बंदी घालण्याची तीव्र मागणी केली आहे. या मागणीसाठी द्रमुकचे खासदार टी. आर. बालू यांनी सोमवारी लोकसभेत कामकाज स्थगन प्रस्तावाची सूचना दिली असून संसदेच्या चालू पावसाळी अधिवेशनादरम्यान यावर बंदी घालण्यात यावी, अशी मागणी केली आहे. मे महिन्यात झालेल्या नीट-यूजी परीक्षेतील पेपरफुटीच्या प्रकरणानंतर देशभरात तीव्र संताप ऊसळला होता. या गैरप्रकाराविरोधात विद्यार्थ्यांची महिनाभर आंदोलने चालली अखेर केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांना आपला राजीनामा द्यावा लागला. दरम्यान, नवी दिल्लीतील जंतरमंतर येथे शांततापूर्ण आंदोलन करणा-या विद्यार्थ्यांवर प्राणघातक शस्त्रांचा कथित आणि अंदाधुंद वापर झाल्याच्या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणीही द्रमुकने केली आहे. प्रधान यांच्या राजीनाम्याची घोषणा झाल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने प्रल्हाद जोशी यांची देशाचे नवे केंद्रीय शिक्षण मंत्री म्हणून नियुक्ती केली.

# राज्यात पुढील चार दिवस पाउस; हवामान विभागाकडून अंदाज

**मुंबई / प्रतिनिधी**-राज्यात सध्या काही भागात मुसळधार, तर काही भागात हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची नोंद होत आहे. दरम्यान, राज्यावरील वादळी पावसाचा प्रभाव वाढत असून पुढील काही दिवस राज्यातील बहुतांश



भागात वादळी वा-यांसह पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. त्यामुळे बुधवारपर्यंत बहुतांश राज्यात पावसाची नोंद होण्याचा अंदाज आहे. दरम्यान, जून महिन्याच्या तुलनेत आतापर्यंत जुलै महिन्यात राज्यात चांगला पाउस नोंदला गेला आहे तर काही भागात पावसाची तूट कायम आहे. हवामान विभागाने आज काही भागांना ऑरेंज, तर काही भागांना यलो अलर्ट दिला आहे. वायव्य बंगालच्या ऊपसागरावर, तसेच ऊत्तर ओडिशा आणि पश्चिम बंगालच्या किनारपट्टीलगत तयार झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्राची तीव्रता वाढली आहे. तसेच पश्चिम राजस्थानावर एक चक्रीय वा-यांची स्थिती सक्रिय आहे. त्यामुळे देशाच्या ऊत्तरेकडील आणि पूर्वेकडील राज्यांवर वादळी पावसाचा प्रभाव वाढताना दिसत असून महारार्ष्ट्रतही कोकण प्रदेशासह मध्य महाराष्ट्रातील घाट प्रदेशात मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता असून विदर्भातही मेघगर्जनेसह वादळी पावसाचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे.

त्यामुळे सोमवारपासून पुढील दोन दिवस राज्यातील बहुतांश भागात पावसाची नोंद होण्याची शक्यता आहे. दरम्यान, राज्यातील काही भागात वादळी वारे वाहत असून मागील काही दिवसांच्या तुलनेत काही प्रदेशात वा-यांची तीव्रता अधिक असल्याचे हवामान विभागाच्या निरीक्षणांवरून निदर्शनास आले आहे.मागील चोवीस तासात राज्यातील कोकण प्रदेशातील ठाणे, रायगड, पालघर, मुंबई तसेच सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी येथे वादळी पावसाची नोंद झाली. तसेच मध्य महाराष्ट्रातील पुणे आणि नाशिक घाट प्रदेशात पावसाचा जोर अधिक असल्याचे दिसून येत आहे, तर मराठवाडा आणि विदर्भातील बहुतांश भागात हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची नोंद झाली. हवामान विभागाने रायगड, रत्नागिरी, सातारा घाट विभाग आणि पुणे घाट विभाग आदी भागांना सोमवारी मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. तसेच मुंबई, ठाणे, सिंधुदुर्ग, कोल्हापूर घाट विभाग, छत्रपती संभाजीनगर, जळगाव, बुलडाणा, जालना, हिंगोली, नांदेड, लातूर, नागपूर, बुलडाणा, गोंदिया आणि गडचिरोली आदी भागांना यलो अलर्ट देण्यात आला असून नंदुरबार, धुळे, नाशिक, अहिल्यानगर, पुणे, धाराशिव, बीड आणि परभणी आदी भागात हलक्या सरींचा अंदाज व्यक्त केला आहे

# देशातील 45 टक्के मुख्यमंत्र्यांवर गुन्हेगारी खटले

**नवी दिल्ली** : भारतासारख्या देशात अजूनही मोठ्या संख्येने जनता दारिद्र्यरेषेखाली जगत आहे. मात्र, देशात असे अनेक नेते आहेत ज्यांच्याकडे पैशाची कमतरता नाही. अलीकडेच, देशातील राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये सत्तेवर असलेल्या मुख्यमंत्र्यांचा एक नवीन अहवाल प्रसिद्ध झाला आहे. त्यातून धक्कादायक माहिती ऊघड झाली आहे.

देशातील ४५% मुख्यमंत्र्यांवर गुन्हेगारी खटले दाखल आहेत. त्यातील चार अब्जाधीश आहेत. ही माहिती एडीआर अहवालातून ऊघड झाली आहे. देशातील अनेक मुख्यमंत्र्यांकडे कोट्यवधी रुपयांची मालमत्ता आहे. गेल्या निवडणुकीदरम्यान दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रांमधून ३१ मुख्यमंत्र्यांविषयी काही महत्त्वाची माहिती ऊघड झाली आहे. या ३१ मुख्यमंत्र्यांपैकी चार जणांकडे १०० कोटींहून अधिक रुपयांची मालमत्ता आहे. असोसिएशन फ?र डेमोक्रॅटिक रिफार्म्स आणि नॅशनल इलेक्शन वाच यांनी प्रसिद्ध केलेला नवा अहवाल देशातील सर्वोच्च राजकारण्यांच्या आर्थिक परिस्थितीचे चित्र सादर करतो. हा अहवाल मागील निवडणुकीदरम्यान सर्व ३१ विद्यमान मुख्यमंत्र्यांनी दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रांच्या आधारे तयार करण्यात आला आहे.एडीआरच्या अहवालानुसार, ३१ पैकी १४ मुख्यमंत्र्यांनी (४५%) त्यांच्यावर दाखल असलेले फौजदारी खटले जाहीर केले आहेत. सर्वात धक्कादायक गोष्ट म्हणजे या १४ मुख्यमंत्र्यांपैकी ११ जणांवर अत्यंत गंभीर गुन्हेगारी आरोप आहेत. या गंभीर प्रकरणांमध्ये हत्येचा प्रयत्न(भारतीय दंड संहितेचे कलम ३०७), लाचखोरी आणि गुन्हेगारी धमकी यांसारख्या गंभीर आरोपांचा समावेश आहे. वृत्तानुसार, दोन मुख्यमंत्र्यांवर हत्येच्या प्रयत्नासारखे गंभीर आरोप आहेत.



**सामान्यांपेक्षा पुढा-यांची संपत्ती अधिक**-भारतीय राजकारण्यांची संपत्ती सामान्य नागरिकांपेक्षा कित्येक पटींनी जास्त असल्याचे मानले जाते. ताज्या अहवालातून हे नेते श्रीमंत असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. सर्व ३१ मुख्यमंत्र्यांची एकूण घोषित संपत्ती ३,६६० कोटी रुपयांपर्यंत पोहोचली आहे. देशातील एका मुख्यमंत्र्यांची सरासरी संपत्ती ११८.०७ कोटी रुपये आहे.

**४ जणांची १०० कोटींपेक्षा अधिक**

या ३१ मुख्यमंत्र्यांपैकी चार जणांची, म्हणजेच १३ टक्क्यांची संपत्ती १०० कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे, म्हणजेच त्यांचा अब्जाधीशांच्या यादीत समावेश आहे. शिवाय, अहवालात मुख्यमंर्त्यांचे स्वतःचे सरासरी ऊत्पन्न ६.५४ कोटी असल्याचे नमूद केले आहे, तर सर्व ३१ मुख्यमंत्र्यांचे एकूण वार्षिक ऊत्पन्न २०३ कोटी आहे.

**एडीआरचे महत्वपूर्ण कार्य**

एडीआर म्हणजेच असोसिएशन फार डेमोक्रॅटिक रिफार्म्स, ही निवडणूक सुधारणांसाठी काम करणारी प्रमुख संघटना आहे. निवडणूक लढवणा-या ऊमेदवारांविषयी, त्यांच्या गुन्हेगारी पार्श्वभूमी, मालमत्ता आणि शिक्षणासह अचूक माहिती जनतेला देणे हे तिचे मुख्य कार्य आहे.

# इथेनालच्या मुद्यावर आप आक्रमक

**नवी दिल्ली** : आम आदमी पार्टी इथेनाल मुद्यावर आक्रमक झाली असून आता मोठ्या आंदोलनाची तयारी पक्ष करत आहे. सरकारने ई २० चा निर्णय मागे



घेतला नाही, तर हे प्रकरण चिघळेल असा इशारा आपने दिला आहे. पक्ष पुढील आठवड्यात पंतप्रधानांच्या निवासस्थानी मोर्चा काढणार आहे. आम आदमी पक्षाचे राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल यांनी एक्स या सोशल मीडिया प्लॅटफार्मवर लिहिले आहे की देशातील तरुणांनी एकत्र येत आवाज उठवल्यामुळे धर्मेंद्र प्रधान यांना राजीनामा देण्यास भाग पडले. आपणही ई-२० विरोधात एकत्र आले पाहिजे. या शनिवारी आम्ही ई-२० विरोधात राष्ट्रीय टाउनहाल आयोजित करत आहोत. तिथे तुम्ही सहभागी होउन ई-२० वर तुमची मते व्यक्त करू शकता. तुम्ही ऑनलाइन देखील सहभागी होउ शकता, असे त्यांनी सांगितले. एक व्हीडीओ शेअर करत अरविंद केजरीवाल म्हणाले की, धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिला आहे. आपण पंतप्रधान मोदींना ई-२० पेट्रोलचा प्रश्न सोडवण्याची विनंती केली आहे. लोक अत्यंत त्रस्त आहेत आणि त्यांची वाहने बंद पडत आहेत. आपण सर्वांनी मिळून आवाज उठवला तरच पंतप्रधान ऐकतील. या शनिवारी, ई२० योजनेवर नाराज असलेल्या आणि त्याविरोधात आवाज उठवणा-या देशभरातील सर्व लोकांना एका व्यासपीठावर एकत्र आणण्याचा आमचा प्रयत्न आहे, असे ते म्हणाले.

# नीट खटल्याची 'फास्ट ट्रॅक' कोर्टात 'स्लो' सुरुवात

नवी दिल्ली : नीट पेपर लीक प्रकरणाच्या फास्ट ट्रॅक कोर्टातील सुनावणीच्या पहिल्याच दिवशी सरकारी वकील गैरहजर राहिल्याने न्यायालयाने सुनावणी तहकूब केली. या प्रकरणाच्या जलद सुनावणीच्या अपेक्षांना अतिशय मंद गतीने सुरूवात झाल्याने धक्का बसला असून पुढील तारखेला सुनावणी होणार आहे. देशभरात गाजलेल्या नीट पेपर लीक प्रकरणाच्या फास्ट ट्रॅक कोर्टातील सुनावणीला पहिल्याच दिवशी विलंब झाला. सरकारी पक्षाचे वकील न्यायालयात हजर न राहिल्यामुळे न्यायालयाने सुनावणी पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला. नीट-यूजी पेपरफुटी रोखण्यासाठी फास्ट ट्रॅक न्यायालयाची स्थापना करणे, हे सरकारचे एक मोठे आश्वासन आहे. या प्रकरणाची पहिली सुनावणी सोमवारी होणार होती. मात्र, पहिल्याच दिवशी अडचण आल्याने सुनावणी ३ ऑगस्टपर्यंत पुढे ढकलण्यात आली. वृत्तानुसार, सुनावणीच्या पहिल्या दिवशी सीबीआयचे वकील हजर राहिले नाहीत. परिणामी, न्यायालयाला नवीन तारीख निश्चित करावी लागली आणि सुनावणी पुढे ढकलण्यात आली.दरम्यान सीबीआयने अटक केलेल्या १३ आरोपींमध्ये दिनेश आणि विकास बिवल यांचा समावेश आहे. पेपरफुटीनंतर ऊमेदवारांना तो वितरित करण्यात सहभागी असल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २३ जुलै रोजी घोषणा केली की, पेपरफुटीशी संबंधित प्रकरणांवर जलदगतीने निर्णय घेण्यासाठी एक जलदगती न्यायालय स्थापन केले जाईल. त्यांनी सांगितले की, तरुणांचे हित हे सरकारचे सर्वोच्च प्राधान्य आहे. नीट पेपरफुटीच्या निषेधार्थ कॉकरोच जनता पक्षाने जंतर मंतरवर ३६ दिवस आंदोलन केले. २० जुलै रोजी, संसदेकडे मोर्चा काढत असताना विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज करण्यात आला. प्रकरण चिघळले. आता विरोधी पक्षांनीही या संपूर्ण मुद्द्यावरून सरकारवर टीका करण्यास सुरुवात केली आहे. दरम्यान, सरकारचे म्हणणे आहे की, त्यांना विद्यार्थी आणि तरुणांबद्दल



पूर्ण सहानुभूती आहे आणि म्हणूनच शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिला आहे. विशेष न्यायाधीश अनु ग्रोव्हर बलिगा यांच्या जलदगती न्यायालयात नीट पेपरफुटी प्रकरणात अटक करण्यात आलेल्या विकास बिवल आणि दिनेश बिवल यांच्या जामीन अर्जांवर सुनावणी होणार होती. आरोपींचे वकील ए. पी. सिंग न्यायालयात ऊपस्थित होते. मात्र, सीबीआयचे कोणतेही वकील हजर राहिले नाहीत. या प्रकरणात तात्काळ सरकारी वकील नियुक्तकरण्याचे निर्देश न्यायालयाने दिले आहेत.या प्रकरणाची सुनावणी आता ३ ऑगस्ट रोजी दिल्लीच्या राउस ॲव्हेन्यू न्यायालयात होणार आहे. पुढील सुनावणीत रीतसर नियुक्त सरकारी वकील ऊपस्थित असावा, असे न्यायालयाने म्हटले आहे. अलीकडेच, सार्वजनिक परीक्षा (गैरप्रकारांना प्रतिबंध) कायदा, २०२४ अंतर्गत एक जलदगती न्यायालय स्थापन करण्यात आले आहे. या न्यायालयात परीक्षेतील अनियमितता आणि पेपरफुटीच्या प्रकरणांची सुनावणी होईल. सरकारने या कायद्यात सुधारणा करण्यासाठी संसदेत एक दुरुस्ती विधेयकही सादर केले आहे. नवीन कायद्यानुसार शिक्षेत जवळपास पाच पटीने वाढ करण्यात आली आहे आणि दोषींना १० वर्षांच्या तुरुंगवासाची तरतूद आहे.


# भारत-नेपाळ सीमेवर धार्मिक तणाव

**सुनसरी** : भारत-नेपाळ सीमेला लागून असलेल्या नेपाळच्या सुनसरी जिल्ह्यात रविवारी रात्री ऊशिरा दोन धार्मिक समुदायांमध्ये संघर्ष झाला. परिस्थिती बिघडल्यावर पोलिसांनी गोळीबार केला, ज्यात २४ वर्षीय ओम प्रकाश मेहता यांचा मृत्यू झाला. डझनहून अधिक लोक जखमी झाले आहेत. यात सुरक्षा कर्मचा-यांचाही समावेश आहे.हा संघर्ष देवगंज ग्रामीण नगरपालिकेच्या कप्तानगंज परिसरात झाला. दोन्ही समुदाय तिथे वेगवेगळे धार्मिक कार्यक्रम करत होते. याच दरम्यान लाउडस्पीकर वाजवण्यावरून आणि धार्मिक झेंडे लावण्यावरून वाद झाला. बघता बघता या प्रकरणाने हिंसक रूप धारण केले. घटनेनंतर प्रशासनाने सोमवारी सकाळी ७ वाजल्यापासून ५ बाजारपेठांच्या परिसरात अनिश्चित काळासाठी निर्बंध लादले आहेत. आता या परिसरात ४ पेक्षा जास्त लोक एकत्र जमू शकणार नाहीत. मिरवणुका, निदर्शने, धरणे आणि सार्वजनिक सभांवरही बंदी घालण्यात आली आहे. पोलिसांनी सांगितले की, परिसरात अतिरिक्त सुरक्षा दल तैनात करण्यात आले आहे. परिस्थितीवर लक्ष ठेवले जात आहे.

# विद्यार्थी आंदोलनादरम्यान एके 47 ने गोळीबार करणा-या अधिका-याचे निलंबन

**नवी दिल्ली** : नीट पेपर लीक प्रकरणाविरोधात देशभरात विद्यार्थी आंदोलन करत असून शनिवारी बिहार बंदची हाक देण्यात आली. यावेळी झालेल्या ऊग्र आंदोलनादरम्यान एका जवानाने सिवानमध्ये एके-४७ रायफलमधून हवेत गोळीबार केला होता. याचा व्हीडीओदेखील सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला. यावर विरोधकांनी संताप व्यक्तकरत विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऊपस्थित केला. दरम्यान आता त्या पोलिसावर मोठी कारवाई करण्यात आली आहे.

सोशल मीडियावर या घटनेचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर पोलिस मुख्यालयाने याची गंभीर दखल घेत संबंधित अधिका-याला तात्काळ निलंबित केले आहे. अभिषेक पटेल असे त्या अधिका-याचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार शनिवारी सकाळी मोठ्या संख्येने विद्यार्थी आणि आंदोलक सिवानच्या गांधी मैदानात जमा झाले होते. नंतर या आंदोलनाने ऊग्र रूप धारण केले. गोंधळ अधिक वाढत गेल्याने पोलिसांनी लाठीचार्ज केला आणि अश्रु धुराच्या नळकांड्या फोडून आंदोलकांना पांगवले. याच गोंधळादरम्यान, एका जवानाने एके ४७ मधून हवेत गोळीबार केल्याचा व्हीडीओ समोर आला. हा व्हीडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाल्यानंतर पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह ऊपस्थित केले गेले,



# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## सत्ताबदलाची आशा?

नेपाळमध्ये सध्याचे आंदोलन हे एका सरकारच्या विरोधापुरते मर्यादित नाही, तर लोकांच्या अपेक्षा आणि शासनाच्या कामगिरीतील वाढलेल्या अंतराचे प्रतीक आहे. परिवर्तनाचे स्वप्न पाहणाऱ्यांनाच आज पुन्हा रस्त्यावर उतरावे लागत असेल, तर ती कोणत्याही लोकशाहीसाठी धोक्याची घंटा आहे. नेपाळने ही परिस्थिती सुधारण्याची संधी न मानल्यास अस्थिरतेचे चक्र पुन्हा सुरू होण्याचा धोका कायम राहील. नेपाळचा राजकीय इतिहास हा नेहमीच अस्थिरतेच्या आणि अचानक येणाऱ्या परिवर्तनांच्या लाटांनी वेढलेला राहिला आहे. राजेशाहीचा अंत, माओवादी बंडखोरी आणि त्यानंतर लोकशाहीचा स्वीकार अशा अनेक वळणांवरून गेलेला हा देश सध्या पुन्हा एकदा एका मोठ्या अंतर्गत संघर्षाच्या आणि तीव्र असंतोषाच्या उंबरठ्यावर उभा आहे. मार्च २०२६ च्या निवडणुकांमध्ये ज्या 'जनरेशन झेड' म्हणजेच तरुण पिढीने एका मोठ्या क्रांतीची अपेक्षा ठेवून रॅपर आणि काठमांडूचे माजी महापौर बालेंद्र शाह यांच्या हाती देशाची सूत्रे सोपवली होती, तीच तरुण पिढी आज त्यांच्याविरोधात रस्त्यावर उतरली आहे. ज्यांनी सत्तेच्या शिखरावर बसवले, त्यांनीच अवघ्या काही महिन्यांमध्ये विरोधाचा झेंडा हाती घेतल्यामुळे नेपाळमधील हा संघर्ष केवळ राजकीय उरलेला नाही, तर एका सामाजिक आणि आर्थिक असंतोषाचा ज्वालामुखी बनला आहे. या ताज्या आंदोलनांची ठिणगी काठमांडूच्या रस्त्यांवर पडली. एका राईड-शेअरिंग ड्रायव्हरने (गणेश नेपाळी) म्युनिसिपल पोलिसांसोबत झालेल्या वादामधून आणि प्रशासकीय जाचाला कंटाळून केलेल्या आत्मदहनानंतर तरुणांच्या संतापाचा उद्रेक झाला; परंतु हे केवळ एका घटनेचे तात्कालिक पर्यवसान नाही. या आंदोलनामागे खोलवर रुजलेली कारणे आहेत. शाह यांच्या सरकारने शहराच्या सुशोभीकरणाच्या आणि शिस्तीच्या नावाखाली हजारो गरीब आणि भूमिहीन झोपडीधारकांना पुनर्वसनाशिवाय बेघर केले. गरिबांना थेट रस्त्यावर आणणाऱ्या या मोहिमांमुळे प्रशासकीय क्रूरतेचा चेहरा समोर आला आणि नेपाळमध्ये नव्याने आंदोलन पेटले.आर्थिक संकट, बेरोजगारी आणि वाढत्या महागाईमुळे आधीच होरपळत असलेल्या नेपाळी तरुणांना नवीन सरकारकडून रोजगाराच्या संधी आणि सहानुभूतीची अपेक्षा होती; परंतु त्याऐवजी त्यांना दंडात्मक कारवाया, प्रशासकीय हुकूमशाही आणि गरिबांना टार्गेट करणारी धोरणे पाहायला मिळाली. शाह यांच्या विरोधातील या तीव्र नाराजीचे विश्लेषण करताना त्यांच्या कार्यपद्धतीचा अभ्यास करणे गरजेचे ठरते. शाह हे पारंपरिक नेपाळी राजकारणाला कंटाळलेल्या मतदारांसाठी बदलाचा एक मोठा चेहरा म्हणून पुढे आले होते. त्यांचा आक्रमक आणि स्पष्टवक्ता स्वभाव तरुणांना आकर्षित करत होता; मात्र सत्तेवर आल्यानंतर हाच आक्रमक स्वभाव एकाधिकारशाही आणि असंवेदनशीलतेमध्ये बदलल्याचा आरोप आता होत आहे. विरोधकांचे म्हणणे ऐकून न घेणे, 'सोशल मीडिया' आणि माध्यमांवर अघोषित बंधने आणण्याचा प्रयत्न करणे आणि जमिनीवरील गरिबांच्या वास्तववादी समस्यांकडे पूर्णपणे डोळेझाक करणे, यामुळे त्यांची लोकप्रियता कमालीची घसरली आहे. ज्या लोकशाही आणि मानवी हक्कांच्या नावावर त्यांनी तरुणांची मते मिळवली, त्याच हक्कांची पायमल्ली नव्या राजवटीत होत असल्याचा सूर उमटत असल्यामुळे शाह सध्या कमालीचे बचावात्मक भूमिकेत आले आहेत.नेपाळमधील या अंतर्गत राजकीय आणि सामाजिक अस्थिरतेचे पडसाद केवळ त्यांच्या सीमांपुरते मर्यादित राहू शकत नाहीत, कारण नेपाळचे भारताशी असलेले संबंध अत्यंत जिव्हाळ्याचे आणि भौगोलिकदृष्ट्या संवेदनशील आहेत. दोन्ही देशांमध्ये असलेली खुली सीमा ही एका बाजूने दोन्ही संस्कृतींना जोडणारा दुवा असली, तरी नेपाळमधील अस्थिरतेच्या काळात ती भारताच्या अंतर्गत सुरक्षेसाठी मोठी चिंतेची बाब ठरते. नेपाळमध्ये अंतर्गत संघर्ष वाढल्यास किंवा कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास सीमेपलीकडून होणारी गुन्हेगारी, अमली पदार्थांची तस्करी आणि भारतविरोधी घटकांची घुसखोरी वाढण्याचा थेट धोका निर्माण होतो. नेपाळमध्ये जेव्हा जेव्हा अंतर्गत असंतोष किंवा राजकीय पोकळी निर्माण होते, तेव्हा चीनसारख्या परकीय शक्तींना तिथे आपला प्रभाव वाढवण्याची मोठी संधी मिळते. नेपाळला या संकटातून बाहेर काढण्यासाठी शाह यांना त्यांच्या प्रशासकीय भूमिकेत बदल करून गरिबांना आणि तरुणांना विश्वासात घ्यावे लागेल. दरम्यान, भारतासाठी हा काळ अत्यंत सावधगिरीने पावले टाकण्याचा आहे. नेपाळचा हा अंतर्गत संघर्ष शांत व्हावा आणि तिथे स्थिर सरकार राहावे, यातच भारताचेही हित सामावले आहे. शेजारी देशातील शांतता हीच भारताच्या सीमेवरील सुरक्षेची सर्वात मोठी हमी असू शकते.राजकीय दृष्टिकोनातून पाहिले तर नेपाळमध्ये 'व्यक्तिकेंद्री बदल' किती टिकाऊ असतो, हा प्रश्न पुन्हा एकदा समोर आला आहे. आंदोलनातून निर्माण झालेल्या सरकारने प्रशासनातील सुधारणा करण्यासाठी सक्षम यंत्रणा उभी केली नाही, तर लोकांचा विश्वास डळमळीत होणे स्वाभाविक आहे. या संपूर्ण परिस्थितीकडे भारताने केवळ शेजारी देशातील अंतर्गत राजकारण म्हणून पाहता कामा नये. भारत आणि नेपाळ यांचे संबंध सांस्कृतिक, आर्थिक, धार्मिक आणि सामाजिकदृष्ट्याही अतिशय जवळचे आहेत. बिघडलेल्या संबंधांचा पहिला परिणाम सुरक्षा व्यवस्थेवर होऊ शकतो. खुल्या सीमेमुळे अस्थिरतेच्या काळात तस्करी, बनावट चलन, शस्त्रांची हालचाल किंवा गुन्हेगारी नेटवर्क सक्रिय होण्याचा धोका वाढतो. भारत आणि नेपाळ यांच्यातील सुरक्षा सहकार्य त्यामुळे अधिक महत्त्वाचे ठरते. याशिवाय भारत हा नेपाळचा सर्वात मोठा व्यापार भागीदार आहे. सीमावर्ती भागातील आंदोलन, वाहतूक अडथळे किंवा प्रशासनातील अस्थिरता यामुळे पुरवठा साखळी विस्कळीत होऊ शकते. त्याचा परिणाम दोन्ही देशांमधील उद्योग आणि सीमाभागातील अर्थव्यवस्थेवर होऊ शकतो.



# आंदोलन अण्णांचे आणि सोनमचे!

**नीट परीक्षा पेपरफुटीची जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, या मागणीसाठी अभिजित दीपकेच्या कल्पनेतून सोशल मीडियावर स्थापन झालेल्या कॉक्रोच जनता पार्टीने जून २०२६ मध्ये दिल्लीतील जंतर-मंतरवर बेमुदत आंदोलन सुरू केले आणि लडाखचे पर्यावरणवादी नेते सोनम वांगचुक यांनी त्या आंदोलनात सामील होऊन आमरण उपोषण सुरू केले. सोनम यांच्या उपोषणाने सर्व देशाचे लक्ष्य वेधले गेले होते..**

पंधरा वर्षांपूर्वी २०११ मध्ये समाजसेवक अण्णा हजारे यांनी लोकपाल विधेयकासाठी दिल्लीच्या रामलीला मैदानावर उपोषण सुरू केले. दोन्ही आंदोलनांमधे राजकीय झेंडा नव्हता. दोन्ही आंदोलनांत व्यासपीठावर राजकीय नेत्यांच्या प्रतिमा नव्हत्या. दोन्ही ठिकाणी आंदोलनात देशातील कानाकोपऱ्यांतून लोक उत्स्फूर्तपणे सहभागी झालेले दिसले. अण्णा हजारे आणि अभिजित दीपके हे दोन्ही महाराष्ट्राचे रहिवासी आहेत. अण्णा अहिल्यानगर जिल्ह्यातील, तर अभिजित मराठवाड्यातील बीड जिल्ह्यातील. सोनम वांगचुक हे लडाखमधील. सोनम हे जंतर-मंतरवर एक बॅग घेऊन आले व आमरण उपोषणाला बसले, तेव्हापासून या आंदोलनाचे महत्त्व वाढले.

अण्णा हजारे व सोनम वांगचुक यांनी केलेल्या मागण्या थेट केंद्र सरकारशी संबधित होत्या. जे मोर्चे काढून व रास्ता रोको करून विरोधी पक्षाला जमले नसते ते अण्णांच्या उपोषणाने साध्य झाले. सोनम हे मेदांत इस्पितळात व अभिजित हे हजारो अनुयायांसह जंतर-मंतरवर थांबले असले तरी आपल्या मागण्यांसाठी दोघेही हटून बसले आहेत. अण्णांचे आंदोलन झाले तेव्हा केंद्रात डॉ. मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसप्रणीत यूपीए सरकार होते. सोनम व अभिजित यांच्या आंदोलन चालू असताना केंद्रात नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली एनडीएचे सरकार आहे. अण्णांच्या आंदोलनावेळी देशात भारतीय जनता पक्ष प्रमुख विरोधी पक्ष होता. सोनम-अभिजित यांच्या आंदोलनावेळी संसदेत काँग्रेस हा प्रमुख विरोधी पक्ष असला, तरी कॉक्रोच जनता पार्टीपासून अंतर ठेवून आहे. अण्णा हजारे यांच्या आंदोलनाला भाजपचा भक्कम व सर्वतोपरी पाठिंबा होता. भाजप परिवार त्यांचे आंदोलन देशातील घराघरांत कसे पोहोचेल यासाठी सक्रिय होता. अण्णांच्या आंदोलनाने भाजपला मोठी मदत होत होती व यूपीए सरकारची मोठी बदनामी होत होती. सोनम-अभिजितच्या आंदोलनाने मोदी सरकारवर दबाव वाढविण्याचे काम केले; पण कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनापुढे सरकारने कुठे नमते घेतले नाही.

अण्णा हजारे यांच्या रामलीला मैदानावरील उपोषणाचे देशातील सर्व म्हणजे किमान शंभर वृत्तवाहिन्यांनी अहोरात्र म्हणजे चोवीस तास थेट प्रक्षेपण चालू ठेवले होते. त्यामुळे अण्णांची महती घराघरांत पोहोचली व सरकावर सतत दबाव वाढत राहिला. सोनम-अभिजितच्या नेतृत्वाखालील आंदोलनाकडे मीडियाने सुरूवातीला दुर्लक्ष केले. सरकारविरोधी आंदोलन आहे, आंदोलकांना शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा पाहिजे आहे म्हणून मीडियाने फारशी दखल घेतली नाही. सरकारविरोधी आंदोलन फार काळ चालणार नाही व त्याला दिलेली प्रसिद्धी ही सरकारला आवडणार नाही, असा समज मीडियाने करून घेतला असावा; पण वीस दिवसांच्या उपोषणानंतर सोनम वांगचुक यांची प्रकृती कमालीची खालावली तेव्हा पोलिसांनी त्यांना वैद्यकीय उपचारासाठी भल्या पहाटे पांढऱ्या चादरीत गुंडाळून जंतर-मंतरवरून अक्षरश: उचलून नेले व सफदरजंग इस्पितळात दाखल केले. त्या क्षणापासून देशातील सर्व भाषिक वृत्तवाहिन्यांवर जंतर-मंतरवरील आंदोलन टीव्हीच्या पडद्यावर व वृत्तपत्रांतून ठळकपणे दिसू लागले.

अण्णा हजारे यांनी सुरू केलेल्या इंडिया अगेन्स्ट करप्शन या आंदोलनाची डॉ. मनमोहन सिंग सरकारने गंभीर दखल घेतली होती. रामलीला मैदानाकडे जाणाऱ्या व येणाऱ्या कोणालाही पोलीस अडवत नव्हते. मीडिया कव्हरेज मुक्तपणे चालू होते. अरविंद केजरीवाल, मनिष सिसोदिया, किरण बेदी, योगेंद्र यादव, आशुतोष उघडपणे मंचावर वावरताना दिसत होते. यूपीए सरकारमधील प्रणव मुखर्जी, ए. के. अँटनी, कपिल सिब्बल, विलासराव देशमुख हे मंत्री अण्णा हजारे यांच्या सतत संपर्कात होते, त्यांच्याशी संवाद साधत होते. अण्णा हजारे व विलासराव देशमुख हे दोघे मराठी. महाराष्ट्राचे नेते म्हणून अण्णांशी विश्वासाने संवाद साधण्याचे काम विलासरावांनी केले. जनलोकपाल विधेयक कसे असावे, यावर ते चर्चा करीत असत. सरकारचे मंत्री व आंदोलक यांच्यात कुठेही कटुता दिसली नाही. रामदेवबाबासुद्धा अण्णांच्या आंदोलनात उघडपणे सहभागी झालेले दिसले. अण्णा हजारे यांची मागणी जनलोकपालची होती, सत्ता परिवर्तन हा शब्द त्यांनी कधी वापरला नाही; पण त्यावेळी सरकारवर भाजपने भ्रष्टाचाराच्या आरोपांचा भडिमार चालू ठेवला होता. स्पेक्ट्रम घोटाळ्यापासून ते खाण घोटाळ्यापर्यंत भाजपने भन्नाट आरोप चालू ठेवले होते. अण्णांच्या भ्रष्टाचारविरोधी आंदोलनामुळे यूपीए सरकारची दिवसेंदिवस कोंडी होत होती. यूपीए सरकारने अण्णांच्या आंदोलनाला कधी विरोध केला नाही. ते देशद्रोही आहेत असे कधी म्हटले नाही. अण्णांना देशभरात मोठे करण्यात भाजपच्या प्रसिद्धी व प्रचार यंत्रणेचा मोठा वाटा होता. रामलीला मैदानावरील आंदोलनाने अण्णा हजारे यांची देशात 'दुसरे गांधी' अशी प्रतिमा निर्माण झाली. यूपीए सरकारच्या वतीने केंद्रीय सचिव आयएएस अधिकारी उमेशचंद्र सारंगी यांच्यावरही त्यावेळी मोठी जबाबदारी सोपविण्यात आली होती. काँग्रेसच्या भ्रष्ट राजवटीपुढे अण्णा हजारे सर्वसामान्य जनतेला देवदूत वाटू लागले. त्याचा सर्व राजकीय लाभ भाजप व केजरीवाल यांना भविष्यात मिळाला. केंद्रात काँग्रेसचे सरकार हटवून भाजपचे सरकार स्थापन होण्यात राम मंदिराबरोबरच अण्णा हजारे यांच्या आंदोलनाचा वाटा मोठा होता. नंतर केजरीवाल यांनी आम आदमी पक्षाची स्थापना केली व तीन वेळा दिल्लीचे मुख्यमंत्री झाले. किरण बेदी भाजपच्या वळचणीला गेल्या, दिल्लीतून निवडणूकही लढवली व नंतर नायब राज्यपालही झाल्या.अण्णा हजारे यांचे आंदोलन बारा दिवस चालले. मनमोहन सिंग सरकारने चर्चा करून त्यांची मागणी मान्य केली. संसदेत तसा ठरावही केला. केंद्रात भाजप सत्तेवर आल्यापासून अण्णा हजारे सामाजिक व राजकीय प्रश्नांवर व परिस्थितीवर शांत आहेत.

सोनम वांगचुक हे लडाखचे नेते. जम्मू-काश्मीरला संरक्षक कवच असलेले घटनेतील ३७० कलम रद्द केल्यावर त्यांनी मोदी सरकारचे स्वागत केले होते; पण लडाखला पूर्ण राज्याचा दर्जा मिळावा, यासाठी त्याचे आंदोलन चालू आहे. या मुद्द्यावर त्यांनी चार वेळा उपोषणे केली आहेत. ते अचानक कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनात सहभागी होण्यासाठी कसे आले?कॉक्रोच जनता पार्टीचे प्रेम व विद्यार्थ्यांविषयी कळवळा त्यांना अचानक कसा वाटू लागला?तीन लाख लोकसंख्येच्या लडाखला पूर्ण राज्याचा दर्जा केंद्र सरकारकडून मिळू शकणार नाही, हे त्यांना ठाऊक नसेल का? संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या अगोदर पोलिसांनी त्यांना भल्या पहाटे उचलले, याची त्यांना खरोखरच कल्पना नव्हती का? सरकारमध्ये मंत्री कोण असावे व कोण नसावे, हा पंतप्रधानांचा अधिकार असतो. मग, लडाखचा नेता दिल्लीत येऊन शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांना हटवा, असे कसे काय सांगू शकतो? मोदी सरकानेच सोनम वांगचुक यांना त्यांचे कार्य पाहून पद्म पुरस्कार देऊन गौरव केला आहे. नंतर लडाख राज्याच्या आंदोलनात चार ठार व असंख्य जखमी झाल्यावर त्यांच्यावर देशद्रोहाचे गुन्हे दाखल करून जोधपूरच्या तुरुंगात ठेवले. तब्बल १७० दिवसांनी त्यांची जेलमधून अचानक सुटका झाली, हेसुद्धा गूढ आहे.

संसद अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी कॉक्रोच जनता पार्टीने 'चलो संसद' असा नारा दिला. सोनम यांना उचलल्यानंतर जंतर-मंतरकडे येणाऱ्या विद्यार्थी व तरुणांचा ओघ वाढला. पोलिसांनी व आंदोलक नेत्यांनी कल्पनाही केली नव्हती एवढी गर्दी जमली. पंधरा हजारांची अपेक्षा असताना लाखावर तरुणाई आली. बारा ते पंचवीस वयोगटातील हजारो मुले-मुली घोषणा देत मोर्चात सामील झाली. पोलिसांनी विद्यार्थ्यांवर बेछूट लाठीमार केला. अश्रुधुराच्या नळकांड्या फोडल्या. रस्त्यावर खाली पडलेल्या मुला-मुलींना अक्षरश: झोडपून काढले. खिळे लावलेल्या लाठ्यांनी मुलांना बदडले. डोकी फुटली. हात-पाय-चेहरे रक्तबंबाळ झाले. काही वृत्तवाहिन्यांनी आंदोलक पोलिसांवर दगडफेक करतानाची दृश्ये दाखवली, तर पोलीसच आंदोलकांवर दगडफेक करीत असतानाचे व्हिडीओ सर्वत्र पोस्ट झाले. दीडशेपेक्षा जास्त जखमी झाले. शंभरपेक्षा जास्त पोलीस इस्पितळात आहेत. असा हिंसाचार अण्णा हजारेंच्या आंदोलनात घडला नव्हता.

गेल्या काही वर्षांत १५२ वेळा पेपरफुटी झाली, नीट पेपरफुटीनंतर २२ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या. कोणाचेच उत्तरदायित्व नाही का? काँग्रेसच्या काळात आरोप झाल्यानंतर अनेक मंत्री, मुख्यमंत्री यांना हटविल्याची उदाहरणे आहेत. बारा वर्षांत मोदी सरकारमधे एकाही मंत्र्याचा राजीनामा घेण्यात आलेला नाही. अपवाद फक्त परराष्ट्र राज्यमंत्री एमजे अकबर यांचा. ते 'मी टू'मध्ये अडकल्याचे आरोप झाले. दोन महिन्यांच्या आंदोलनात आंदोलक व सरकार यांच्यात संवादाचा अभाव होता, अन्यथा हे आंदोलन इतके चिघळले नसते व मरगळल्या विरोधी पक्षालाही आरडाओरड करायला संधी मिळाली नसती. विद्यार्थ्यांनी बॅरिकेडस? तोडून संसद भवनकडे घुसण्याचा प्रयत्न करणे किंवा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पक्षाच्या खासदारांसह पंतप्रधानांच्या निवासस्थानासमोर जाऊन अचानक ठिय्या मांडणे यामुळे आंदोलनाला वेग?ळे वळण लागले. असे अण्णा हजारेंच्या आंदोलनाच्या वेळी घडले नव्हते.

**डॉ. सुकृत खांडेकर**

# झुरळ आंदोलन संपल्याने इंडी आघाडीच्या मनसुब्यावर पाणी !

**इंडी आघाडीला हे आंदोलन संपूच नये असे वाटत होते.त्यांनी जागोजागी मोर्चे,सभा आयोजित केल्या होत्या.या सर्वांना वाटत होते की ही झुरळ पार्टीच्या मंडळी मागण्या मान्य झाल्या तरीही अजून काहीतरी खुसपट काढून आंदोलन पेटते ठेवतील.**

पेपर फुटीवरून देशभरातील तरुणाई 'झुरळ जनता पार्टीच्या'आवाहनाला प्रतिसाद देत एकवटली.सहज गर्दी मिळाली.त्याचा गैरफायदा घेत इंडी आघाडीतील पक्षांनी आंदोलनात घुसखोरी सुरू केली.तरुणाईचा प्रचंड रोष त्यांना दिसला.लगेच त्यांनी देशातील वातावरण अस्थिर व्हावे या हेतूने या आगीत तेल ओतायला प्रारंभ केला.सुरुवातीला ते यशस्वीही झालेत.काही तरुण यांच्या मार्गी लागले देखिल होते.

याच वेळी सरकार देखिल आपला पुरेसा मूर्खपणा सिद्ध करीत होते.ते चर्चेऐवजी लाठीमार,अश्रूगोळे आणि दडपशाहीचा वापर करून आंदोलन मोडीत काढण्याचा तुघलकी प्रयत्न करीत होते.तरुणाई मात्र आपल्या मुद्यावर अडिग होती.त्यांचा वाढता पाठिंबा पाहून सरकारच्या धोतराचा पितांबर झाला.कालांतराने सरकारला चूक लक्षात आली.सरकारने चर्चेची कवाडे खुली केली. झुरळ जनता पार्टीच्या नेतृत्वाने विचलित न होता सरकारशी ठरलेल्या मुद्द्यावर चर्चेला तयारी दाखवली.सरकारने सकारात्मक प्रतिसाद देत चर्चा केली.झुरळांच्या मागण्या मान्य केल्या आणि आंदोलन क्षणार्धात संपले.आणि इंडी आघाडीच्या मनसुब्यावर पाणी फेरले.

पेपरफुटी हा मुद्दा गंभीरच आहे.त्या मुद्यांसाठी सारा देश एकवटला होता.म्हणूनच झुरळ जनता पार्टीला प्रतिसाद मिळत गेला.पण काही राजकीय पक्षांनी त्यात राजकारण घुसवले.मूळ मुद्द्यांना बगल देण्याचा प्रयास केला.थोड्याफार प्रमाणात ते यशस्वीही होऊ लागले.जंतर मंतर वरील काही नारे चिंता वाढविणारे होते.

देशात अघटित होऊ नये म्हणून देशातील जनता चिंताग्रस्त होती.युवकांचा उद्रेक अनावर होण्याची शक्यता होती.संसदेच्या अगदी जवळ युवकांची मांदियाळी पोचली होती.सरकारची अडकित्त्यात सुपारी झाली.गोळ्या घालता येत नाहीत कारण तरुण आपलेच आहेत.हातावर हात धरून बसता येत नाही कारण ते संसदेत घुसू पाहत होते.कसेबसे सर्वांना सावरल्या गेले.

त्यानंतर आंदोलकांनी बहात्तर तासाची मुदत दिली होती.अशा बिकट स्थितीत मोदी सरकारने योग्य पाऊल उचलून झुरळ जनता पार्टीच्या नेतृत्वाशी चर्चा करून त्यांच्या तिनही मागण्या मान्य केल्या.त्यात झुरळ पार्टीचे नेते अभिजित दिपके आणि त्यांच्या सहकारी युवकांचे कौतुक कौतुक करावे तेव्हढे थोडेच.कारण इंडी आघाडीला हे आंदोलन संपूच नये असे वाटत होते.त्यांनी जागोजागी मोर्चे,सभा आयोजित केल्या होत्या.या सर्वांना वाटत होते की ही झुरळ पार्टीच्या मंडळी मागण्या मान्य झाल्या तरीही अजून काहीतरी खुसपट काढून आंदोलन पेटते ठेवतील.पण युवा शक्ती हुशार आणि प्रगल्भ ठरली.त्यांनी एक लेखी मसुदा सरकार समोर ठेवला.सरकारने तो विना विलंब चर्चेतून मान्य केला.क्षणार्धात पत्रकार परिषदेतून झुरळ पार्टीने मागण्या मान्य झाल्यामुळे आंदोलन मागे घेण्याची घोषणा केली.आंदोलकांना जंतर मंतर सोडण्याची आणि आपापल्या घरी जाण्याची सुचना केली.सर्व आंदोलक हर्षोल्हासात घराकडे प्रस्थान करती झाली.



आंदोलन काही क्षणात संपल्यामुळे विरोधकांची गोची झाली.त्यांचे योजलेले मोर्चे,आंदोलने वांझोटे झाले. काही आंदोलनजिवी तर तडफडायला लागले. काय झाले?हे त्यांना कळण्याच्या आत देश शांत झाला. आता काय करावे?आपले पक्ष तर बेरोजगार झालेत! मग त्यांनी सुरू केली श्रेयाची लढाई.काँग्रेस म्हणते की राहुल गांधी यांनी या मुद्द्यावर दहा जनपथ वर मोदींच्या घरासमोर आंदोलन केले म्हणून सरकार झुकले.उबाठा म्हणते आमचा रोज फोन होता! आप म्हणते आमचा सक्रिय सहभाग होता.खर सांगू! हे सर्व फक्त भोजन भाऊ!सर्व श्रेय झुराळांना आणि देशातील सुजान नागरिकांना.युवकांच्या रेट्यामुळे 'या सरकारात राजीनामे नसतात' म्हणणारे राजीनामा देण्यासाठी सिद्ध झाले.

राजकारणात एक नियम आहे.

सर्वनाशे समुत्पन्ने अर्धमत्याजती पंडित:।सर्वनाश होत असेल तर हुशार माणसे अर्धात्याग करतात.मोदींना संकट समोर दिसू लागले.त्यांनी अत्यंत हुशारीने स्थिती हाताळली.आणि धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घेतला.

**यद्यपि सत्यं लोक**
**विरुद्धम,ना**
**करणीयम,नाचरणीयम।**

म्हणजे तुम्हाला तुमची बाजू कितीही सत्य वाटत असेल पण ती जर लोकविरुद्ध असेल तर ती करू नये.तेच मोदींनी केले.त्यासाठी डोके शांत ठेऊन योजना केली.

१)त्यांनी मध्यरात्री एक वक्तव्य माध्यमांतून टाकले.त्याला देशभरातून प्रचंड प्रतिसाद दिसला.

२) त्यांनी सोनम वांगचूक यांच्याशी दवाखान्यात कोणालाच भेटू दिले नाही.उलट सरकारी प्रतिनिधीना पाठवून चर्चा केली आणि श्री.सोनम वांगचूक यांचे उपोषण सोडले.

३) लगेच झुरळ जनता पार्टीच्या प्रतिनिधींशी चर्चा सुरू केली.त्यां चर्चेच्या तीन फेऱ्या केल्या.

४) त्यांनी झुरळ पार्टी सोडून इतरांना किंमत दिली नाही.

प्रत्येक पाऊल योग्य दिशेने पडत गेले.अखेर त्यांना यश मिळाले.झुरळांची मागणीही मान्य झाली आणि विरोधकांचे मनसुबेही उध्वस्त झालेत.देशात अराजकता,अस्थिरता पसरावी ही विरोधकांची ईच्छा होती मात्र आंदोलकांची प्रगल्भता आणि सरकारचा विवेक यामुळे आंदोलन कुठलीही अघटित घटना न घडता यशस्वी झाले.विरोधकांचे इरादे मोडीत काढले,तरुणाईला शांत केले.या सर्व प्रकारात सरकार जिंकले की आंदोलक?हा प्रश्न जनतेवर सोडतो.

**विद्यावाचस्पती**
**प्रा.दिलीप जोशी,** वाशिम.
मो.९८२२२६२७३५

मंगळवार, दि. २८ जुलै २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# जुन्या प्रेमाची सोशल मीडियातून पुन्हा जुळले नाते..!

## मानोली शिवारात विवाहित प्रियकर-प्रेयसीची विष प्राशन करून आत्महत्या

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**घाटंजी, दि. २७ : तालुक्यातील मानोली गावाजवळील शेतशिवारात एका विवाहित महिला आणि विवाहित पुरुषाने विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना सोमवारी (दि. २७) उघडकीस आली. जुन्या प्रेमसंबंधांना सोशल मीडियामुळे पुन्हा उजाळा मिळाल्यानंतर घडलेल्या या दुहेरी मृत्यूने संपूर्ण परिसर हादरला असून, आत्महत्येमागील नेमके कारण अद्यापही गूढच आहे.**



मृतांची ओळख गणेश नामदेव ढोले (३६, रा. मानोली, ता. घाटंजी) आणि अंजली जोगेंद्र मीना (३२, मूळ रा. रामपूरा, राजस्थान) अशी झाली आहे. पोलिसांच्या प्राथमिक माहितीनुसार, सुमारे दहा वर्षांपूर्वी दोघांमध्ये प्रेमसंबंध होते. त्यानंतर अंजली रोजगाराच्या निमित्ताने राजस्थानला गेली. तेथे तिचा विवाह झाला असून तिला दोन मुले आहेत. गणेशाचाही विवाह होऊन तो आपल्या कुटुंबासह मानोली येथे राहत होता. काही दिवसांपूर्वी सोशल मीडियाच्या माध्यमातून दोघांचा पुन्हा संपर्क झाला. त्यानंतर अंजली दोन दिवसांपूर्वी मानोली येथे आली होती. प्राथमिक तपासानुसार, दोघांनी मानोली शिवारातील शेतात एकत्र विषारी औषध प्राशन केले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा करून दोन्ही मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविले. या घटनेमागे कौटुंबिक तणाव, सामाजिक दबाव की अन्य काही कारण होते, याचा तपास सुरू असून पोलिसांनी अद्याप कोणताही ठोस निष्कर्ष जाहीर केलेला नाही. आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून, मोबाईल कॉल रेकॉर्ड, सोशल मीडियावरील संवाद आणि इतर तांत्रिक बाबींचीही चौकशी केली जात आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक केशव ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली संबंधित पोलीस उपनिरीक्षक करीत आहेत. जुन्या प्रेमसंबंधांचा दुर्दैवी शेवट झालेल्या या घटनेची परिसरात सर्वत्र चर्चा सुरू असून, तपासातूनच आत्महत्येचे खरे कारण समोर येणार आहे.

# मंजूर रस्ता कागदावरच? बोरगावात सिमेंट रस्ता ग्रामस्थांचा गंभीर आक्षेप

## चौकशी मागणी, ग्रामपंचायत सचिवांकडे लेखी निवेदन सादर

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पांढरकवडा, दि. २७ :** सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत मंजूर झालेल्या विनायक धोपटे ते कैलास सोनेकर या मार्गावरील सिमेंट रस्त्याच्या कामात अनियमितता झाल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे. मंजूर फलकावरील ठिकाणाऐवजी दुसऱ्याच ठिकाणी रस्त्याचे काम करण्यात आल्याचा दावा करत ग्रामस्थांनी ग्रामपंचायत सचिवांकडे लेखी निवेदन सादर करून सखोल चौकशीची मागणी केली आहे.

निवेदनानुसार, मंजूर कामाच्या फलकावर स्पष्टपणे विनायक धोपटे ते कैलास सोनेकर या मार्गाचा उल्लेख आहे. मात्र प्रत्यक्षात या मार्गावर काम न करता अन्य ठिकाणी सिमेंट रस्ता तयार करण्यात आल्याचा



आरोप करण्यात आला आहे. तसेच ज्या ठिकाणी काम करण्यात आले, तेथील रस्तादेखील अपूर्ण असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.या संपूर्ण प्रकरणात मंजूर आराखडा, प्रत्यक्ष झालेले काम आणि खर्चाची सखोल चौकशी करून वस्तुस्थिती जनतेसमोर आणावी, अशी मागणी करण्यात आली आहे. चौकशीत अनियमितता आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करून मंजूर ठिकाणी तसेच अपूर्ण राहिलेल्या भागात नियमानुसार रस्त्याचे काम पूर्ण करण्यात यावे, अशीही मागणी ग्रामस्थांनी केली आहे. ग्रामपंचायत सचिवांना निवेदन देताना निकेश कुळसंगे, कुलदीप वासेकर, सुभाष पेंदोर, आकाश नैताम, कैलास सोनेकर यांच्यासह अन्य ग्रामस्थ उपस्थित होते. या प्रकरणामुळे बोरगावात चर्चेला उधाण आले असून, संबंधित विभाग या तक्रारीची दखल घेऊन काय कारवाई करतो, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

# शामसुल-उलूम उर्दू हायस्कूल, पुसद येथे पालक-शिक्षक सभेला उत्स्फूर्त प्रतिसाद

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पुसद, दि. २७ :** शामसुल-उलूम उर्दू हायस्कूल, पुसद येथे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या उद्देशाने पालक-शिक्षक सभेचे आयोजन करण्यात आले. या सभेला पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमात सर्व विषय शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगती, नियमित उपस्थिती, शिस्त, अभ्यासाची सवय, मातृभाषा, विज्ञान गणित आणि सामाजिक शास्त्र या विषयांचे महत्त्व तसेच पालकांनी घरामध्ये मुलांच्या अभ्यासाकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

उपस्थित पालकांनीही शाळेच्या उपक्रमांचे कौतुक करत आपली मते व सूचना मांडल्या. या सभेचे प्रमुख मार्गदर्शन मुस्लिम मायनॉरिटीज सोशल वेल्फेअर अँड एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष अतिक यांनी केले. त्यांनी पालकांना मुलांच्या शिक्षणात सक्रिय सहभाग घेण्याचे, शाळेशी सातत्याने संपर्क ठेवण्याचे आणि विद्यार्थ्यांमध्ये चांगले संस्कार व शिस्त रुजविण्यासाठी घर व शाळा यांनी एकत्रितपणे कार्य करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक शेख परवेज होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात पालक व शिक्षक यांच्यातील समन्वय विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाचा असल्याचे सांगितले. यावेळी काझीम,कमरान खान, अब्दुल वाहिद खान, शेख नईम, फारूक तसेच मुफ्ती कलीम रहेमानी यांनीही विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी आवश्यक असलेल्या विविध बाबींवर मौल्यवान मार्गदर्शन केले. सभेच्या शेवटी उपस्थित पालकांचे शाळेतर्फे शेख नईम सर यांनीआभार व्यक्त केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शेख वहीद खान यांनी केले.

# नगरपरिषद पुसद जन्म-मृत्यू पोर्टल तीन महिन्यापासुन बंद, विद्यार्थ्यांच्या भविष्याचे नुकसान.

## शासन व नगरप्रशासनाचा निष्काळपणा,नागरिकात संतापाची लाट!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पुसद, दि. २७ :** नगरपालिकेच्या जन्म व मृत्यू नोंदणी विभागातील ऑनलाइन पोर्टल तब्बल तीन महिन्यांपासून बंद असल्याने नागरिकांची अक्षरशः मोठ्या प्रमाणात फरफट होत असल्याने संताप व्यक्त होत आहे. जन्म, मृत्यू दाखले काढणे, नावातील चुका दुरुस्त करणे, जन्मतारीख किंवा इतर नोंदींमध्ये सुधारणा करणे यासाठी दररोज नगरपालिकेत येणाऱ्या नागरिकांना 'पोर्टल बंद आहे.

असे एकच उत्तर जन्म /मृत्यू नोंदणी विभागातील अधिकारी यांच्या कडून मिळत आहे, काम न करताच त्यांना परत जावे लागत आहे. या गंभीर प्रकाराचा सर्वाधिक फटका दहावी व बारावीच्या



विद्यार्थ्यांना बसत आहे. परीक्षा अर्ज भरण्यापूर्वी जन्म नोंदीतील नाव किंवा इतर तपशीलातील त्रुटी दुरुस्त करणे आवश्यक असते. मात्र पोर्टल बंद असल्यामुळे विद्यार्थ्यांची ही महत्त्वाची प्रक्रिया रखडली असून त्यांच्या शैक्षणिक भवितव्यावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे, तीन महिन्यांपासून पोर्टल बंद असल्यामुळे ऑफलाईन हस्तलिखित दाखले हे शाळेत व शासकीय ऑफिस मध्ये महत्वाच्या कामासाठी घेत नसल्याने मोठ्या अडचणी निर्माण झाल्या आहेत. दररोज जन्म दाखला, मृत्यू दाखला किंवा दुरुस्तीच्या कामासाठी येणाऱ्या नागरिकांना कर्मचारी 'पोर्टल सुरू झाल्यावर या' असे सांगून परत पाठवत असल्याने संतापाची लाट उसळली आहे. प्रशासनाकडून या प्रश्नाकडे होत असलेल्या दुर्लक्षामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. डिसेबर २०२५ मध्ये नगरपरिषदेची सार्वत्रिक निवडणूक होऊन नवीन नगरसेवक निवडून आले मात्र त्यांनी या अत्यंत महत्त्वाच्या समस्यांकडे अद्यापही लक्ष दिले नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. त्यामुळे बंद असलेले जन्म/मृत्यू नोंदणीचे पोर्टल लवकरात लवकर अधिकाऱ्यांनी पाठपुरावा करून चालू करावे अशी शहरातील सर्व विद्यार्थी,पालक व नागरिकांमधून मागणी होत आहे.

# स्व. अजितदादा पवार जयंतीनिमित्त जनसेवा सप्ताह..!

## आरोग्य, शिक्षण, पर्यावरण आणि पक्षबांधणीचा बहुआयामी संदेश

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पुसद, दि. २७ :** स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे पुसद येथे २२ ते २६ जुलैदरम्यान आयोजित जनसेवा सप्ताहाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. आरोग्य, शिक्षण, पर्यावरण संवर्धन, धार्मिक सेवा आणि संघटनात्मक बळकटी या पाच प्रमुख क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करत विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आले.

सप्ताहाची सुरुवात सर्वपक्षीय सभेत स्व. अजितदादा पवार यांच्या प्रतिमेला अभिवादन करून झाली. मोफत रोगनिदान, नेत्रतपासणी व रक्तदान शिबिरातून शेकडो नागरिकांनी आरोग्यसेवेचा लाभ घेतला. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या किल्ल्यांच्या प्रतिकृतींचे वितरण करून शिक्षणासोबत संस्कारांचा संदेश देण्यात आला. पी.एन. महाविद्यालय परिसर व बंजारा कॉलनी येथे "एक वृक्ष – एक संकल्प" अभियानांतर्गत वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. आषाढी एकादशीच्या निमित्ताने बसस्थानक परिसरात हजारो भाविक व प्रवाशांना फराळाचे वाटप करण्यात आले. सप्ताहाचा समारोप नाईक बंगला येथे झालेल्या भव्य पक्षप्रवेश सोहळ्याने झाला. उमरखेड व पुसद तालुक्यातील अनेक नागरिकांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी समाजहिताचे उपक्रम हीच स्व. अजितदादा पवार यांना खरी आदरांजली असल्याचे सांगितले, तर नगराध्यक्ष मोहिनी नाईक यांनी लोकाभिमुख उपक्रमांना भविष्यातही प्राधान्य देण्याची ग्वाही दिली.

# राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेसची ताकद वाढली..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

## असंख्य कार्यकर्त्यांचा पक्षप्रवेश



**उमरखेड, दि. २७ :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गट) उमरखेड शहरात संघटनात्मक विस्ताराला वेग देत असून, शनिवारी झालेल्या पक्षप्रवेश सोहळ्यात असंख्य कार्यकर्त्यांनी पक्षात प्रवेश करून पक्ष बांधणीला नवे बळ दिले. महाराष्ट्राचे राज्यमंत्री इंद्रनील नाईक व जिल्हाध्यक्ष बाळाभाऊ पाटील कामारकर यांच्या हस्ते नव्या कार्यकर्त्यांचे स्वागत करण्यात आले.

राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्या निवासस्थानी झालेल्या कार्यक्रमाला तालुकाध्यक्ष शंकर तालंगकर, कार्याध्यक्ष प्रकाश राठोड, सतीश सव्वाशे, महिला आघाडीच्या तालुकाध्यक्षा वनिता चव्हाण, अल्पसंख्याक तालुकाध्यक्ष शाहरुख पठाण यांच्यासह पक्षाचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते. शहराध्यक्ष दामोदर इंगोले यांच्या नेतृत्वाखाली पक्षप्रवेश सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी बोलताना राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी उमरखेड शहरात राष्ट्रवादी काँग्रेसची संघटना अधिक सक्षम करण्यासाठी कार्यकर्त्यांनी तळागाळात काम करण्याचे आवाहन केले. शहराचा सर्वांगीण विकास आणि पक्षबांधणी या दोन्ही बाबींना प्राधान्य दिले जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. या वेळी आश्विनी भोकरे, दीपाली राठोड, रेखा गायकवाड, यश जाधव, विठ्ठल पवार, श्रीकांत जाधव, अर्जुन चव्हाण, गजानन इंगोले, अथर खतीब, श्रीधर इंगोले, ओमकार वानखेडे, गजानन जाधव, रोहन पातोडे, वीर राठोड यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला.

चौकट :

"भाऊ, उमरखेड शहराकडे विशेष लक्ष द्या" – दामोदर इंगोले

शहराध्यक्ष दामोदर इंगोले यांनी राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांना भावनिक साद घालत, "कार्यकर्त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहा. उमरखेडमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसला मोठी ताकद द्यायची आहे. शहराच्या विकासासह पक्ष संघटनेकडे विशेष लक्ष द्यावे," अशी विनंती केली. त्यावर इंद्रनील नाईक यांनी कार्यकर्त्यांना पूर्ण सहकार्याचे आश्वासन दिले.

# ग्रामीण भागातील आरव भोयर ची शिष्यवृत्ती परीक्षेत दमदार कामगिरी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**झरी जामणी, दि. २७ :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने एप्रिल २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत (इयत्ता ७ वी) आर्या इंटरनॅशनल स्कूल, मुकुटबन येथील आरव दिनेश भोयर याने उल्लेखनीय यश संपादन केले. आरव ने यापूर्वीही विविध शैक्षणिक परीक्षांमध्ये यश मिळवत आपल्या गुणवत्तेची छाप पाडली आहे.

ग्रामीण भागात शिक्षण घेत असताना खासगी शिकवणीचा अभाव आणि मर्यादित शैक्षणिक सुविधा असतानाही आरव ने सातत्यपूर्ण अभ्यास, मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर मिळवलेले हे यश विशेष कौतुकास्पद मानले जात आहे. आरवसह स्वरा संतोष माहुरे,स्वरा विजय सहारे, तनुष्का संजय बरपटवार आणि स्वरा विनोद भल्लुरवार या विद्यार्थ्यांनीही शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळविले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे पालक, शिक्षक व शाळा व्यवस्थापनाकडून अभिनंदन करण्यात आले असून त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

# वैदर्भीय कवी निलकृष्ण देशपांडे यांची 'अभंग रचना' ठरली राज्यस्तरावर सर्वोत्कृष्ट

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

✦ किरण नरवाडे

**महागाव, दि. २७ :** विदर्भ साहित्य परिषदेच्या वतीने अभंग रचना स्पर्धेत ख्यातनाम कवी निलकृष्ण देशपांडे यांची अभंग रचना अव्वल ठरली असुन त्यांनी प्रथम क्रमांक पटकाविला आहे. विदर्भ साहित्य परिषदेतर्फे आयोजित राज्यस्तरीय 'अभंग रचना' स्पर्धेत यवतमाळ जिल्ह्यातील पोहंडुळ येथील ज्येष्ठ कवी निलकृष्ण देशपांडे यांच्या अभंग रचनेने बाजी मारली आहे.



या स्पर्धेत त्यांच्या रचनेला सर्वोत्कृष्ट ठरवून प्रथम पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. या प्रतिष्ठित स्पर्धेसाठी महाराष्ट्रासह गोवा, कर्नाटक, केरळ, मध्य प्रदेश, गुजरात या राज्यांतून तसेच अमेरिका, आफ्रिका आणि दुबई येथील मराठी कवींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला होता. देश-विदेशातून आलेल्या सुमारे ४०० कवींच्या अभंग रचनांमधून देशपांडे यांच्या रचनेची प्रथम पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. आपल्या वैशिष्ट्यपूर्ण आणि भावगर्भ काव्यशैलीसाठी ख्यातनाम असलेल्या देशपांडे यांना यापूर्वीही अनेक मानाच्या काव्य पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. आतापर्यंत त्यांचे आठ कवितासंग्रह प्रकाशित झाले असून, या नव्या यशामुळे त्यांच्या काव्यप्रवाहात आणखी एक सुवर्णपान जोडले गेले आहे. त्यांच्या या यशाबद्दल साहित्यिक, राजकीय व सामाजिक क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# खून प्रकरणात मुख्य आरोपीला जन्मठेप..!

**यवतमाळ, दि. २७ :** गाजलेल्या हेमंत कांबळे खून प्रकरणात प्रमुख जिल्हा व सत्र न्यायालयाने मुख्य आरोपी श्याम सुभाष जोगदंड याला दोषी ठरवत जन्मठेपेची शिक्षा सुनावली. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश मा. आनंद एल. यावलकर यांनी भारतीय दंड संहितेच्या कलम ३०२ अंतर्गत जन्मठेप व दंड, तसेच कलम ५०६ अंतर्गतही शिक्षा सुनावली. तर समान हेतू सिद्ध न झाल्याने सहआरोपी कार्तिक यादव याची निर्दोष मुक्तता करण्यात आली. २ जून २०२४ रोजी हेमंत कांबळे यांच्यावर धारदार चाकूने प्राणघातक हल्ला करण्यात आला होता. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. खटल्यादरम्यान प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराची विश्वासार्ह साक्ष, वैद्यकीय व न्यायवैद्यक अहवाल तसेच आरोपीच्या सांगण्यावरून जप्त करण्यात आलेल्या चाकूवरील मृतकाच्या रक्तगटाचे रक्त आढळल्याने वैज्ञानिक पुरावे निर्णायक ठरले. न्यायालयाने मृत्यू हा चाकूच्या वारामुळे झालेला खून असल्याचे स्पष्ट केले. आरोपीने यापूर्वी मृतकाला जीवे मारण्याच्या धमक्या दिल्याची स्टेशन डायरीतील नोंदही महत्त्वाची ठरली. एफआयआर दाखल होण्यास झालेला विलंब परिस्थितीजन्य असल्याने तो अभियोजनाच्या विरोधात जात नसल्याचे न्यायालयाने नमूद केले. तसेच डॉग स्क्वॉड अहवाल व तपासातील किरकोळ त्रुटी आरोपीला निर्दोष ठरविण्यास पुरेशा नसल्याचेही न्यायालयाने स्पष्ट केले.या खटल्यात सरकारी पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता ॲड. एन. एन. पांडे यांनी प्रभावी युक्तिवाद केला. त्यांना सहाय्यक वकील ॲड. राहुल एस. पाटील यांनी सहकार्य केले. न्यायालयाच्या या निकालामुळे गंभीर गुन्ह्यांमध्ये वैज्ञानिक पुरावे आणि ठोस साक्षीचे महत्त्व पुन्हा अधोरेखित झाले.

# थोडक्यात



## माऊंट लिटरा झी स्कूलमध्ये भक्तिरसात न्हाली आषाढी एकादशी

**महागाव :** आषाढी एकादशीच्या निमित्ताने महागाव येथील माऊंट लिटरा झी स्कूलमध्ये विठ्ठल-रुक्मिणी पूजन, वारकरी दिंडी आणि अभंग-भजनाच्या गजरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले. विद्यार्थ्यांनी वारकरी वेशभूषा परिधान करून टाळ, मृदुंग व भगव्या पताकांसह काढलेल्या दिंडीने परिसर दुमदुमून गेला. "ज्ञानोबा-तुकाराम" व "विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल"च्या जयघोषात विद्यार्थ्यांनी वारकरी परंपरेचे दर्शन घडविले.

कार्यक्रमात वारकरी वामनराव हनवते व दत्तराव मदने यांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पांडे यांनी विठ्ठल-रुक्मिणी पूजन करून भारतीय संस्कृती, भक्ती आणि संस्कारांचे महत्त्व अधोरेखित केले. यावेळी मुख्याध्यापिका मंजू जोशी, सचिव परवेज सुरय्या, विशाल पांडे, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सांस्कृतिक उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये अध्यात्म, संस्कृतीप्रेम आणि सामाजिक एकात्मतेची भावना रुजविण्याचा संदेश देण्यात आला.



## उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त राळेगावात रुग्णांना फळवाटप

**राळेगाव :** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) राळेगाव तालुक्याच्या वतीने पक्षप्रमुख तथा माजी मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसा निमित्त ग्रामीण रुग्णालय, राळेगाव येथे दाखल रुग्णांना फळांचे वाटप करण्यात आले. यावेळी कोरोना काळात उद्धव ठाकरे यांनी राज्यातील आरोग्य व्यवस्थेसाठी तज्ज्ञ डॉक्टरांची टास्क फोर्स स्थापन करून केलेल्या प्रभावी उपाययोजनांचा उल्लेख करत त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाला तालुकाप्रमुख विजय पाटील, शहरप्रमुख शंकर गायधने, महिला शहर संघटिका पार्वता मुखरे यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते. ग्रामीण रुग्णालयाचे आरोग्य अधिकारी डॉ. मडावी तसेच आरोग्य कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमासाठी सहकार्य केले.




## टाळ-मृदंगाच्या गजरात आर्या इंटरनॅशनल स्कूलची आषाढी दिंडी..!

### संतविचारांचा दिला समाजप्रबोधनाचा संदेश

**मुकुटबन :** ज्ञानदा बहुउद्देशीय ग्रामीण विकास संस्था संचलित आर्या इंटरनॅशनल स्कूल, मुकुटबन येथे आषाढी एकादशी निमित्त २५ जुलै रोजी भव्य पालखी सोहळा व दिंडी रॅली उत्साहात पार पडली. नर्सरी ते चौथीच्या विद्यार्थ्यांनी वारकरी वेशभूषेत टाळ-मृदंगाच्या गजरात "जय हरी विठ्ठल"चा जयघोष करत ओम नगरी ते बसस्थानक असा पालखी सोहळा काढला. मार्गात वारकरी भक्तांनी विठ्ठल-रुक्मिणी साकारलेल्या विद्यार्थ्यांचे पाय धुऊन ओवाळणी करत स्वागत केले. बसस्थानक परिसरात विद्यार्थ्यांनी रिंगण सोहळा सादर करून उपस्थितांची मने जिंकली. संतांचे विचार, सामाजिक ऐक्य आणि पर्यावरण संवर्धनाचे संदेश देणारे फलक हातात घेऊन विद्यार्थ्यांनी जनजागृती केली. परिसर भक्तिमय वातावरणाने दुमदुमला. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व पालकांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## प्रा. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट, बडनेरा यांना

# यूजीसीकडून सत्र २०२६-२७ पासून स्वायत्त दर्जा प्राप्त

**अमरावती/का.प्र.**

विदर्भ यूथ वेल्फेअर सोसायटी संचलित प्रा. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट, बडनेरा या महाविद्यालयाला विद्यापीठ अनुदान आयोग (UGC) तर्फे सत्र २०२६-२७ पासून स्वायत्त (Autonomous) महाविद्यालयाचा दर्जा प्राप्त झाला आहे. ही महाविद्यालयासाठी अत्यंत अभिमानाची आणि ऐतिहासिक उपलब्धी आहे.

याबाबत आयोजित पत्रकार परिषदेत संस्थेचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे यांनी ही माहिती दिली. यावेळी उपाध्यक्ष ॲड. उदय देशमुख, सचिव युवराजसिंग चौधरी, कोषाध्यक्ष प्रा. डॉ. हेमंत देशमुख, कार्यकारी सदस्य नितीन हिवसे, डॉ. पूनम चौधरी, पंकज देशमुख, प्रा. विनय गोहाड आणि प्रा. गजानन काळे, तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय ठाकरे उपस्थित होते.यावेळी उपस्थित व्यवस्थापनाने प्राचार्य डॉ. अजय ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली सर्व विभागप्रमुख,



डीन,प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी केलेल्या अथक परिश्रमांचे कौतुक करून त्यांचे अभिनंदन केले.

संस्थेचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे यांनी सांगितले की, 'स्वायत्त दर्जा हा महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन, नवोपक्रम आणि उत्कृष्टतेच्या सातत्यपूर्ण प्रवासाला मिळालेली मोठी दाद आहे. हा दर्जा विद्यार्थ्यांना अधिक गुणवत्तापूर्ण, उद्योगाभिमुख आणि जागतिक दर्जाचे शिक्षण देण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण टप्पा ठरेल.'

प्राचार्य डॉ. अजय ठाकरे यांनी सांगितले की, 'स्वायत्त दर्जामुळे महाविद्यालयाला उद्योगाच्या गरजांनुसार अभ्यासक्रम विकसित करण्याचे, आधुनिक मूल्यमापन पद्धती राबविण्याचे, कौशल्याधारित शिक्षणाला प्रोत्साहन देण्याचे तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अधिक प्रभावी शैक्षणिक उपक्रम राबविण्याचे स्वातंत्र्य प्राप्त होणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धात्मक संधी अधिक प्रभावीपणे उपलब्ध होतील.'

पत्रकार परिषदेत उपस्थित पत्रकारांनी स्वायत्त दर्जामुळे महाविद्यालयात होणारे शैक्षणिक बदल, नवीन अभ्यासक्रम, उद्योग-संलग्न उपक्रम आणि विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध होणाऱ्या नव्या संधींबाबत विचारलेल्या प्रश्नांना व्यवस्थापन व प्राचार्यांनी सविस्तर उत्तरे दिली.

# 'विशेष सखोल पुनरीक्षण-२०२६' मोहिमेचे सुधारित वेळापत्रक जाहीर

**अमरावती/का.प्र.**

विधानसभा मतदारसंघांच्या मतदार याद्या अचूक, अद्ययावत व दोषविरहीत करण्यासाठी भारत निवडणूक आयोगामार्फत राबविण्यात येणाऱ्या 'विशेष सखोल पुनरीक्षण २०२६' मोहिमेचे सुधारित वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. या मोहिमेंतर्गत अमरावती विभागातील सर्व जिल्ह्यांमध्ये ३० जून ते ८ ऑगस्ट २०२६ या कालावधीत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी प्रत्येक मतदाराच्या घरी जाऊन माहितीची पडताळणी करणार आहेत, अशी माहिती अपर आयुक्त (सामान्य प्रशासन) सुरज वाघमारे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

सुधारित कार्यक्रमानुसार मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण ८ ऑगस्टपर्यंत पूर्ण करण्यात येणार असून, १७ ऑगस्ट रोजी मतदार याद्यांचा प्रारूप (मसुदा) प्रसिद्ध केला जाईल.

त्यानंतर १७ ऑगस्ट ते १६ सप्टेंबर या कालावधीत दावे व हरकती स्वीकारण्यात येतील. त्यावरील सुनावणी व निकाली काढण्याची प्रक्रिया १५ ऑक्टोबरपर्यंत पूर्ण करून १९ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

या मोहिमेदरम्यान प्रत्येक घरात जाऊन गणना प्रपत्र भरून घेतील. यामध्ये मतदाराची सध्याची माहिती, पूर्वीच्या एसआयआर यादीशी जुळवणी, जन्मतारीख तसेच मोबाईल क्रमांक व आधार क्रमांक (ऐच्छिक) नोंदविण्यात येईल. प्रपत्रावर मतदार किंवा कुटुंबातील प्रौढ सदस्याची स्वाक्षरी आवश्यक असून भरलेल्या प्रपत्राची प्रत मतदाराला देण्यात येईल.

गृहभेटीदरम्यान घर बंद आढळल्यास बीएलओ संपर्कासाठी सूचना ठेवतील. त्यानंतरही प्रतिसाद न मिळाल्यास आणखी दोन वेळा भेट दिली जाईल. सलग तीन भेटींमध्ये मतदार अनुपस्थित, स्थानांतरित किंवा उपलब्ध न झाल्यास त्याचे नाव प्रारूप मतदार यादीत समाविष्ट केले जाणार नाही.

मागील यादीशी जुळवणी न झाल्यास किंवा माहितीमध्ये विसंगती असल्यास जन्म दाखला, पासपोर्ट, दहावीचे प्रमाणपत्र, कायमस्वरूपी निवासी प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, शासकीय ओळखपत्र, वनहक्क प्रमाणपत्र, जमीन किंवा घर वाटप प्रमाणपत्र, कुटुंब नोंदवही तसेच ओळखीसाठी आधार कार्ड यांसारख्या वैध कागदपत्रांपैकी कोणताही एक पुरावा सादर करता येणार आहे. समतुल्य शासकीय अथवा शैक्षणिक कागदपत्रेही ग्राह्य धरली जाणार आहेत.

नागरिकांना voters. eci. gov.in या संकेतस्थळावर किंवा ECINET Voter Helpline App द्वारे ऑनलाईन अर्ज सादर करण्याची सुविधा उपलब्ध असून 'Book a Call' पर्यायाद्वारे BLO भेटीची वेळही निश्चित करता येईल. मात्र, ऑनलाईन अर्ज भरला असला तरी BLO मार्फत प्रत्यक्ष गृहभेट व पडताळणी अनिवार्य राहणार आहे. तसेच १ ऑक्टोबर २०२६ पर्यंत १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या नवमतदारांना प्रारूप यादी प्रसिद्ध झाल्यानंतर फॉर्म-६ भरून मतदार नोंदणी करता येणार आहे.

लोकप्रतिनि धित्व कायद्यानुसार एकापेक्षा अधिक ठिकाणी मतदार म्हणून नोंदणी करणे हा गुन्हा असून चुकीची माहिती दिल्यास दंड व कारावासाची तरतूद आहे. त्यामुळे नागरिकांनी सध्या वास्तव्यास असलेल्या पत्त्यावरच माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.अनुपस्थित, स्थानांतरित, मृत किंवा दुबार नावे असलेल्या मतदारांची यादी कारणांसह सार्वजनिक नोटीस बोर्ड, राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना तसेच अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाणार आहे.

दरम्यान एसआय आर मोहिमेच्या नावाखाली येणाऱ्या बनावट संदेशांपासून सावध राहण्याचे आवाहनही प्रशासनाने केले आहे.

## लोणी येथे श्रीसंत गुलाबराव महाराज जन्मोत्सव आनंद सोहळा

**नांदगाव खंडेश्वर**-लोणी टाकळी येथील श्री संत गुलाबराव महाराज संस्थान येथे आषाढी एकादशीनिमित्त चार दिवसीय जन्मोत्सव आनंद सोहळा साजरा करण्यात आला. या सोहळ्यात परिसरासह विविध भागांतून हजारो भाविकांनी उपस्थित राहून संतांचे दर्शन घेतले. या सोहळ्यात नित्य स्थापना, गुलाब गौरव पारायण, हरिपाठ, भजन, वेदपठण आणि संतांच्या जीवनकार्यावरील प्रवचनांचे आयोजन करण्यात आले. समारोपाच्या दिवशी मूर्ती अभिषेक, वेद विद्यालयातील विद्यार्थ्यांचे वेदपठण, पालखी सोहळा आणि महाप्रसादाला भाविकांचा प्रतिसाद लाभला. सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी संस्थानचे पदाधिकारी, स्वयंसेवक आणि ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले.

संत विचारांचा प्रसार आणि अध्यात्माची जागृती घडविणारा हा सोहळा यशस्वी ठरल्याची भावना उपस्थित भाविकांनी व्यक्त केली.

## नारायणदास लढ्ढा हायस्कूलमध्ये गुणवतांचा सत्कार

**अमरावती/का.प्र.**

स्थानिक नारायणदास लढ्ढा हायस्कूल मध्ये मार्च २०२६च्या शालांत परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला. या गुणगौरव सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी ब्रजलाल बियाणी शिक्षा समितीचे माजी अध्यक्ष व विद्यमान शाळा समिती अध्यक्ष ॲड. अशोक राठी तर प्रमुख अतिथी म्हणून शिक्षणाधिकारी प्रिया देशमुख लाभल्या. तसेच सहाय्यक आयुक्त वैशाली पाथरे विशेष अतिथी म्हणून लाभल्या.कार्यक्रमास संस्थेचे सचिव सुनील गोयनका उपस्थित होते.



अभिनंदन सोहळ्याची सुरुवात सरस्वती पूजन व दीप प्रज्वलनाने करण्यात आली.स्वराज ठोंबरे याने शारदास्तवन सादर केले.तदनंतर कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी माननीय प्रिया देशमुख व वैशाली पाथरे यांचे शाल, सन्मान चिन्ह व रोपटे येऊन यथोचित स्वागत करण्यात आले.प्रास्ताविक मुख्याध्यापिका सुषमा माळवे प्रस्ताविकातून शाळेचा निकाल दरवर्षी प्रमाणे शंभर टक्के लागल्यामुळे शिक्षकांचे कौतुक करीत गुणवंत विद्यार्थ्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.मान्यवरांच्या हस्ते प्राविण्यप्राप्त विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र व तुळशीचे रोपटे प्रदान करून आई-वडिलांसह सन्मानित करण्यात आले. तर विषयनिहाय सर्वाधिक गुणप्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना विषय शिक्षकांकडून रोख पारितोषिक प्रदान करण्यात आले.या प्रसंगाचे औचित्य साधून राजस्थान समाजातील वर्ग ५ वी ते १० वी मधील गरजू विद्यार्थ्यांना स्व. गुलाबदेवी श्रीनिवासजी लढ्ढा यांच्या स्मृती प्रित्यर्थ रोख पारितोषिक देण्यात आले.


याप्रसंगी सत्कार सोहळ्याच्या प्रमुख अतिथी माननीय प्रिया देशमुख यांनी आपल्या मनोगतातून शिस्त, आत्मविश्वास व सातत्यपूर्ण परिश्रम यांच्या बळावर जीवनात यशाचे सर्वोच्च शिखर गाठण्याचे आवाहन केले. तसेच माननीय वैशाली पाथरे यांनी विद्यार्थ्यांनी केवळ गुणांच्या मागे न धावता सामाजिक जाणीव व नैतिक मूल्यांची जोपासना करावी असा मौलिक संदेश दिला.अध्यक्ष अशोक राठी यांनी शाळेच्या व विद्यार्थ्यांच्या उज्वल यशाबद्दल आनंद व्यक्त करून गुणवंत विद्यार्थ्यांचे, पालकांचे व शिक्षकांचे अभिनंदन केले. आनंदी माळोदे या विद्यार्थिनीने तर पालकांमधून छाया सोनोने यांनी मनोगत व्यक्त केले.

शिक्षिका पौर्णिमा कुराडा यांनी संचालन व प्रमुख अतिथींचा परिचय करून दिला. शेवटी कार्यक्रमाला उपस्थित सर्व मान्यवरांचे व पालकवृंदांचे आभार मानून पसायदानाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## अंजनगाव बारी ते रायसोनी विद्यापीठ मार्ग वेढला झुडुपांनी

### सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष; छाटणी करण्याची नागरिकांची मागणी

**अंजनगाव बारी/वार्ताहर**



रा.मा. २९६ अंजनगाव बारी ते रायसोनी विद्यापीठ या मार्गाच्या दोन्ही बाजूंनी मोठ्या प्रमाणात झुडुपे व वेलींनी रस्त्याला वेढा घातला आहे. अनेक ठिकाणी झुडुपे रस्त्याच्या कडेला वाढल्याने वाहनचालकांना समोरून येणारी वाहने दिसण्यास अडचण निर्माण होत असून अपघाताची शक्यता वाढली आहे.

हा मार्ग आधीच तुलनेने अरुंद असून दोन्ही बाजूंनी वाढलेल्या झुडुपांमुळे दुचाकीस्वार, सायकलस्वार तसेच पादचाऱ्यांना मोठी गैरसोय होत आहे. या परिसरात वन्यप्राण्यांचा वावर असल्याने अचानक प्राणी रस्त्यावर येण्याचाही धोका कायम आहे. त्यामुळे शेतकरी, विद्यार्थी व नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.नागरिकांनी सार्वजनिक बांधकाम विभाग आणि वनविभागाने संयुक्तपणे तातडीने झुडुपांची छाटणी करून रस्ता सुरक्षित करावा, अशी मागणी केली आहे. वेळेत उपाययोजना न केल्यास भविष्यात गंभीर अपघात घडण्याची शक्यता नागरिकांनी व्यक्त केली आहे.

## चिखलदरा तालुक्यातील विविध विकास कामे रखडली;पालकमंत्र्यांना निवेदन

**अचलपूर/वार्ताहर**

चिखलदरा तालुक्यातील नागरिकांना अनेक मुलभूत सुविधा व रखडलेल्या विकास कामांच्या संदर्भात युवा स्वाभिमान पक्षाच्या वतीने अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्र्यांना निवेदन देऊन पर्यटन तसेच रोजगार निर्मितीसाठी काही प्रमुख मागण्या करण्यात आली आहे.



या निवेदनात पर्यटनाच्या दृष्टीने स्कायवॉकचे काम, केरोनेशन पार्कचे काम लवकर पूर्ण करावे, बागलिंग येथुन जी पाणीपुरवठा पाईपलाईन पाणीपुरवठा टाकण्यात आली. त्यामधे चिखलदरा शहराचा समावेश करण्यात यावा. चिखलदरा तालुक्यातील प्रलंबित विकासकामांचा विशेष आढावा घेऊन त्याना मंजुरी व निधी उपलब्ध करून द्यावा या इतर मागण्या करण्यात आल्या.यावेळी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंत्रालयलस्तरावर बैठक घेण्याचे आश्वासन दिले. यावेळी युवा स्वाभिमानचे जिल्हा कार्याध्यक्ष उपेन बछले, चिखलदरा शहराध्यक्ष आनंद गौर, शेख अंसार, अश्विन मिश्रा, शिवम शर्मा, खेमराज तिवारी, प्रवीण धुर्वे, राहुल काळे उपस्थित होते.

# चिखलद-यात पालकमंत्र्यांनी घेतले देवी मंदिराचे दर्शन

**अमरावती/का.प्र.**

जिल्ह्याचे पालकमंत्री व राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे यांनी चिखलदरा येथील देवी मंदिराला भेट देऊन दर्शन घेतले. याप्रसंगी आमदार प्रविण पोटे पाटील, आ.राजेश वानखडे,आ. प्रविण तायडे, आ. केवलराम काळे यांचेसह माजी खासदार सौ. नवनीत राणा व ग्रामीण भाजपा जिल्हाध्यक्ष प्रभुदास भिलावेकर उपस्थित होते.

याप्रसंगी सत्कार कार्यक्रमाचे संचालन करतांना संस्थानचे सचिव रविंद्र कर्वे यांनी मंदिराचा इतिहास सांगताना पांडवकालीन असल्याचे सांगितले. पांडव अज्ञातवासात असतांना विराट नगरीचा भाग असलेल्या या मेळघाट च्या घनदाट जंगलात आश्रयाला होते. त्यांनी



द्रौपदीसाठी या विशाल प्रस्तराखाली असलेल्या खोल गुहेत देवीची स्थापना केली. तीच अंबादेवी परिसरातील हजारो वनवासी, गवळी, गोंड, कोरकू परिवारांची कुलदेवता म्हणून पूजिली जाते.चैत्र व आश्विन नवरात्रोत्सव मोठ्या प्रमाणावर होत असून मोठ्या संख्येने भाविक दर्शनाला येत असतात.याच चिखलदऱ्याचे महाभारत कालीन नाव कीचकदरा हे होते कारण भीमाने कीचक याचा वध केला होता व शरीराचा दाह कमी होण्यासाठी ज्या कुंडात स्नान केले ते आज भीमकुंड या नावाने ओळखले जाते.पुढा ब्रिटीश काळात कीचकदरा चा अपभ्रंश होऊन चिखलदरा हे नाव प्रचलीत झाले असा इतिहास या भागातील वयोवृध्द लोक सांगतात.

तत्कालीन मुख्यमंत्री सुधाकर नाईक यांनी या देवी मंदिराचे व्यवस्थापन १९९२ साली दिल्याचेही सांगितले. मंदिराने केलेले विकासात्मक बदल व पारदर्शी कारभार यावर मंत्री तसेच उपस्थित सर्वांनी समाधान व्यक्त करून भविष्यात आणखी मदत करण्याचे आश्वासन दिले.

# अभंगातून माणसाला जगण्याची नवी ऊर्जा-डॉ. श्यामसुंदर निकम

**अमरावती/का.प्र.**

विठ्ठल नामात अलौकिक अशी शक्ती असून ही शक्तीचं आपणास कोसो दूर न थकता न दूखता पायी चालण्यास संचालीत करीत असते.त्यामुळेच शेकडो वर्षांपूर्वी लिहिल्या गेलेले ज्ञानोबा - तुकोबाचे अभंग आजही आपल्याला तेवढीच प्रेरणा देऊन जातात.म्हणूनचं अभंगातून माणसाला जगण्याची नवी ऊर्जा प्राप्त होत असते असे प्रतिपादन अभंगवारी काव्यमहोत्सवाचे अध्यक्ष माजी जिल्हा शल्य चिकित्सक तथा जेष्ठ साहित्यिक डॉ. श्यामसुंदर निकम यांनी केले.

संवेदना बहुद्देशीय संस्था,तसेच परिवर्तन प्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमाने आषाढी एकादशीच्या पावन पर्वावर प्राचार्य डॉ. शोभा रोकडे यांच्या वाढदिवसाच्या निमित्याने अभंगवारी काव्यमहोत्सवाचे आयोजन कांचन रिसॉर्ट, नवसारी रिंगरोड येथे करण्यात आले होते.काव्यमहोत्सवाच्या उदघाटनपर सत्राचे अध्यक्ष डॉ.श्यामसुंदर निकम, ज्येष्ठ साहित्यिक तथा विचारवंत अमरावती,स्वागताध्यक्ष सुदर्शनजी गांग,विश्वस्त अखिल भारतीय जैन संघटना, उद्घाटक कांचन उल्हे, ज्येष्ठ साहित्यिक तथा उद्योजिका, अमरावती ,परिवर्तन प्रबोधिनीच्या सचिव प्रा.रेखा बेलसरे यांची प्रामुख्याने उपस्थिती लाभली होती.जिल्ह्यातील साहित्यिकांनी साहित्य चळवळी जीवंत ठेवण्यासाठी एकत्र येऊन कार्य करण्याची गरज आहे असे वक्तव्य कार्यक्रमाच्या विशेष अतिथी डॉ. शोभा रोकडे यांनी केले. हा अभंगवारी काव्य महोत्सव म्हणजे संवेदनशील मनाच्या माणसांचा परिवर्तनशील कार्यक्रम होय.अशा प्रकारच्या कार्यक्रमांमुळे माणसांची मने



### अभंगवारी काव्यमहोत्सव थाटात


जोडल्या जात असतात.असे प्रतिपादन काव्यमहोत्सवाचे स्वागताध्यक्ष सुदर्शनजी गांग यांनी केले. विठ्ठलाच्या नामात अगाध शक्ती असून तिचं शक्ती इथल्या शेतकरी वर्गाला विठ्ठलाच्या दर्शनासाठी कोसो दूर पायी जाण्याची प्रेरणा देत असते.आज या अभंगवारीच्या निमित्याने तिचं ऊर्जा या सभागृहात संचारत असून,त्यामुळे हे संपूर्ण रिसॉर्टचं विठुमय झाले असल्याचे वक्तव्य काव्यमहोत्सवाच्या उदघाटक मा. कांचन उल्हे यांनी केले. वऱ्हाडी ही आपली वऱ्हाडची मायबोली असून ती न संकोचता बोलल्या गेली पाहिजे असे प्रतिपादन प्रमुख अतिथी आबासाहेब कडू यांनी केले.तर संकल्पनेतून साकारलेली अभंगवारी म्हणजे विठ्ठलाच्या प्रत्यक्ष दर्शनाच्या अनुभूतीचा प्रत्यय देणारा स्तुत्य उपक्रम होय.असे वक्तव्य संवेदना बहुद्देशीय संस्थेचे अध्यक्ष प्रमुख अतिथी गजानन काकडे यांनी केले.साठ कवींचा सहभाग असणारा हा भव्य अभंगवारी काव्यमहोत्सव एकूण सहा सत्रात पार पडला.पहिले सत्र उदघाटनाचे होते.प्रा. नयना दापूरकर व गजानन काकडे यांच्या सुमधुर स्वरात डॉ.शोभा रोकडे लिखीत अभंग गायनाने या अभंग काव्यमहोत्सवाची दमदार सुरुवात झाली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुप्रसिद्ध लेखक तथा कादंबरीकार विशाल मोहोड यांनी केले. यावेळी अभंगवारी कार्यक्रमाच्या आयोजना मागची भूमिका त्यांनी त्यांनी स्पष्ट केली.संचालन प्रसिद्ध कवी अजय अडीकने तर आभार आरती नागपुरे यांनी मानले. पहिले व दुसरे सत्र एकत्रित पार पडले या दोन्ही सत्राचे अध्यक्ष ॲड. सुरेश चापोरकर तर प्रमुख अतिथी इंजि. दीपक दारव्हेकर, मा. दिलीपसिंह खांबरे, मा. नरेंद्र राऊत हे होते. तिसऱ्या सत्राचे अध्यक्ष ॲड डॉ. नीता कचवे, अध्यक्ष बांधिलकी प्रतिष्ठान तर प्रमुख अतिथी विनोद तिरमारे,उद्धव शहाणे,शुभांगी इंगोले,डॉ. मंदा नांदुरकर हे होते.

चौथे आणि पाचवे सत्र एकत्रित पार पडले.दोन्ही सत्राचे अध्यक्ष वऱ्हाडी साहित्यिक खुशाल गुल्हाने तर प्रमुख अतिथी दिवाकर देशमुख, शिवांगी वेरूळकर,रंजना कराळे, छाया पाथरे उपस्थित होते.या अभंगवारी काव्य महोत्सवाला साहित्यिक व रसिकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

## स्वातंत्र्यासाठी लोकमान्यांचे अमूल्य योगदान-डॉ.रघुनाथ वाडेकर

**तिवसा**-स्वातंत्र्य संग्रामाकरिता तत्कालीन परिस्थितीत जनजागृती होण्यासाठी लोकमान्य टिळकांनी त्याकाळी केसरी आणि मराठा हे दोन वृत्तपत्र सुरू करून तसेच सार्वजनिक गणेशोत्सव सुरू करून लोकांमध्ये स्वातंत्र्य मिळण्याकरीता जनजागृती केली असे उदगार वाडेकर नॅशनल स्कूल चे सचिव डॉ. रघुनाथ वाडेकर यांनी काढले.ते लोकमान्य टिळक यांच्या जयंतीच्या निमित्ताने शाळेच्या विद्यार्थ्यांसमोर बोलत होते. ते पुढे म्हणाले की त्याकाळी पत्रकाराचे माध्यमातून जनजागृती करणे हे खूप कठीण काम होते.आज जनजागृती करता अनेक माध्यमे आहेत. परंतु त्यावेळी कुठले माध्यम उपलब्ध नसताना स्वतः पुढाकार घेऊन केसरी व मराठा हे दोन वृत्तपत्र सुरू करून समाजामध्ये इंग्रजांविरुद्ध एकत्र येऊन लढा देणे, हे आपले आद्य कर्तव्य आहे हा विचार त्यांनी त्याकाळी दिला.यावेळी नम्रता मोहोड व प्रतीक्षा मेश्राम यांनी आपले विचार व्यक्त केले.कोषाध्यक्षा विभा वाडेकर, मुख्याध्यापिका हिना बाटविया तसेच शिक्षिका आचल साबळे,क्रांती भारती,प्रतीक्षा यावले,अश्विनी खैरकार,रुपाली इंगोले ,श्रुती वाकोडे,सारिका टिंगणे,सारिका डहाके,शिवनेरी निस्ताने, नूतन वाढणकर,प्रतीक्षा ढगे,प्रतीक्षा मेश्राम, कल्याणी राऊत,केतकी गावंडे,संध्या राऊत व संगीत शिक्षक अजय चव्हाण हे उपस्थित होते.



# सरकारला 'उशिरा सुचलेले शहाणपण'!



सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी एका सुनावणी दरम्यान बेरोजगार युवकांना उद्देशून 'झुरळं कधीच मरत नसतात' अशी टिप्पणी केली. ती करण्यामागचा त्यांचा हेतू काय होता? हे त्यांनाच माहीत.पण,अमेरिकास्थित संभाजीनगरमधील अभिजित दीपके नावाच्या एका मराठी तरुणाचे पित्त खवळले;आणि त्याने समाज माध्यमावर 'कॉक्रोच जनता पक्ष' नावाची संघटना स्थापन केली.लाखो युवक,युवती व नागरिक सदस्यही झाले.यातील बहुतांश हे परदेशातील आहेत, असे म्हटले जाते. त्यानंतर काही दिवसांतच 'नीट' परिक्षेचा पेपर फुटला.'कावळा बसायला आणि फांदी तुटायला एकच वेळ झाली'. दीपकेने हा मुद्दा उचलून धरला; आणि भारतात येऊन शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजिनाम्यासाठी आंदोलन उभे केले. नियोजन, परिपक्वता, विवेक, अभ्यास, अनुभव, संयम, वकृत्व या सगळ्याच गोष्टींचा अभाव असल्याने त्याला अल्पसा प्रतिसाद मिळाला.नंतर, प्रसिद्धीसाठी पर्यावरण व सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचूक यांनी या आंदोलनात प्रवेश केला. सरकारचे लक्ष वेधून घेण्यासाठी ते 'आमरण' उपोषणाला बसले. प्रथम सरकारने हे आंदोलन गांभीर्याने घेतले नाही. दिवसेंदिवस वांगचूक यांची तब्येत ढासळत गेली. ते उपोषण सोडण्यास तयार नसल्याने, सरकारने न्यायालयातर्फे त्यांना उचलून रुग्णालयात दाखल करण्याचा आदेश मिळवला. एकीकडे वांगचूक उपोषणाला बसले असताना, दुसरीकडे दीपकेसह सर्व आंदोलक खात-पीत डान्स करणे, क्रिकेट व फुटबॉल खेळणे यात मश्गुल होते. अखेर वांगचूक यांना 'मै अनशण कर रहा हूँ, लेकीन तुम ठुसठुसके खा रहे हो. एक दिन तो अनशण करो' अशी विनवणी करावी लागली. 'वांगचूक उपाशी व आंदोलक तुपाशी' अशी परिस्थिती झाल्याने आणि आंदोलनाला प्रसिद्धी मिळावी, यासाठी आपला वापर करून घेण्याचा दीपके आणि त्याच्या सहका-यांचा हेतू आहे की काय? अशी शंका आल्याने वांगचूक यांनीही आढेवेढे न घेता, पोलिसांना सहकार्य करत, रुग्णालयात दाखल होण्याची तयारी दाखवली. आंदोलकांनी वांगचूक यांना नेण्यास विरोध करत, गोंधळ घालण्यास सुरुवात केली. परिणामी, पोलिसांना लाठीमार आणि अश्रूधुराचा वापर करावा लागला. यामुळे जंतरमंतरवर एकच गोंधळ उडाला. काही राजकारण्यांच्या 'बटीक' झालेल्या मराठी वृत्तवाहिन्यांनी निवडक दृष्य वारंवार दाखवत आणि अतिरंजित वृत्तांकन करत, या घटनेला वारेमाप प्रसिद्धी देऊन आंदोलकांवर खुप मोठा अन्याय झाला आहे, असे भासविण्याचा प्रयत्न सुरू केला.

**एकंदरीत परिस्थिती बघता, आंदोलन यशस्वी झाल्याचे म्हटले जात असले तरी, योग्य नियोजनाअभावी 'धांगडधिंगा'च जास्त दिसत होता. 'नीट'शी काहीही संबंध नसणारे हौशे, नौशे आणि गौशांचीच जास्त गर्दी होती.**

मोदी, शहा, फडणवीस आणि भाजपद्वेशींना ही आयती 'पर्वणी'च ठरली. ठाकरे पिता-पूत्र, संजय राऊत, अरविंद केजरीवाल अरुंधती राय, प्रकाश राज, स्वरा भास्कर, कुणाल कामरा, सोनाक्षी सिन्हा, शबाना आझमी,नसरुद्दीन शहा अशा सर्व भाजपविरोधकांनी 'जंतरमंतर'वर धाव घेऊन, 'शिक्षण व्यवस्था' हा आंदोलनाचा विषय सोडून, धार्मिक, देव-देवता, राजकारण आदी बाष्पळ विषयांवर विषारी आणि विखारी फुत्कार टाकत, युवापिढीची सरकारविरुद्ध माथी भडकवण्यासाठी चिथावणीखोर वक्तव्ये केली. शिक्षणाशी दूरदूरपर्यंत काहीही संबंध नसलेले 'संघर्षयोद्धे' मनोज जरांगे यांनीही 'वाहत्या गंगेत हात धुवून' घेतले. संपूर्ण देशभर ठिकठिकाणी विद्यार्थी, महिला, नागरिक, संघटना रस्त्यावर उतरून सरकारविरोधात निदर्शने करू लागली. 'इंडिया आघाडी'ने तर ही 'सुवर्णसंधी' समजत, देश पेटविण्यासाठी रस्त्यावर उतरून हे आंदोलन 'हायजॅक' केले. देशभर सरकारविरोधी वातावरण निर्माण होत असल्याने अखेर प्रधान यांनी स्वतःहून पंतप्रधानांकडे राजीनामा पाठविला. हे त्यांना 'उशिरा सुचलेले शहाणपण' आहे असेच म्हणावे लागेल, असो. . प्रधानांच्या राजिनाम्याचे वृत्त प्रसारित होताच, आंदोलकांनी एकच जल्लोष केला.'बेगाना शादीमे अब्दुला दिवाना' याप्रमाणे सर्व विरोधकांनाही 'आनंदाच्या उकळ्या' फुटल्या. पेपर फुटीमुळे आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबांना प्रत्येकी १ कोटी रुपयांची आर्थिक मदत, आंदोलकांवरील गुन्हे मागे घेणे व भविष्यात गुन्हे दाखल करू नये आणि लाठीमार करणा-या पोलिसांवर गुन्हे दाखल करा, या 'कॉक्रोच पक्षा'च्या मागण्याही सरकारने मान्य केल्या. नंतर झालेल्या पत्रकार परिषदेत 'कॉक्रोच पक्षा'च्या प्रवक्त्यांनी आंदोलन मागे घेत असल्याची घोषणा केली; आणि ३६ दिवस देशभर बहुचर्चित झालेल्या आंदोलनाचे घोडे एकदाचे गंगेत न्हाले.

एकंदरीत परिस्थिती बघता, आंदोलन यशस्वी झाल्याचे म्हटले जात असले तरी, योग्य नियोजनाअभावी 'धांगडधिंगा'च जास्त दिसत होता. 'नीट'शी काहीही संबंध नसणारे हौशे, नौशे आणि गौशांचीच जास्त गर्दी होती. दीपके हा अरविंद केजरीवालचा पित्त्या आणि कट्टर भाजपविरोधी आहे. पंजाबमधील पेपरफुटीवर आणि बंगरुळमध्ये कॉंग्रेसच्या मोर्चामुळे ४ विद्यार्थी परिक्षेला मुकले. या पत्रकारांच्या प्रश्नांवर त्याने एकही 'ब्र' शब्द न काढता, शिताफीने प्रश्नांना बगल दिली. यावरून 'नीट' पेपरफुटी हे या आंदोलनाचे फक्त निमित्त होते. त्याआडून मोदी आणि सरकारला अडचणीत आणण्याचा हा भाजपद्वेशींचा 'एल्गार' होता, असे म्हणणे चुकीचे ठरू नये.

सरकारच्या अहंकारी व गृहीत धरण्याच्या भूमिकेमुळे 'कॉक्रोच जनता पक्षा'चे महत्त्व तर वाढलेच. पण, 'सरकार आपल्यापुढे झुकले' असा त्यांचा समजही झाला आहे. त्यामुळेच 'ही तर फक्त सुरुवात आहे', 'धर्मेंद्र प्रधान झाकी है, मोदी, शहा बाकी है','हम अच्छे अच्छेंके इस्तिफे ले सकते है', 'प्रधान ही पहिली विकेट आहे', असे 'आत्मविश्वासपूर्वक' आव्हाने त्यांनी सरकारला दिली आहेत. स्वतःच्या हातानेच पायावर कु-हाड मारून घेणा-या सरकारला आता ही धोक्याची घंटा समजून, भविष्यात 'ताकही फुंकून प्यावे' लागेल. भविष्यात सरकारमध्ये थोडे जरी खुट्टं वाजले तर, ही झुरळे एकत्र येऊन सरकारला कुरतडण्याचा प्रयत्न करणार हे मात्र नक्की.

**- प्रदीप व्ही.खोलमकर,**
नाशिक.
मो.८७६७५९२९८०

# 'डिजिटल जोडीदारा'चा घातक ट्रेंड

आज कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच 'आर्टिफिशल इंटेलिजन्स' (एआय) आपल्या जीवनाचा एक अविभाज्य भाग बनली आहे. सुरुवातीला केवळ गणितीय आकडेमोड, व्यावसायिक कामे आणि गुंतागुंतीच्या प्रक्रिया सुलभ करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या तंत्रज्ञानाने आता मानवाच्या अतिशय खासगी आणि संवेदनशील क्षेत्रात म्हणजेच 'भावनांच्या विश्वात' प्रवेश केला आहे. सध्या जगभरात आणि वेगाने भारतातही पसरणारा 'डिजिटल बॉयफ्रेंड आणि डिजिटल गर्लफ्रेंड' (जीएफ-बीएफ) हा ट्रेंड याचेच एक ठळक उदाहरण आहे. हे फॅड मानवी नातेसंबंधांच्या पारंपरिक चौकटीला दिलेले एक मोठे आव्हान आहे.

या नव्या प्रवाहाचा सखोल अभ्यास केला असता असे दिसून येते की, तरुण पिढीमध्ये आभासी भागीदार (डिजिटल पार्टनर) बनविण्याची क्रेझ झपाट्याने वाढत आहे. मोबाईल स्क्रीनवरील एक अदृश्य किंवा त्रिमितीय (थ्रीडी) पात्र आपल्याशी हुबेहूब एका खऱ्याखुऱ्या माणसासारखे बोलते, आपल्या भावना समजून घेते आणि आपल्याला मानसिक आधार देते, ही कल्पना काही वर्षांपूर्वी केवळ विज्ञानपटांपुरती मर्यादित वाटत होती. मात्र, आज ती वास्तव बनली आहे. रेप्लिका, कॅरेटर एआय यांसारख्या अनेक 'एआय कम्पॅनियनशिप' ॲप्सच्या माध्यमातून कोटय़वधी युवक-युवती अशा प्रकारच्या डिजिटल नात्यांमध्ये गुंतले आहेत.

या डिजिटल क्रांतीच्या आकडेवारीवर नजर टाकली तर परिस्थितीची भीषणता आणि व्याप्ती अधिक स्पष्ट होते. 'एआय कम्पॅनियनशिप' ॲप्सच्या जागतिक आकडेवारीनुसार, सध्या जगात सुमारे पाच ते सहा कोटी डिजिटल जोडीदार (जीएफ-बीएफ) सक्रिय रूपात अस्तित्वात आहेत. जगभरात दहा कोटींहून अधिक लोक या चॅटबॉटस्च्या माध्यमातून कोणत्या ना कोणत्या भावनिक नात्याने जोडले गेले आहेत. एका सर्वेक्षणानुसार, जगातील जवळपास २१ टक्के प्रौढ व्यक्तींनी एआय कम्पॅयिनशिपचा वापर केला आहे, तर तब्बल ७२ टक्के किशोरवयीन मुलांनी आयुष्यात किमान एकदा तरी अशा एआय बॉट्सशी संवाद साधला आहे. यावरून स्पष्ट होते की, हा ट्रेंड आता केवळ काही विशिष्ट वर्गापुरता मर्यादित राहिलेला नाही, तर तो एक सार्वत्रिक सामाजिक प्रवाह बनत चालला आहे.

**तरुण पिढीमध्ये डिजिटल पार्टनर बनविण्याची क्रेझ झपाट्याने वाढत आहे. मोबाईल स्क्रीनवरील एक अदृश्य किंवा त्रिमितीय (थ्रीडी) पात्र आपल्याशी हुबेहूब एका खऱ्याखुऱ्या माणसासारखे बोलते, आपल्या भावना समजून घेते आणि आपल्याला मानसिक आधार देते, ही कल्पना काही वर्षांपूर्वी केवळ विज्ञानपटांपुरती मर्यादित वाटत होती. मात्र, आज ती वास्तव बनली आहे. रेप्लिका, कॅरेटर एआय यांसारख्या अनेक 'एआय कम्पॅनियनशिप' ॲप्सच्या माध्यमातून कोटय़वधी युवक-युवती अशा प्रकारच्या डिजिटल नात्यांमध्ये गुंतले आहेत.**

वर्ष २०२३-२४ मधील आकडेवारीनुसार, भारतात एआय कम्पॅनियनशिप नात्याची मागणी आणि एआय ॲप्स डाऊनलोड करण्याचा वेग तब्बल १४०० टक्क्यांनी वाढला आहे. हा वेग जगातील इतर अनेक देशांच्या तुलनेत प्रचंड आहे. जरी हा ट्रेंड भारतात अद्याप सुरुवातीच्या टप्प्यात असला तरी इंटरनेटचा वाढता प्रसार आणि एआय तंत्रज्ञानाचा होणारा विकास पाहता आगामी काळात हा वेग अधिकच तीव्र होणार यात शंका नाही.असा कोणता घटक आहे जो माणसाला एका जिवंत व्यक्तीला सोडून मोबाईलमधील एआय पात्राच्या प्रेमात पडायला भाग पाडत आहे? हा आजचा सर्वात मोठा प्रश्न आहे. याचे सर्वात प्रमुख कारण म्हणजे आधुनिक जीवनशैलीत वाढलेला कमालीचा 'एकाकीपणा'. शहरीकरण, वेगवान जीवन, कामाचा प्रचंड ताण, स्पर्धा आणि विखुरलेली कुटुंब व्यवस्था यांमुळे आजचा तरुण कमालीचा एकटा पडला आहे. त्याचे सामाजिक नेटवर्क तुटत चालले आहे. अशा वेळी आपल्या मनातील भावना व्यक्त करण्यासाठी, सुख-दुःख शेअर करण्यासाठी त्याला हक्काचा माणूस मिळत नाही. ही पोकळी भरून काढण्याचे काम एआय पार्टनर्स करत आहेत.

दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे एआय नाती ही संपूर्णपणे 'कंट्रोल' म्हणजेच नियंत्रणात असतात. खऱ्याखुऱ्या मानवी नात्यांमध्ये मतभेद, भांडणे, तडजोड आणि जबाबदाऱ्या असतात. समोरच्या व्यक्तीच्या आवडीनिवडी जपताना स्वतःच्या स्वातंत्र्यावर गदा येते, अशी भावना आजच्या पिढीत निर्माण होत आहे. याउलट एआय जोडीदार कधीही भांडत नाही, तो नेहमी तुमच्या 'हो'मध्ये 'हो' मिळवतो, तुम्हाला हवं तेव्हाच तो उपलब्ध असतो आणि नको असल्यास आपण त्याला एका क्लिकवर बंद करू शकतो. या संपूर्ण नियंत्रणामुळे तरुणांना मानवी नात्यांपेक्षा एआय नाती अधिक सोयीची आणि सुरक्षित वाटू लागली आहेत. तसेच एआय आता इतके प्रगत झाले आहे की, ते माणसाला विचार आणि समजूतदारपणाचा हुबेहूब आभास निर्माण करून देते.त्यामुळे लोकांना ते खरेच वाटते.



हा वाढता ट्रेंड वरकरणी जरी रंजक आणि आधुनिक वाटत असला तरी त्याचे दूरगामी सामाजिक परिणाम अत्यंत चिंताजनक आहेत. समाजशास्त्रज्ञांच्या मते, जर हा ट्रेंड असाच अनियंत्रितपणे वाढत राहिला तर भविष्यात खऱ्याखुऱ्या मानवी नात्यांमधील अंतर कमालीचे वाढेल. माणसांची जागा मशीन घेईल. जेव्हा लोकांना कोणत्याही जबाबदारीशिवाय, केवळ स्वतःच्या अटींवर डिजिटल जोडीदार मिळू लागेल. तेव्हा ते लग्न, कुटुंब आणि समाज या पारंपरिक संस्थांपासून दूर पळू लागतील. त्यामुळे लग्न आणि कुटुंबाची व्यवस्था कमकुवत होण्याचा मोठा धोका निर्माण झाला आहे.

याला 'कस्टम पार्टनर'ची संस्कृती म्हटले जाऊ शकते. यामध्ये माणूस स्वतःच्या कल्पनेनुसार आणि सोयीनुसार जोडीदार तयार करतो. त्यामुळे खऱ्या मानवी जगात वावरताना समोरच्या व्यक्तीमधील उणिवा स्वीकारण्याची माणसाची क्षमता संपून जाईल. परिणामी, भविष्यात समाजात एकटे राहणा?या लोकांची संख्या प्रचंड वाढू शकते. काही तज्ज्ञांच्या मते, पुढील दोन ते तीन दशकांत समाजात लग्न न करता किंवा एकटे राहणाऱ्या लोकांचे प्रमाण खूप जास्त असेल, ज्यामुळे सामाजिक विघटनाची समस्या गंभीर रूप धारण करू शकते. हा ट्रेंड मानव समाजासमोर एक मोठे आव्हान म्हणून उभा ठाकला आहे.

डिजिटल जोडीदाराच्या या आभासी दुनियेचा सर्वात मोठा फटका तरुणांच्या मानसिक आरोग्याला बसत आहे. सुरुवातीला एकाकीपणा दूर करण्यासाठी सुरू झालेला हा प्रवास हळूहळू एका गंभीर व्यसनात रूपांतरित होतो. ज्याप्रमाणे लोकांना सोशल मीडियाचे व्यसन लागते, हे व्यसन त्याहूनही एक पाऊल पुढचे आहे. कारण इथे थेट भावनिक गुंतवणूक असते. दिवसातील दोन ते तीन तास किंवा त्याहून अधिक काळ एआयच्या संपर्कात राहिल्याने तरुणांना त्या आभासी पात्राची सवय होते आणि ते खऱ्या जगापासून पूर्णपणे तुटतात. जेव्हा एखादी व्यक्ती एआयच्या अशा नियंत्रित आणि नेहमी कौतुक करणाऱ्या वातावरणात राहते, तेव्हा तिला खऱ्या जगातील आव्हानांचा सामना करणे कठीण जाते. वास्तविक जीवनात जेव्हा अपेक्षाभंग होतो, तेव्हा हे तरुण तीव्र नैराश्य, हताशपणा आणि चिंतेचे शिकार होतात. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे, एआय कम्पॅनियनशिपच्या आहारी गेलेल्या लोकांना नंतरच्या काळात खऱ्याखुऱ्या माणसांशी जवळीक साधणे, त्यांच्याशी भावनिक नाते निर्माण करणे अत्यंत कठीण जाते. जरी काही कारणास्तव त्यांचे खऱ्या व्यक्तीशी नाते जोडले गेले तरी त्यांना त्या नात्यात समाधान मिळत नाही. कारण खऱ्या माणसाकडून एआयसारख्या परिपूर्णतेची आणि निरंतर उपलब्धतेची अपेक्षा करणे अशक्य असते. तंत्रज्ञानाचा हा भावनिक विळखा मानवी मनाला आतून पोखरत चालला आहे, ज्याचा विचार करणे आज अत्यंत गरजेचे आहे.

**गणेश काळे**

## सुंदर ते मन...

सुंदर ते मन
असे अंतरात
परब्रह्म..त्यात
वसतसे ॥

सदा राहो देवा
तुझे मज ध्यान
द्यावे दिशा ज्ञान
वेळोवेळी ॥

संकटात येता
कुणी परिवार
द्यावा रे आधार
क्षणोक्षणी ॥

अफाट संपत्ती
धन लोभ माया
सर्व जाई वाया
अंत्य क्षणी ॥

आप्त गण माझे
आणिक संतती
ही खरी संपत्ती
मौल्यवान ॥

कुटुंबाशी आपुल्या
द्यावा खूप वेळ
हृदयाचा मेळ
वाढवावा ॥

चुगल्या चहाड्या..
नसे काही अर्थ
जीवन जाई व्यर्थ
भांडणात..॥

सुख असो दुःख
स्थिर राहो मन
निरोगी हे तन
राखूयारे ॥

चार दिस आहे
जीवनाची यात्रा
वाढवावी मात्रा
आनंदाची॥

**राजा.धर्माधिकारी,**
परतवाडा.
मो.९४२२८९००९९

जागतिक हिपॅटायटीस दिन

# हिपॅटायटीस मुक्त यकृत, हेच सुदृढ आरोग्याचे अमृत!

हिपॅटायटीस,हा प्रामुख्याने विषाणूजन्य संसर्ग, अल्कोहोलचे अतिसेवन आणि रोगप्रतिकारक शक्तीच्या बिघाडामुळे होतो. विषाणूजन्य हिपॅटायटीस, म्हणजेच यकृताची सूज ज्यामुळे यकृताचे गंभीर आजार आणि यकृताचा कर्करोग होतो, जागतिक आरोग्य संघटनेनुसार याचे मुख्य प्रकार (ए,बी,सी आणि इ) आहेत.भारतात विषाणूजन्य हिपॅटायटीस ही एक सार्वजनिक आरोग्य समस्या आहे. जागतिक आरोग्य संघटनेने प्रकाशित केलेल्या अहवालानुसार, भारतात अंदाजे ५२ दशलक्ष लोक हिपॅटायटीस बी आणि सी ने ग्रस्त असल्याचा अंदाज आहे. जागतिक स्तरावर एचबीव्हीआणि एचसीव्हीच्या निदानाचा दर अनुक्रमे केवळ ८% आणि १८% आहे.त्यामुळे सध्याच्या मोहिमेचा मुख्य उद्देश या अज्ञात लाखो लोकांना शोधणे हा आहे. लक्षणे: ताप, सतत थकवा,भूक न लागणे,पोटदुखी, मळमळ आणि कावीळ (डोळे किंवा त्वचा पिवळसर होणे).योग्य वेळी चाचणी आणि उपचार केल्यास हा आजार पूर्णपणे बरा किंवा नियंत्रणात ठेवता येते. भारतात यासाठी राष्ट्रीय व्हायरल हिपॅटायटीस नियंत्रण कार्यक्रम अंतर्गत मोफत सेवा उपलब्ध आहेतयाबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी दरवर्षी २८ जुलै रोजी जागतिक हिपॅटायटीस दिन साजरा केला जातो. २०२६ साठी संकल्पना 'हिपॅटायटीस: चला तो खंडित/ मात करू या (हिपॅटायटीस लेट अस ब्रेक इट डाऊन)' ही आहे.



हिपॅटायटीसची मुख्य कारणे- विषाणूजन्य संसर्ग: हिपॅटायटीस ए आणि हिपॅटायटीस बी हे दोन्ही यकृताला (लिव्हर) सूज आणणारे विषाणूजन्य आजार आहेत, परंतु त्यांच्यात फैलावण्याचा मार्ग, आजाराचे गांभीर्य आणि स्वरूपामध्ये मोठा फरक आहे. हिपॅटायटीस ए आणि इ दूषित अन्न व पाणी पिण्यामुळे पसरतो आणि तो अल्पकालीन असतो, संसर्ग झालेल्या व्यक्तीच्या मलमूत्राच्या संपर्कात आल्यास किंवा बाधित व्यक्तीने हात न धुता अन्न बनवल्यास संसर्ग होतो. हिपॅटायटीस डी फक्त एच बी व्ही ने संक्रमित झालेल्यांनाच होऊ शकतो. जेव्हा एखादी निरोगी व्यक्ती संक्रमित रक्ताच्या थेट संपर्कात येते तेव्हा याचा प्रसार होतो. अल्कोहोलचे अतिसेवन - जास्त प्रमाणात दारू पिण्यामुळे यकृताच्या पेशींचे नुकसान होते, ज्याला 'अल्कोहोलिक हिपॅटायटीस' म्हणतात.ऑटोइम्यून डिसीज (ऑटोइम्यून रीस्पोंस )- जेव्हा शरीराची स्वतःची रोगप्रतिकारक शक्ती यकृताच्या पेशींना शत्रू समजून त्यांच्यावर हल्ला करते.१) विषारी पदार्थ आणि औषधे: काही विशिष्ट औषधांचा ओव्हरडोज किंवा विषारी रसायनांच्या संपर्कात आल्यामुळे यकृताला सूज येते. २)यकृतामध्ये अतिरिक्त चरबी (फॅटी लिव्हर): नॉन-अल्कोहोलिक फॅटी लिव्हर रोगामुळे यकृताला सूज येऊ शकते. असुरक्षित लैंगिक संबंध: संक्रमित जोडीदारासोबत कंडोमशिवाय लैंगिक संबंध ठेवणे.सुयांची सामायिकता: अंमली पदार्थांचे सेवन करताना एकाच सुईचा (नीडल) अनेक लोकांनी वापर करणे.दूषित उपकरणांचा वापर: निर्जंतुक न केलेल्या सुयांनी टॅटू काढणे, कान-नाक टोचणे किंवा संक्रमित ब्लेडने दाढी करणे. वैद्यकीय जोखीम: असुरक्षित किंवा अनधिकृत ठिकाणी रक्तसंक्रमण करणे किंवा डायलसिस उपचार घेणे. व्यवसायिक जोखीम: आरोग्य कर्मचारी (डॉक्टर, परिचारिका) ज्यांचा मानवी रक्ताशी वारंवार संपर्क येतो. आईकडून बाळाला प्रसार: संसर्ग झालेल्या गरोदर महिलेकडून जन्माच्या वेळी बाळाला संसर्ग होणे.

हिपॅटायटीस ए, बी आणि सी चे निदान करण्यासाठी रक्ताच्या साध्या चाचण्या केल्या जातात? यात 'ट्रिपल पॅनेल चाचणी' द्वारे यकृताची स्थिती तपासली जाते.इमेजिंग आणि बायोप्सी: यकृताच्या नुकसानाचे प्रमाण तपासण्यासाठी लिव्हर अल्ट्रासाऊंड, फाइब्रोस्कॅन आणि गरज पडल्यास लिव्हर बायोप्सी केली जाते. गरोदर महिलांची हिपॅटायटीस बी साठी तपासणी करणे आवश्यक असते.

**तारा द्वा शर्मा,**
अमरावती

# मीराबाई चानू: प्रेरणादायी प्रवास

ग्लासगो येथे सुरू आलेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा २०२६ मध्ये भारताची दिग्गज ऑलिम्पिक पदक विजेती सुवर्णकन्या मीराबाई चानू हिने इतिहास घडवला. स्पर्धेच्या चौथ्या दिवशी महिलांच्या ४८ किलो वजनी गटात सुवर्णपदकाला गवसणी घातली. या विलक्षण कामगिरीसह तिने राष्ट्रकुल स्पर्धेमधील आपले सलग तिसरे सुवर्णपदक जिंकण्याचा पराक्रम केला. अशी कामगिरी करणारी ती भारताची पहिलीच वेट लिफ्टर खेळाडू आहे. तिच्या या सुवर्ण कामगिरीमुळे भारताचा तिरंगा पुन्हा एकदा डौलाने फडकला आहे. तिच्या या ऐतिहासिक कामगिरीचा देशवासीयांना सार्थ अभिमान आहे.अर्थात अशी ऐतिहासिक कामगिरी करण्यासाठी वर्षानुवर्षे कठोर मेहनत, प्रचंड संयम आणि अविरत संघर्ष करावा लागतो. भारताची स्टार वेटलिफ्टर मीराबाई चानू ही अशाच संघर्षातून घडलेली प्रेरणादायी व्यक्ती आहे. तिचा प्रेरणादायी प्रवास हा केवळ एका खेळाडूचा नसून, प्रतिकूल परिस्थितीवर मात करून स्वप्न पूर्ण करणाऱ्या प्रत्येक युवक-युवतीसाठी प्रेरणादायी आहे. महिलांच्या ४९ किलो गटात रौप्यपदक जिंकत तिने भारताच्या ऑलिम्पिक इतिहासात नवा अध्याय लिहिला. वेटलिफ्टिंगसारख्या ताकदीच्या खेळात भारतीय महिलाही जागतिक स्तरावर यश मिळवू शकतात, हे तिने सिद्ध करून दाखवले.



आज मीराबाई चानू ही केवळ भारताची यशस्वी वेटलिफ्टर नाही, तर लाखो तरुण-तरुणींसाठी प्रेरणेचा अखंड झरा आहे. तिचा संघर्ष सांगतो की, स्वप्ने मोठी असतील, मेहनत प्रामाणिक असेल आणि जिद्द अढळ असेल तर कोणतेही ध्येय अशक्य नसते. भारताला तिच्यासारख्या खेळाडूंचा अभिमान आहे आणि तिची यशोगाथा पुढील अनेक पिढ्यांना प्रेरणा देत राहील.

**श्याम ठाणेदार**

## त-ड-का

### लोकसंख्येचा विस्फोट ..!

कुऱ्हाडीचा दांडा
जसा गोत्यास काळ
अतिरीक्त लोकसंख्या
आमची कर्दनकाळ..

बेकारी,दारिद्रय
अनाचार,भ्रष्टाचार
अतिरिक्त लोकसंख्येचे
आहेत मुलाधार..

हिंदू ख्रिश्चन की
असो मुसलमान
हम दो हमारे दो
राबवा अभियान..

**प्रा.अशोक सारडा,मेहकर**
मो.९४२१३९४३३९



# दिग्रस बुद्रुक ग्रामपंचायत निधी प्रकरण
# कारवाईच्या मागणीसाठी 'भीक मांगो' आंदोलन

## सचिवावर कथित अपहाराचा आरोप ; सात दिवसांत चौकशी न झाल्यास पुन्हा आंदोलनाचा इशारा

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर पंचायत समिती अंतर्गत दिग्रस बुद्रुक ग्रामपंचायतीतील पंधरावा वित्त आयोगाच्या सामान्य निधीसह इतर ग्रामपंचायत निधीच्या कथित दुरुपयोगप्रकरणी तत्कालीन सचिवावर कारवाई करण्याच्या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते विजयकुमार बळीराम ताले यांनी सोमवारी (२७ जुलै) पातूर पंचायत समिती कार्यालयाच्या आवारात अनोखे 'भीक मांगो' आंदोलन केले. या आंदोलनाची तालुकाभर चर्चा रंगली.

विजयकुमार ताले यांनी यापूर्वीही गटविकास अधिकाऱ्यांकडे अनेक वेळा निवेदने देत संबंधित प्रकरणाची सखोल



चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी केली होती. मात्र, वारंवार पाठपुरावा करूनही अपेक्षित कारवाई होत नसल्याचा आरोप त्यांनी

### पंचायत समितीच्या कारभारावर प्रश्नचिन्ह

दिग्रस बुद्रुक ग्रामपंचायतीच्या निधीतील कथित अपहारप्रकरणी वारंवार तक्रारी करूनही चौकशीला गती मिळत नसल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे. संबंधित तत्कालीन सचिवांना अभय दिले जात असल्याचा दावा करत पंचायत समितीच्या कारभारावरच प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे.

केला. याच्या निषेधार्थ त्यांनी नागरिकांकडून प्रतीकात्मक स्वरूपात भीक मागून २१३ जमा केले.

ही रक्कम संबंधित तत्कालीन सचिवांना मनीऑर्डरद्वारे पाठविण्याच्या उद्देशाने गटविकास अधिकाऱ्यांकडे जमा करण्यात आली. तसेच सात दिवसांच्या आत चौकशी पूर्ण करून कथित अपहाराची रक्कम शासनाच्या तिजोरीत जमा करण्यात यावी, अशी मागणी ताले यांनी केली.

चौकशीस विलंब झाल्यास येत्या सोमवारी पुन्हा 'भीक मांगो' आंदोलन करून जमा झालेली रक्कम संबंधित सचिवांना पाठविण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला. या आंदोलनानंतर प्रशासन या प्रकरणात कोणती भूमिका घेते आणि चौकशीला गती मिळते का, याकडे तालुक्यातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# स्व. अजितदादा पवार जयंतीनिमित्त तेल्हाऱ्यात 'जिथं गाव तिथं राष्ट्रवादी' अभियानाचा शुभारंभ

● पहिल्याच टप्प्यात २१ गावांत ग्रामशाखांचे उद्घाटन
● ३० जुलैपर्यंत ७० ग्रामशाखा स्थापन करण्याचे उद्दिष्ट

■ प्रतिनिधी | तेल्हारा ■

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त तेल्हारा तालुक्यात पक्ष संघटना अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने 'जिथं गाव तिथं राष्ट्रवादी' या अभियानाला उत्स्फूर्त सुरुवात झाली आहे. या अभियानाअंतर्गत पहिल्याच टप्प्यात तालुक्यातील २१ गावांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या ग्रामशाखांचे उद्घाटन करण्यात आले.

जिल्हा महासचिव विकास पवार यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात येत असलेल्या या अभियानात शेरी, माळेगाव, चांगलवाडी, रायखेड, दानापूर, हिंगणी (बु.), हिंगणी (खु.), गोरधा, कार्ला (बु.), सौंदळा, बेलखेड, घोडेगाव, जस्तगाव, अटकळी, थार, वाकोडी, इसापूर, उकळी बाजार, वरुड वडणेर, डवला आणि खापरखेड या गावांमध्ये ग्रामशाखांचे उद्घाटन करण्यात आले.

या अभियानाच्या माध्यमातून पक्षाचे विचार ग्रामीण भागापर्यंत पोहोचविणे, नवीन कार्यकर्त्यांना पक्षाशी जोडणे, युवकांचा सहभाग वाढविणे आणि गावपातळीवर संघटनात्मक बांधणी मजबूत करणे, हा प्रमुख उद्देश असल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले. 'गावांचा विकास, माणसांचा विश्वास' या संकल्पनेतून प्रत्येक गावात सक्षम ग्रामशाखा उभारण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

तेल्हारा तालुक्यातील एकूण ७० गावांमध्ये ग्रामशाखा स्थापन करण्याचे नियोजन करण्यात आले असून, अभियानाचा दुसरा टप्पा २६ जुलैपासून सुरू होणार आहे. ३० जुलैपर्यंत सर्व ७० ग्रामशाखांचे उद्घाटन पूर्ण करण्याचा संकल्प पक्षाने केला आहे. या अभियानात तालुकाध्यक्ष महेश खारोडे, युवक तालुकाध्यक्ष अनिकेत नेमाडे, विद्यार्थी तालुकाध्यक्ष विराज वस्तकार यांच्यासह अजय बोदडे,



सतीश मामनकार, सचिन गर्जे, योगेश परघरमोर, शेख इस्ताक, पवन पाटील कडू, मुन्ना पाटील नेमाडे, शैलेश विखे, अजय पोहरकार, सिद्धार्थ दांडगे, अभिजित लासुरकार तसेच विविध सेलचे पदाधिकारी, ग्रामपातळीवरील कार्यकर्ते आणि नागरिक सक्रिय सहभाग घेत आहेत. या अभियानामुळे तेल्हारा तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेसच्या संघटनात्मक विस्ताराला गती मिळेल आणि गावागावात पक्षाचा जनाधार अधिक मजबूत होईल, असा विश्वास पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. तसेच ग्रामशाखा उद्घाटन सोहळ्यांमध्ये मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहनही करण्यात आले.

# आगीच्या गुन्ह्यातील दोघांची तब्बल १६ वर्षांनंतर निर्दोष मुक्तता

## ॲड. श्रीकांत वाहूरवाघ यांचा यशस्वी युक्तिवाद

**भा.द.वि. कलम ४३५, ३४ अंतर्गत दाखल गुन्ह्यात पुरावे अपुरे; अकोला न्यायालयाचा निर्णय**

■ प्रतिनिधी | अकोला ■

म्हैसांग येथील निखिल बिअर शॉपीसमोर लावण्यात आलेला मंडप, टाट्या व खुर्च्या जाळल्याप्रकरणी दाखल गुन्ह्यातील दोन आरोपींची अकोला येथील न्यायालयाने पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता केली. भा.द.वि. कलम ४३५ व ३४ अंतर्गत दाखल या प्रकरणाचा निकाल २४ जुलै २०२६ रोजी देण्यात आला.

फिर्यादीनुसार, ११ मे २०१० रोजी रात्री सुमारे १० वाजता अमोल रामराव खाडे व त्याचे सहकारी म्हैसांग येथील निखिल बिअर शॉपीवर गेले होते. त्यांनी उधारीवर बिअरची मागणी केली. मात्र, व्यवस्थापकाने उधारी नाकारल्यानंतर संतप्त होऊन दुकानासमोरील टाट्यांचा मंडप, बांबूच्या टाट्या व खुर्च्या जाळल्याचा आरोप करण्यात आला होता. या प्रकरणी १२ मे २०१० रोजी बोरगाव मंजू पोलीस ठाण्यात अमोल रामराव खाडे व पंकज साहेबराव दुदंडे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता.

तपास पूर्ण झाल्यानंतर पोलिसांनी अकोला येथील न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. खटल्यादरम्यान अभियोजन पक्षाने सहा साक्षीदारांची साक्ष नोंदवली. मात्र, आरोपींचे वकील ॲड. श्रीकांत बी. वाहुरवाघ यांनी न्यायालयासमोर प्रभावी युक्तिवाद करत अभियोजन पक्ष आरोपींविरुद्ध गुन्हा शंकातीतरीत्या सिद्ध करण्यात अपयशी ठरल्याचे निदर्शनास आणून दिले. तसेच, आरोपींविरुद्ध कोणताही ठोस व विश्वासार्ह पुरावा उपलब्ध नसल्याचा मुद्दा मांडला. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद आणि उपलब्ध पुराव्यांचा विचार करून अकोला येथील ४ थे प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी यांनी अमोल रामराव खाडे व पंकज साहेबराव दुदंडे यांची भा.द.वि. कलम ४३५ व ३४ मधील आरोपांतून २४ जुलै २०२६ रोजी निर्दोष मुक्तता केली. या प्रकरणात आरोपींच्या वतीने ॲड. श्रीकांत बी. वाहुरवाघ यांनी कामकाज पाहिले.

# सोयाबीनवर अज्ञात रोगाचे सावट

## सावरगाव परिसरातील शेतकरी चिंतेत
## कृषी विभागाच्या तातडीच्या हस्तक्षेपाची मागणी

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्यातील सावरगाव परिसरात सोयाबीन पिकावर अज्ञात रोगाचा प्रादुर्भाव झाल्याची बाब समोर आली असून, त्यामुळे शेतकरी वर्गात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक शेतांमध्ये सोयाबीनच्या पानांवर पिवळेपणा, तपकिरी डाग, पाने गळणे तसेच झाडे हळूहळू सुकण्याची लक्षणे दिसून येत आहेत. या रोगामुळे पिकाच्या वाढीवर विपरीत परिणाम होत असून, उत्पादनात मोठी घट होण्याची भीती शेतकरी व्यक्त करत आहेत.

यंदा मान्सूनच्या सुरुवातीला झालेल्या समाधानकारक पावसामुळे सोयाबीन पिकाची वाढ चांगली झाली होती. मात्र, गेल्या काही दिवसांत अचानक रोगाची लक्षणे दिसू लागल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. रोगाचा



प्रादुर्भाव वाढत असल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक गणित बिघडण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

रोगावर नियंत्रण मिळविण्यासाठी काही शेतकऱ्यांनी कृषी सेवा केंद्रांच्या सल्ल्यानुसार विविध बुरशीनाशके व कीटकनाशकांची फवारणी केली. मात्र, त्यातून अपेक्षित परिणाम दिसून न आल्याने शेतकरी संभ्रमात आहेत. हा रोग नेमका कोणता आहे आणि त्यावर प्रभावी उपाययोजना काय असावी, याबाबत शेतकऱ्यांना स्पष्ट मार्गदर्शनाची आवश्यकता आहे.

दरम्यान, कृषी विभागाने तातडीने शेतभेटी घेऊन रोगग्रस्त पिकांची पाहणी करावी, नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवावेत आणि तज्ज्ञांच्या माध्यमातून योग्य रोगनिदान करून प्रभावी उपाययोजना सुचवाव्यात, अशी मागणी सावरगाव परिसरातील शेतकऱ्यांकडून होत आहे.

### कृषी विभागाकडून तातडीच्या सर्वेक्षणाची अपेक्षा

सावरगाव परिसरातील सोयाबीन पिकावर दिसून येणाऱ्या रोगाचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. त्यामुळे कृषी विभागाने तातडीने सर्वेक्षण करून रोगनिदान करावे, तसेच शेतकऱ्यांना योग्य औषधांची निवड, फवारणीचे नियोजन आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत मार्गदर्शन करावे, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

# समान नागरी कायदा मसुदा समितीचे सदस्य न्या. मेहरे यांचा गौरव



**अकोला :** समान नागरी कायदा मसुदा समितीवर महाराष्ट्र शासनाने माजी न्यायमूर्ती संजय मेहरे यांची नियुक्ती केली आहे. त्याबद्दल इंडियन रेड क्रॉस सोसायटीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयात रेड क्रॉस सोसायटीच्या अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या हस्ते त्यांना आज गौरविण्यात आले.

यावेळी इंडियन रेड क्रॉस सोसायटीचे मानद सचिव प्रभजीतसिंह बछेर, ॲड. महेंद्र साहू, ॲड. सुभाष मुंगी, संदेश रांदड, रामहरी डांगे, अमर गौड, कपिल रावदेव, राजू बुडकले, मोहन काजळे आदी उपस्थित होते. समान नागरी कायद्याचा मुख्य उद्देश सर्व नागरिकांना समान नियमांच्या कक्षेत आणणे आहे.

## जाहीर सूचना

माझे पक्षकार यांनी दिलेल्या महिती वरून सर्व नागरिकांना तसेच वित्तीय संस्था व बँक यांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते कि, माझे पक्षकार सौ. कुसुम विश्वनाथ कराळे आणि श्री दुर्गेश विश्वनाथ कराळे, रा. डाबकी रोड, अकोला, ता. आणि जि. अकोला यांच्या मालकी व ताब्यातील मालमत्ता मौजा/कसबे सुकापूर, ता. आणि जि. अकोला येथील सर्वे नं. ३/३, यातील गुंठेवारी नियामितीकारण केलेला प्लॉट नं. १ वरील बांधलेल्या 'रामदेव बाबा अपार्मेंट' मधील पहिल्या मजल्यावरील 'फ्लॅट नं. एफ एफ २' हा फ्लॅट श्री. योगेश ज्ञानेश्वर पवार याच्या कडून र.द.क्र. ५५५८; दि. ०४/११/२०२५ ने खरेदी केली असून सदर मालमत्तेची जुने मूळ नोंदणीकृत खरेदीखत ज्याचे र.द.क्र. ६५२१; दि. ३०/१२/२०१५, हि गहाळ झाले असून श्री योगेश ज्ञानेश्वर पवार यांनी डाबकी रोड, पोलीस स्टेशन, अकोला जि. अकोल येथे तक्रार देखील नोंदली आहे. जर कोणलाही सदर गहाळ खरेदी मिळाली असल्यास खाली संपर्क साधावा. तसेच सदर मालमत्तेवर AU Small Finance Bank Ltd, Akola मार्फत कर्ज घेत असून त्याकरिता माझे पक्षकार हे वरील नमूद मालमत्ता गहाण देत आहेत, त्याकरिता सदर दस्ताची अत्यन्त आवशक्यता आहे.

तरी जाहीर नोटीस द्वारे, आपणास कळविण्यात येते कि, सदर मालमत्तेवर कोणाचाही कुठल्याही प्रकारचा हिस्सा, अधिकार किवां गहाण, दान, बक्षीस, तोंडी करार केला असल्यास, तथा ताबा असल्यास, किंव्हा कुठलाही दिवाणी अथवा फौजदारी दावा प्रलंबित व निकाली असल्यास, संबंधित व्यक्तीने नोटीस वृत्तपत्रात जाहीर झाला तारखे पासून ७ दिवसांच्या आत संपर्क साधावा; तसे न केल्यास सदर मालमत्तेवर कोणाचाही कुठल्याही प्रकारे काहीहि ऐक हक्क, अधिकार, हित-संबंध आणि आक्षेप नसल्याचे समजले जाईल. तसेच भविष्यात सदर गहाळ दस्त विचारात घेऊन कुठलाही व्यवहार जसेकी खरेदी, गहाण, दान, बक्षीस, तोंडी करार केलेले आढळल्यास त्यास सर्वस्वी लिहून घेणार/देणार जबाबदार राहील. तसेच भविष्यात सदर गहाळ दस्त विचारात घेऊन कुठलाही व्यवहार जसेकी खरेदी, गहाण, दान, बक्षीस, तोंडी करार केलेले आढळल्यास त्यास सर्वस्वी लिहून घेणार जबाबदार राहील.

अकोला
दिनक:- २७/०७/२०२६

**ॲड. गौरव शि. देशमुख**
फ्लॅट नं एस-४, 'वैष्णवी कॉम्प्लेक्स', गौरक्षण रोड,
ता. जि. अकोला. मो. नं. ९०२८२३२२४६

## जाहीर नोटीस

### वि.०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १२२२/२०२६ — प्रोसेस नं.९४७८/२०२६
चौ.ता. १९/०९/२०२६ — दिनांक : २४/०७/२०२६

**अर्जदार :** १. दिपक सुरेश जाधव २. प्रदिप सुरेश जाधव मध्यप्रदेश. दोघेही रा एलआयजी - २५, नेहरू नगर, हुजुर सी. टी. टी. नगर, हुजुर, भोपाल, सध्या रा. गजानन नगर, प्रांजाळे फ्लोअर मिल जवळ, डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : निर्मला सुरेश जाधव
**पत्ता :-** रा. गजानन नगर, प्रांजाळे फ्लोअर मिल जवळ, डाबकी रोड, ता.अकोला. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत निर्मला सुरेश जाधव यांचे दि. १८/०५/२०२१ रोजी भोपाल, मध्यप्रदेश येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १९/०९/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २४/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर सूचना

मी, प्रमोद विश्वनाथ पाईकराव, रा. अकोला, याद्वारे सर्व संबंधितांना जाहीर सूचना देत आहे की, माझ्या मालकीच्या व ताब्यातील स्थावर मालमत्तेशी संबंधित खालील मूळ खरेदीखतांच्या अस्सल प्रती दिनांक २३ जुलै २०२६ रोजी अकोला रेल्वे स्टेशन परिसरात गहाळ झाल्या आहेत.

**गहाळ झालेल्या खरेदीखतांचा तपशील :** खरेदीखत दस्त क्र. २६४९, दिनांक २७/०६/२०१९, खरेदीखत दस्त क्र. ८९२, दिनांक २२/०३/२०१८, खरेदीखत दस्त क्र. ३३९१, दिनांक ०७/०९/२०१७, खरेदीखत दस्त क्र. ५२६, दिनांक १३/०२/२०१७.सदर मूळ कागदपत्रांचा सर्वतोपरी शोध घेतला असता ती मिळून आली नाहीत. याबाबत रेल्वे पोलीस स्टेशन, अकोला येथे दिनांक २३/०७/२०२६ रोजी हरवल्याची तक्रार दाखल करण्यात आली आहे.

तरी सदर खरेदीखतांच्या मूळ प्रती कोणासही मिळाल्यास अथवा त्याबाबत कोणतीही माहिती असल्यास, कृपया ही सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा. अन्यथा सदर कागदपत्रांबाबत कोणताही दावा अथवा हरकत ग्राह्य धरली जाणार नाही.

दिनांक : २८/ ०७/ २०२६
स्थळ : अकोला

**प्रमोद विश्वनाथ पाईकराव**
मोबाईल : ७७९८९३९६०४

## जाहीर नोटीस

### वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १११५/२०२६ — प्रोसेस नं.९२८८/२०२६
चौ.ता. २८/०८/२०२६ — दिनांक : २१/०७/२०२६

**अर्जदार :** १. शेवंताबाई तुळशिराम बनातकर, रा. लक्ष्मी नगर, डाबकी रोड, शिवाजी क्लिनीक जवळ, जुने शहर, अकोला. २. सौ. आशाबाई राजु कळसकर, रा. लक्ष्मी नगर, डाबकी रोड, शिवाजी क्लिनीक जवळ, जुने शहर, अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : तुळशिराम भिवसेन बनातकर
**पत्ता :-** रा. लक्ष्मी नगर, डाबकी रोड, शिवाजी क्लिनीक जवळ, जुने शहर, अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत तुळशिराम भिवसेन बनातकर यांचे दि. ०३/०६/२००१ रोजी जिल्हा सर्वोपचार रूग्णालय, अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक. २८/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २१/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २२९**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## जाहीर नोटीस

### वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १२२८/२०२६ — प्रोसेस नं.९४२७/२०२६
चौ.ता. ३१/०८/२०२६ — दिनांक : २३/०७/२०२६

**अर्जदार :** १. भगवान जोतीरामजी तिरपुडे, २. अरविंद भगवान तिरपुडे, ३. संदिप भगवान तिरपुडे, १ ते ३ रा. कालंका माता मंदिर जवळ, गुलजार पुरा, आर.पी.टी.एस. रोड, अकोला, ता. जि. अकोला. ४. ज्योती राजकुमार खंडारे, रा. आसरा पो. भातकुली, ता. जि. अमरावती. ५. भावना विठ्ठल मेश्राम, रा. गोपाळ टॉकिज जवळ, नाग मंदिर जवळ, बेलपुरा रूख्मिणी नगर, अमरावती, ता. जि. अमरावती.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : लक्ष्मी भगवान तिरपुडे
**पत्ता :-** रा. कालंका माता मंदिर जवळ, गुलजार पुरा, आर.पी. टी. एस. रोड, अकोला, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत लक्ष्मी भगवान तिरपुडे यांचे दि. २८/०८/२०२४ रोजी निधन झाले आहे. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक. ३१/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २३/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
प्र.अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

### वि.०६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. ८४२/२०२६ — प्रोसेस नं.९१२९/२०२६
चौ.ता. २५/०८/२०२६ — दिनांक : १८/०७/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती मिना सुधाकर कदम रा. दत्तवाडी, लहान उमरी, अकोला, ता. जि. अकोला. २. अपर्णा सुधाकर कदम रा. दत्तवाडी, लहान उमरी, अकोला, ता. जि. अकोला. ३. सुवर्णा सुधाकर कदम रा. विंग ४, डुप्लेक्स नं. १०, यमुना नगर, मलकापूर, अकोला. ता. जि. अकोला. ४. अंकुश सुधाकर कदम रा. दत्तवाडी, लहान उमरी, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : सुधाकर नथ्थु कदम
**पत्ता :-** रा. दत्तवाडी, लहान उमरी, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत सुधाकर नथ्थु कदम यांचे दि. १८/०३/२०२५ रोजी विहान हॉस्पिटल, प्रा. लि. भडज अहमदाबाद (गुजरात) येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची प्रकारची कसल्याही हरकत असल्यास दिनांक २५/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १८/०७/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

### वि.सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. ११३३/२०२६ — प्रोसेस नं.९२७७/२०२६
चौ.ता. २८/०८/२०२६ — दिनांक : २१/०७/२०२६

**अर्जदार :** १. कमलाबाई मनोहरसिंग रोहेल २. माधुरी ज्ञानसिंग उर्फ ग्यानसिंग रोहेल ३. हरमित कौर ग्यानसिंग रोहेल सर्व रा. नानक छाया, दुर्गा चौक, जुना भागवत प्लॉट, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : ग्यानसिंग उर्फ ज्ञानसिंग मनोहरसिंग रोहेल
**पत्ता :-** रा. भागवत प्लॉट, दुर्गा चौक, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत ग्यानसिंग उर्फ ज्ञानसिंग मनोहरसिंग रोहेल यांचे दि. ०३/०६/२०२६ रोजी राहते घरी भागतव प्लॉट, दुर्गा चौक, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २८/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २१/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

### वि.सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. ११२१/२०२६ — प्रोसेस नं.९४०८/२०२६
चौ.ता. ३१/०८/२०२६ — दिनांक : २३/०७/२०२६

**अर्जदार :** १. जयश्री संदिप गोपनारायण मो. क्र. ८२०८७८९३६८ २. कृष्णा संदिप गोपनारायण ३. मयुरी संदिप गोपनारायण सर्व रा. भिम नगर, मुकुंदवाडी, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. रामचंद्र सिताराम गोपनारायण २. संध्या रामचंद्र गोपनारायण
**पत्ता :-** रा. भिम नगर, मुकुंदवाडी, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत रामचंद्र सिताराम गोपनारायण यांचे दि. १८/०४/१९८० रोजी शासकीय रूग्णालय, अकोला ता. जि. अकोला. येथे निधन झाले आहे. तसेच मयत संध्या रामचंद्र गोपनारायण यांचे दि. २५/०४/२०२६ रोजी शारदा सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल, शास्त्री नगर, अकोला. ता. जि. अकोला. येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ३१/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २३/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## चौकशीची जाहिर नोटीस

### सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला

अर्ज क्रमांक :- १३/२०२६ कलम १९

**सार्वजनिक न्यासाचे नाव -** श्री. संत परमहंस गाठोडे महाराज सेवा समिती घुसरवाडी ता.जि. अकोला

**अर्जदार : -** श्री.अनिल शालीग्राम घावट रा. गायत्री नगर, मोठी उमरी, गायत्री मंदिराजवळ, ता.जि.अकोला

सर्व संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकाला हे वर नमुद केलेल्या अर्ज यासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२/ १९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत. १) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय? २) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ? अ) जंगम मिळकत (वर्णन) :- **१०००/- रुपये श्री. अनिल शालीग्राम घावट यांचे जवळ जमा.** आ) स्थावर मिळकत (वर्णन) :- **निरंक**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्तयावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त-१, अकाला यांच्या शिक्कयानीशी आज दिनांक-२४/०७/२०२६ रोजी दिली.

शिक्का
**अधिक्षक**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
अकोला विभाग अकोला

## चौकशीची जाहिर नोटीस

### सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला

अर्ज क्रमांक :- ७२/२०२६ कलम १९

**सार्वजनिक न्यासाचे नाव -** श्री. हनुमान मंदिर संस्थान वाहितखेड, बोरगाव मंजू, ता.जि. अकोला

**अर्जदार :-** श्री.किशोर अजाबराव देशमुख रा. बोरगाव मंजू, ता. जि. अकोला

सर्व संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकाला हे वर नमुद केलेल्या अर्ज यासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२/१९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

१ ) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय?

२ ) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

अ) जंगम मिळकत (वर्णन) **:- निरंक**

आ) स्थावर मिळकत (वर्णन) : **मौजे - वाहितखेड ता. जि. अकोला येथील मालमत्ता क्र. ९१२ पु.प. १५० चौ.फुट, उ.द. २०० चौ. फुट ऐकून ३०,०००/- चौ. फुट या जागेवर श्री. हनुमान मंदिराचे बांधकाम 30x30 चौ.फुट बरोबर व खुली जागा**

**चतुःसीमाः-** पूर्वेस- किशोर देशमुख यांचे शेत पश्चिमेस - सरकारी जागा उत्तरेस सरकारी रस्ता दक्षिणेस- किशोर देशमुख यांचे शेत

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक शिक्कयानीशी आज दिनांक-२४/०७/२०२६ रोजी दिली.

शिक्का
**अधिक्षक**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
अकोला विभाग अकोला

आरोग्य शिबीर की भाजपचा शक्तीप्रदर्शन मेळावा !

# एक लाख तपासण्यांचा गाजावाजा फुसका... अवघ्या ६६०८ रुग्णांवरच प्रशासनाचे समाधान

## मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित शिबिरात आरोग्यापेक्षा राजकारणाचीच अधिक चर्चा

**वर्धा/रवींद्र लाखे**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त शासनाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या तीन दिवसीय महाआरोग्य शिबिराचा समारोप झाला. मात्र या शिबिरानंतर आरोग्य सेवेपेक्षा राजकीय रंग अधिक गडद झाल्याची चर्चा जिल्हाभर सुरू आहे. एक लाख नागरिकांची आरोग्य तपासणी करण्याचे मोठे लक्ष्य जाहीर करून प्रशासनाने शहरभर मोठमोठे होर्डिंग्ज, बॅनर्स आणि प्रसिद्धीचा धडाका लावला होता. पण प्रत्यक्षात केवळ ६ हजार ६०८ नागरिकांचीच तपासणी झाल्याने गाजावाज्याला आकडेवारीनेच चपराक दिल्याचे बोलले जात आहे.

महाआरोग्य शिबिराच्या नावाखाली नागरिकांची मोठी गर्दी होईल, असा प्रशासनाचा दावा होता. मात्र तीन दिवस उलटल्यानंतरही दहा हजारांचा आकडाही पार करता आला नाही. त्यामुळे जाहीर केलेले लक्ष्य आणि प्रत्यक्ष वास्तव यामधील मोठी दरी उघड झाली आहे. प्रशासनाने शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याचा दावा केला असला, तरी अधिकृत आकडे त्याला साथ देताना दिसत नाहीत.

या शिबिराच्या निमित्ताने आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याचा उद्देश असला, तरी



राजकीय उपस्थिती आणि शक्तीप्रदर्शन याचीच अधिक चर्चा रंगली. कार्यक्रमासाठी राज्याचे आरोग्यमंत्री नामदार प्रकाश आबिटकर यांना प्रमुख अतिथी म्हणून निमंत्रित करण्यात आले होते. मात्र त्यांनी ऐनवेळी गैरहजेरी लावल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या. त्यांच्या अनुपस्थितीत भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहिले आणि कार्यक्रमाचे संपूर्ण राजकीय केंद्रबिंदू बदलल्याचे चित्र दिसून आले.

कार्यक्रमात भाजपच्या पदाधिकाऱ्यांची मोठी उपस्थिती, पक्षाच्या घोषणा, कार्यकर्त्यांची गर्दी आणि राजकीय वातावरण पाहता, महाआरोग्य शिबिर की भाजपचा महामेळावा असा प्रश्न अनेकांकडून उपस्थित करण्यात आला. आरोग्य विभागाच्या कार्यक्रमाला राजकीय स्वरूप प्राप्त झाल्याची चर्चा दिवसभर रंगत राहिली.

विशेष म्हणजे, प्रशासनाने एक लाख तपासण्यांचे लक्ष्य गाठण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी केली होती. मात्र पहिल्याच शिबिरात अवघ्या ६६०८ नागरिकांची नोंद झाल्याने उर्वरित शिबिरांमध्ये तब्बल ९३ हजारांहून अधिक नागरिकांची तपासणी करावी लागणार आहे. हे लक्ष्य वास्तवात पूर्ण होईल का, याबाबत साशंकता व्यक्त केली जात आहे.

आरोग्य शिबिरात नेत्र, दंत, हाडरोग, त्वचारोग, हृदयरोग, मधुमेह, रक्तदाब आणि इतर विविध तपासण्या करण्यात आल्या. अनेक नागरिकांना औषधे आणि चष्म्यांचे वितरणही करण्यात आले. या सुविधा निश्चितच नागरिकांसाठी उपयुक्त ठरल्या. मात्र एवढ्या मोठ्या घोषणेनंतर अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्याने नियोजनावर प्रश्न उपस्थित होत आहेत.

दरम्यान, या संपूर्ण कार्यक्रमानंतर जिल्ह्यात आता एकच चर्चा सुरू आहे, आरोग्य सेवेचा विस्तार हा खरा उद्देश होता की राजकीय शक्तीप्रदर्शन अधिकृत आकडेवारीने लक्ष्यापासून मोठी तफावत दाखवून दिली असताना, महाआरोग्य शिबिराची चर्चा आरोग्यापेक्षा राजकारणामुळेच अधिक रंगली, हे मात्र नाकारता येणार नाही.

### ‘अभंगवाणी विदर्भाची’ लेखन स्पर्धेचा निकाल जाहीर

वर्धा/जनमाध्यम

विदर्भ साहित्य परिषदेतर्फे आयोजित अभंगवाणी विदर्भाची’ या राज्यस्तरीय अभंग लेखन स्पर्धेचा निकाल जाहीर झाला असून, यवतमाळ जिल्ह्यातील पोहंडूळ येथील नीलकृष्ण देशपांडे यांनी सर्वोत्कृष्ट पुरस्कार पटकाविला आहे. या स्पर्धेत द्वितीय क्रमांक प्रा. मीनल येवले आणि डॉ. श्यामल सराडकर (नागपूर) यांना, तर तृतीय क्रमांक मनोहर नाईक व वीणा डोंगरवार (भंडारा) यांना मिळाला.

प्रोत्साहन पुरस्कारासाठी विष्णू सोळंके, अरुण मानकर, लीलाधर दवंडे, विद्या निनावे, खुशाल गुल्हाने, कविता बेदरकर, नागेश कांगणे, विनय मिरासे, मनोज बोबडे आणि प्रमोद पंत यांच्या अभंगरचनांची निवड करण्यात आली आहे. स्पर्धेचे परीक्षण ज्येष्ठ कवी व ख्यातनाम अभंगकार प्रा. सुखदेव ढाणके यांनी केले. विशेष म्हणजे, ही स्पर्धा विदर्भस्तरीय असली तरी महाराष्ट्रासह गोवा, कर्नाटक, केरळ, मध्यप्रदेश, गुजरात तसेच अमेरिका, दक्षिण आफ्रिका आणि दुबई येथील मराठी कवींनीही उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सुमारे ४०० कवी या स्पर्धेत सहभागी झाले होते.

## नशामुक्त भारतासाठी युवकांची सर्जनशील स्पर्धा

### ३० जुलैला जिल्हास्तरीय आयोजन

**वर्धा/जनमाध्यम**

युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार यांच्या मेरा युवा भारत (MY Bharat) – वर्धा आणि राष्ट्रीय सेवा योजना (NSS) यांच्या संयुक्त विद्यमाने ’नशा मुक्त भारत अभियान २०२६’ अंतर्गत ‘नशा मुक्त युवा फॉर विकसित भारत’ या संकल्पनेवर आधारित जिल्हास्तरीय विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धा ३० जुलै रोजी सकाळी ११ वाजता बजाज विज्ञान महाविद्यालय, वर्धा येथे होणार आहेत. जिल्ह्यातील १५ ते २९ वर्षे वयोगटातील युवक-युवती, महाविद्यालयीन विद्यार्थी, युवक मंडळे तसेच स्वयंसेवकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

या स्पर्धांमध्ये संगीत व रॅप (गट), थीमॅटिक नृत्य (गट), रील मेकिंग व लघुपट निर्मिती, नुक्कड नाटक, स्लॅम पोएट्री, वादविवाद, वक्तृत्व, चित्रकला आणि ऑनलाइन घोषवाक्य लेखन अशा आठ स्पर्धांचा समावेश आहे. या माध्यमातून युवकांना आपली कला, सर्जनशीलता आणि सामाजिक बांधिलकी व्यक्त करण्याची संधी मिळणार आहे. जिल्हास्तरीय विजेत्यांना मेरिट प्रमाणपत्र व पदक देण्यात येणार असून, त्यांना राज्य व राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये सहभागी होण्याची संधी मिळेल. सर्व सहभागी स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्रही दिले जाणार आहे.

स्पर्धांसाठी नोंदणीची अंतिम तारीख २७ जुलै असून, अधिक माहितीसाठी सुशील भड, जिल्हा युवा अधिकारी,वर्धा यांच्याशी ९४०४७३६६७३ या क्रमांकावर संपर्क साधावा. व्यसनमुक्त समाज घडविण्यासाठी युवकांनी या अभियानात उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

गोरस भंडारचे पुनरागमन

## १ ऑगस्टपासून दूध वितरणाला सुरुवात

### एफडीए कारवाईनंतर कामकाज पूर्ववत; दर्जेदार दुग्धजन्य पदार्थांचा विश्वास

**वर्धा/जनमाध्यम**

अन्न व औषध प्रशासन विभागाच्या कारवाईनंतर काही काळ बंद पडलेले मगनवाडी येथील गोरस भंडार अखेर आषाढी एकादशीच्या शुभमुहूर्तावर पुन्हा सुरू झाले. विधिवत पूजा-अर्चा आणि नारळ फोडून संस्थेच्या नव्या पर्वाचा शुभारंभ करण्यात आला. गोरस भंडारचे अध्यक्ष डॉ. नीलेश पाटील, संचालक मंडळ तसेच वर्धा जिल्हा सर्वोदय मंडळाचे मंत्री कन्हैया छांगाणी यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला.

शनिवारी (२५ जुलै) झालेल्या या शुभारंभानंतर दूध व दुग्धजन्य पदार्थांचे उत्पादन पुन्हा सुरू करण्यात आले असून, १ ऑगस्टपासून गोरस भंडारची दूध वितरण सेवा आणि सर्व विक्री केंद्रे पूर्ववत सुरू होणार असल्याची घोषणा करण्यात आली. त्यामुळे गेल्या काही दिवसांपासून प्रतीक्षेत असलेल्या ग्राहकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

एफडीएच्या कारवाईनंतर गोरस भंडारचे कामकाज ठप्प झाले होते. संस्था पुन्हा सुरू करण्यासाठी नागरिक, ग्राहक आणि विविध सामाजिक संघटनांनी जनआंदोलन उभारले होते. या आंदोलनात वर्धा जिल्हा सर्वोदय मंडळाने सक्रिय भूमिका बजावत गोरस भंडारच्या पुनरुज्जीवनासाठी सातत्याने पाठपुरावा केला.

यावेळी गोरस भंडारच्या वतीने पूर्वीपेक्षाही अधिक दर्जेदार दूध व दुग्धजन्य पदार्थ नागरिकांना उपलब्ध करून देण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमात बोलताना कन्हैया छांगाणी यांनी गांधीवादी संस्थांचे संरक्षण आणि अस्तित्व टिकविण्यासाठी सर्वोदय मंडळ कटिबद्ध असून, अशा संस्थांवर अन्याय झाल्यास संघर्ष करण्यास मागे हटणार नसल्याचे स्पष्ट केले. गोरस भंडारचे कामकाज पुन्हा सुरू झाल्याने वर्धा जिल्ह्यातील ग्राहकांना दर्जेदार दूधपुरवठ्याचा मार्ग मोकळा झाला असून, १ ऑगस्टपासून नियमित दूध वितरण सुरू होण्याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## वर्धा येथील सांस्कृतिक विश्वावर शोककळा

### किरण पट्टेवार यांच्या निधनाने कला क्षेत्र पोरके



**वर्धा/जनमाध्यम**

आपल्या मधुर आवाजाने,प्रभावी निवेदनाने आणि तबल्याच्या सुरांनी असंख्य रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजविणारे ज्येष्ठ कलावंत किरण पट्टेवार यांच्या अकाली निधनाने वर्धा येथील कला, सांस्कृतिक आणि सामाजिक क्षेत्रावर शोककळा पसरली आहे. त्यांचे जाणे ही केवळ एका व्यक्तीची हानी नसून, संपूर्ण सांस्कृतिक विश्वाची अपूरणीय हानी आहे, अशा भावपूर्ण शब्दांत ज्येष्ठ समाजसेवक मोहन अग्रवाल यांनी श्रद्धांजली अर्पण केली.

शहीद हुतात्मा स्मारक येथे लॉयन्स कराटे ट्रेनिंग सेंटर, स्वरधारा संगीत मंच आणि मॉर्निंग वॉकिंग ग्रुप,महावीर गार्डन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित श्रद्धांजली सभेत ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते.मंचावर किरण पट्टेवार उभे राहिले की कार्यक्रमाला वेगळीच उंची मिळायची. त्यांच्या गोड आवाजाने, दिलखुलास निवेदनाने आणि कलाविष्काराने प्रत्येक श्रोत्याच्या मनात कायमचे स्थान निर्माण केले.

यावेळी मुरलीधर बेलखोडे, सुनील बुरांडे, बी.एस.मिरगे, मिलिंद सवई, संदीप चिचाटे, विलास कुळकर्णी, गुड्डू शर्मा, सुरेश पट्टेवार, ॲड. इब्राहीम बख्श आजाद यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी श्रद्धासुमने अर्पण केली. किरण पट्टेवार यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात आपण सर्व सहभागी असून, परमेश्वराने त्यांना हे दुःख सहन करण्याची शक्ती द्यावी, अशी प्रार्थना करण्यात आली. कार्यक्रमाचे संचालन ॲड. इब्राहीम बख्श आजाद यांनी केले, तर भगवानदास आहुजा यांनी आभार मानले. पत्रकार,साहित्यिक,कलाकार,सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपल्या लाडक्या कलावंताला अश्रुपूर्ण निरोप दिला.

## कर्जमाफीच्या याद्यांचा पत्ता नाही; शेतकरी हेलपाट्यांनी हैराण

### बँका, ग्रामपंचायती व सेवा केंद्रांमध्ये यादीच उपलब्ध नाही

**विरूळ (आकाजी)/जनमाध्यम**

राज्य शासनाने मोठ्या गाजावाजात जाहीर केलेल्या अहिल्याबाई होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेच्या अंमलबजावणीत गंभीर गोंधळ निर्माण झाल्याचे चित्र समोर आले आहे. शासनाकडून कर्जमाफीच्या याद्या जाहीर झाल्याचा दावा केला जात असला, तरी वर्धा जिल्ह्यातील अनेक बँका, ग्रामपंचायती व सहकारी संस्थांकडे अद्याप लाभार्थ्यांच्या याद्याच पोहोचल्या नसल्याने शेतकरी संभ्रमात सापडले आहेत.

कर्जमाफी झाली की नाही, हे जाणून घेण्यासाठी शेतकरी रोज बँका, ग्रामपंचायती व सेवा केंद्रांच्या फेऱ्या मारत आहेत. मात्र संबंधित कार्यालयांकडे कोणतीही अधिकृत यादी उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांना रिकाम्या हाताने परतावे लागत आहे. त्यामुळे शासनाच्या यंत्रणेबाबत तीव्र नाराजी व्यक्त होत आहे माहितीनुसार, केवळ काही मोजक्या सेवा केंद्रांपर्यंतच अत्यल्प प्रमाणात याद्या पोहोचल्या आहेत. अनेक गावांमध्ये सेवा केंद्रांची सुविधा नसल्याने शेतकऱ्यांना कर्जमाफीबाबत कोणतीही खात्रीशीर माहिती मिळत नाही. परिणामी अफवा, संभ्रम आणि गैरसमज वाढत असल्याचे चित्र आहे.

शासनाने स्पष्ट आदेश दिले असतानाही लाभार्थी याद्या ग्रामपंचायत, बँका व सहकारी संस्थांपर्यंत वेळेत का पोहोचल्या नाहीत, याची चौकशी होणे आवश्यक असल्याची मागणी होत आहे. जिल्ह्याचे पालकमंत्री पंकज भोयर, जिल्हाधिकारी, खासदार व आमदार यांनी या प्रकरणात तातडीने हस्तक्षेप करून लाभार्थ्यांच्या याद्या तत्काळ उपलब्ध करून द्याव्यात, तसेच पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ विनाविलंब मिळावा, अशी मागणी शेतकरी वर्गातून जोर धरू लागली आहे.

## केळझर धम्मभूमीवर श्रमण शिक्षा अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**सेलू/जनमाध्यम**

तालुक्यातील केळझर येथील धम्मभूमीवर श्रमण शिक्षा अभियानांतर्गत आयोजित कार्यक्रमात प्रसिद्ध अभिनेते गगन मलिक यांनी श्रमणेर, श्रमणेरी तसेच उपासक-उपासिकांना धम्म, संघटन आणि समाजकार्याबाबत प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

यावेळी बोलताना गगन मलिक म्हणाले, जगातील अनेक देशांमध्ये भन्ते संघ अत्यंत सक्षम व संघटितपणे कार्यरत आहे.समाजात शांतता, समता आणि बंधुभाव रुजविण्यासाठी संघटनात्मक एकता ही काळाची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने श्रमणेर, श्रमणेरी, उपासक व उपासिका उपस्थित होते. उपस्थितांनी गगन मलिक यांच्या विचारांचे उत्स्फूर्त स्वागत करत धम्मकार्य अधिक व्यापक आणि प्रभावीपणे पुढे नेण्याचा निर्धार व्यक्त केला. कार्यक्रमामुळे उपस्थितांना धम्मप्रसारासाठी नवी प्रेरणा मिळाल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

**Mahalle Patil Sanstha, Shirpur (Hore)**
Tah. Deoli and Dist. Wardha
**Pinglakshidevi Mahavidyalaya, Nerpinglai,**
Tah. Morshi, Dist. Amravati
&
**K.T. Mahvidyalaya, Sawargaon,**
Tah. Kalamb, Dist. Yavatmal
(Recognised by Govt. of Maharashtra.
Affiliated to S.G.B.U. Amravati University, Amravati)
**WANTED**
Applications are invited for Full Time Regular Posts as per following details in the faculty of Science & Technology/Humanities/Commerce and Management/Interdisciplinary Studies.

**Vacancies for Non-Grant Courses/Programmes**

| Sr. No. | Name of the Post | Subject/ Courses | Category wise No. of Post | | | | | | | Total No. of Post |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Open | SC | ST | OBC | SBC | VJ/NT | Any Other | |
| 01 | Principal | -- | 02 | - | - | - | - | - | - | 02 |

For Qualifications/Experience/Pay Scale and other details / conditions visit university website www.sgbau.ac.in and college website www.pinglakshidevicollege.org. & www.ktcollege.org.

Note: The application must be submitted to the institution's office within 7 days from the date of publication of the advertisement.

**President**
Mahalle Patil Sanstha, Shirpur (Hore)
Tah. Deoli, Dist. Wardha.
Mob. No. 9421726642

## संक्षिप्त

### रस्त्याच्या कडेला ठेवलेली दुचाकी लंपास

**वर्धा -** रस्त्याच्या कडेला ठेवलेली दुचाकी अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना शहरातील रत्नीबाई शाळेसमोर उघडकीस आली. या प्रकरणी शहर पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध चोरीचा गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. नागपूर येथील दीपक इंगळे हे कामानिमित्त वर्ध्यात आले होते. दरम्यान, रत्नीबाई शाळेसमोर त्यांची दुचाकी घसरून पडल्याने त्यांनी ती रस्त्याच्या कडेला सुरक्षित ठेवली आणि उपचारासाठी नागपूरला रवाना झाले. काही दिवसांनी परत आल्यानंतर दुचाकी जागेवर नसल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. परिसरात शोध घेऊनही वाहनाचा मागमूस लागला नाही. अखेर त्यांनी शहर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंदवून सीसीटीव्ही फुटेज व इतर पुराव्यांच्या आधारे तपास सुरू केला आहे.

### कामाच्या बहाण्याने नेलेले वाहन परतच नाही

**वर्धा -** कंपनीत कामासाठी वाहन लावण्याचे आमिष दाखवून नेलेले चारचाकी वाहन परत न करता विश्वासघात केल्याची घटना पिपरी (मेघे) परिसरात उघडकीस आली. या प्रकरणी रामनगर पोलिसांनी चालकाविरुद्ध विश्वासघाताचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. पिपरी (मेघे) येथील धर्मदास सोनटक्के यांच्या मालकीचे वाहन चालक निखील उईके याने कंपनीमध्ये कामावर लावण्याच्या नावाखाली ताब्यात घेतले. मात्र, त्यानंतर वाहन परत न आणता सतत उडवा-उडवीची उत्तरे दिली. अनेकदा संपर्क साधूनही वाहनाचा ठावठिकाणा न मिळाल्याने कुटुंबीयांनी अखेर पोलिस ठाणे गाठले. तक्रारीच्या आधारे पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून वाहनासह आरोपीचा शोध सुरू आहे.

### पत्नीला बेदम मारहाण

**वर्धा -** कौटुंबिक वादातून पत्नीला बेदम मारहाण केल्याप्रकरणी हिंगणघाट तालुक्यातील लाडकी येथील एका पतीविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विलास कारलेकर याने पत्नीशी वाद घालत तिला मारहाण केली. या मारहाणीत पत्नी जखमी झाली असून तिने पोलिसांकडे धाव घेत तक्रार दिली. तक्रारीच्या आधारे आरोपी पतीविरुद्ध संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कौटुंबिक वादाचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोलिस या प्रकरणाचा पुढील तपास करीत आहेत.

### रेल्वे स्थानक परिसरात संशयित युवक ताब्यात

**वर्धा -** रेल्वे स्थानकासमोरील परिसरात संशयास्पदरीत्या वावरत असलेल्या युवकावर शहर पोलिसांनी कारवाई केली. या प्रकरणी त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांच्या गस्ती पथकाला रेल्वे स्थानकासमोर एक युवक संशयास्पद हालचाली करताना आढळला. चौकशीदरम्यान समाधानकारक उत्तरे न मिळाल्याने त्याला ताब्यात घेण्यात आले. रुषिकेश रमेश भोमले (वय २१, रा. समतानगर, वरुड) असे ताब्यात घेतलेल्या युवकाचे नाव आहे. त्याच्याविरुद्ध शहर पोलिस ठाण्यात प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली असून त्याच्या हालचालींची चौकशी सुरू आहे.

### विषारी औषध प्राशन; युवकाचा मृत्यू

**वर्धा -** विषारी औषध प्राशन केल्याने एका युवकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घाटसावली येथे घडली. या प्रकरणी वडनेर पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला आहे. रोशन जुमनाके (वय २८, रा. घाटसावली) असे मृत युवकाचे नाव आहे. त्याने विषारी औषध प्राशन केल्याचे लक्षात येताच कुटुंबीयांनी त्याला तातडीने हिंगणघाट येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांच्या प्रयत्नांनंतरही त्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. युवकाने हे टोकाचे पाऊल कोणत्या कारणामुळे उचलले, याचा तपास पोलिसांकडून सुरू असून शवविच्छेदनानंतर पुढील प्रक्रिया करण्यात आली.

### जनावर आडवे आल्याने अपघात

**वर्धा -** भरधाव दुचाकीसमोर अचानक अज्ञात जनावर आल्याने झालेल्या भीषण अपघातात जखमी झालेल्या दुचाकीस्वाराचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. ही घटना हेटीकुंडी शिवारात घडली असून परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. संदीप वसंतराव डवरे (वय ४२, रा. हेटीकुंडी) हे दुचाकीने जात असताना अचानक जनावर समोर आल्याने वाहनावरील ताबा सुटला आणि ते जोरात रस्त्यावर कोसळले. गंभीर जखमी झालेल्या डवरे यांना नागपूर येथील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचार सुरू असताना त्यांची प्राणज्योत मालवली. या घटनेची कारंजा (घाडगे) पोलिसांनी नोंद घेतली असून पुढील तपास सुरू आहे.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.
संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)
वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक २४१
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३
मुख्य कार्यालय– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com, abhiramdeshpande@gmail.com

# नांदगाव खंडेश्वर तालुक्यात धामक-येरड परिसरात वाघाची दहशत!


## तीन बकऱ्यांचा फडशा; ग्रामस्थांमध्ये भीतीचे सावट, -वन विभाग सतर्क; ठिकठिकाणी ट्रॅप कॅमेरे, -वाघाच्या पावलांचे ठसे आढळल्याची माहिती

**नांदगाव खंडेश्वर /प्रतिनिधीः-**

नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील धामक-येरड परिसरात वाघाच्या हालचालींची प्राथमिक माहिती समोर आल्याने संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. येरड शिवारात चराईसाठी गेलेल्या तीन बकऱ्यांची वाघाने शिकार केल्याची प्राथमिक माहिती समोर आली असून, या घटनेमुळे शेतकरी, शेतमजूर व पशुपालक य ग्रामस्थांमध्ये मोठी दहशत पसरली आहे.

घटनेची माहिती मिळताच वन विभागाचे अधिकारी व कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. परिसराची पाहणी करताना वाघाच्या पावलांचे ठसे आढळल्याची माहिती वनरक्षक जयवंत जाधव यांनी दिली. तसेच वाघाच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी धामक-येरड परिसरातील विविध ठिकाणी ट्रॅप कॅमेरे सक्रिय करण्यात आले असून, वन विभागाकडून चोवीस तास परिस्थितीवर बारकाईने नजर ठेवली जात आहे.





वाघाच्या दहशतीमुळे शेतात काम करणारे शेतकरी, शेतमजूर जनावरे चारणारे पशुपालक तसेच सकाळी व सायंकाळी फिरणारे नागरिक सावध झाले आहेत. अनेकांनी जनावरे मोकळ्या चराईला पाठविणे टाळले असून, गावातही भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. याबाबत वनरक्षक जयवंत जाधव यांनी सांगितले की, 'परिसरात वाघाच्या पावलांचे ठसे आढळले आहेत. विविध ठिकाणी ट्रॅप कॅमेरे बसविण्यात आले असून, वाघाच्या हालचालींवर सतत लक्ष ठेवले जात आहे. नागरिकांनी सावधगिरी बाळगावी आणि वाघ दिसल्यास तात्काळ वन विभागाला माहिती द्यावी.'

वन विभागाने नागरिकांना एकटे जंगल किंवा शेत परिसरात जाऊ नये, रात्रीच्या वेळी विशेष काळजी घ्यावी, लहान मुलांना व जनावरांना विनाकारण एकटे सोडू नये तसेच कोणतीही संशयास्पद हालचाल दिसल्यास त्वरित वन विभागाशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

दरम्यान, धामक-येरड परिसरात वाघाच्या उपस्थितीच्या शक्यतेमुळे नागरिकांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण असून, वन विभागाने गस्त वाढवून नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी तातडीने प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

आमदार प्रताप अडसड यांनी तात्काळ दखल घेत फॉरेस्ट विभागाच्या वरिष्ठ अधिकारी यांना तात्काळ रेस्क्यू टीम पाठवण्यात यावी ही मागणी केली.

# अचलपूर शहरातील देवडी रस्त्याची आ.प्रवीण तायडे यांनी केली पाहणी

**अचलपूर/प्रतिनिधीः-**



अमरावती जिल्ह्यातील अ वर्ग दर्जा असलेल्या अचलपूर शहरातील देवडी परिसरात काल अचलपूर मतदार संघाचे आमदार प्रवीण तायडे यांनी पाहणी करून दुकानदारांशी संवाद साधला. देवडी परिसरातील दुकानदारांनी अचलपूर मतदार संघाचे आमदार प्रवीण तायडे यांच्याकडे मागणी केली की, देवडी हा रस्ता वनवे करावा आणि सध्या स्थितीत असलेल्या देवडी रस्त्याचे सिमेंट कॉंक्रिटीकरण करण्याची मागणी केली आहे. एकीकडे अचलपूर नगरपरिषद प्रशासनाकडून या रस्त्याचे रुंदीकरण व सिमेंट कॉंक्रीटीकरण साठी निधी मंजूर आहे .मात्र या रस्त्यावर जागोजागी खड्डे पडले आहे आणि वाहतूक व्यवस्था नेहमी विस्कळीत असते. यामुळे या रस्त्याच्या कायपायलट साठी देवडी परिसरातील दुकानदार , व्यापारी, व्यावसायिक यांनी अचलपूर मतदारसंघाचे आमदार प्रवीण तायडे यांची भेट घेतली . आमदार प्रवीण तायडे यांनी स्वतः देवडी परिसरातील मुख्य रस्त्यांची पाहणी केली आणि दुकानदारांशी संवाद साधला. यावेळी दुकानदारांनी रस्त्याची दुरावस्थामुळे नेहमी होत असलेली वाहतुक कोंडीची समस्या मांडली आणि जागोजागी खड्डे असल्याने वाहनचालकांना सुद्धा फटका सहन करावा लागतो .यामुळे हा रस्ता वन वे झाल्यास वाहतूक कोंडी ची समस्या निकाली लागणार असल्याचे मत दुकानदार ,व्यापाऱ्यांनी व्यक्त केले . ज्या स्थितीत हा रस्ता आहे त्या स्थितीत नाल्या अंडर ग्राउंड करून सिमेंट कॉंक्रीटीकरणाची मागणी दुकानदार ,व्यापारी वर्गाने केली आहे.यावेळी व्यापारी प्रल्हाद अग्रवाल, मुकेश अग्रवाल, यश पुरोहित, भारतीय जनता पक्षाचे विशाल काकड ,शहराध्यक्ष कुंदन यादव, नगरसेवक अक्षय पखाले , प्रफुल बर्वे, सतीश शर्मा ,अक्षय जनावरे ,सुनील चौधरी आदी पदाधिकारी कार्यकर्ते व्यापारी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

देवडी रस्ता वन वे सह सध्या स्थितीत असलेल्या त्याच रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करण्याचे दुकानदाराच्या मागणी संदर्भात आमच्या प्रतिनिधीने अचलपूर नगर परिषद मुख्याधिकारी धीरजकुमार गोहाड यांची प्रतिक्रिया घेतली असता,त्यांनी सांगितले की सगळ्यांना विश्वासात घेऊन नियमाप्रमाणे निर्णय घेणार आहे.

# मुलीच्या डोळयांच्या शस्त्रक्रियेसाठी कैद्याला ४० दिवसांचा पॅरोल

## उच्च न्यायालयाचा निर्णय

**अमरावती/प्रतिनिधीः-**

मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने अमरावती मध्यवर्ती कारागृहातील जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर येथील प्रवीण चव्हाण (वय ४२) यांना ४० दिवसांचा पॅरोल मंजूर केला आहे. मुलीच्या डोळयांची शस्त्रक्रिया करण्यासाठी हा पॅरोल देण्यात आला आहे. प्रवीण चव्हाण यांनी गेल्या वर्षी १७ जुलै रोजी कारागृह प्रशासनाकडे पॅरोलसाठी अर्ज केला होता. त्यांच्या अल्पवयीन मुलीला डोळयांचा त्रास असून तिच्यावर सेन्सेटिव्ह शस्त्रक्रिया करावी लागणार असल्याचे त्यांनी अर्जात नमूद केले होते. मात्र कारागृह अधिकारी आणि जेल महानिरीक्षकांनी आजार गंभीर नसल्याचे कारण देत अर्ज फेटाळला होता. यानंतर चव्हाण यांनी वकील एड. राजू कडू यांच्यामार्फत उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. न्यायमूर्ती उर्मिला जोशी-फालके आणि न्यायमूर्ती निवेदिता मेहता यांच्या खंडपीठाने सुनावणी दरम्यान सांगितले की, पिता आणि मुलीचे नाते अतिशय जिव्हाळयाचे असते. अशा परिस्थितीत मानवीय दृष्टिकोनातून पॅरोल नाकारता येणार नाही असे नमूद करत खंडपीठाने जेल प्रशासनाचा निर्णय रद्द करून ४० दिवसांचा पॅरोल मंजूर केला.


## जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती**

आर.एम.जे.सी.क्र.३३८/२०२६ — ने.ता.१८.०८.२०२६

**अर्जदार ः** १. **गणेश गणपतराव इंगळे,** वय ७२ वर्षे, व्यवसाय-मजूरी
२. **सुभाष गणपत इंगळे,** वय ५४ वर्षे, व्यवसाय-मजूरी
दोन्ही रा.ब्राम्हणवाडा थडी वार्ड नं.६, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार ः** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात.**मृतक बवलाबाई गणपतराव इंगळे** यांचा **मृत्यू दि.२०/१०/२०२० रोजी रा.ब्राम्हणवाडा थडी, ता.चांदूर बाजार,जि.अमरावती** येथे झालेला आहे. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

अर्जदार मयतांचे कायदेशिर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरिता आवश्यकता आहे.त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.३३८/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााणपत्र देण्यात येईल.

आज दि.२२.०७.२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय,चांदूर बाजार



## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने सर्वत्र लोकांस कळविण्यात येते की, आमचे पक्षकार **श्री सुनिल मधुकरराव पिंपळे, रा.समर्थ कॉलनी, अमरावती** यांची खालील वर्णन केलेली सामायिक मालमत्ता विक्रीचा सौदा त्यांच्या संमती शिवाय केल्या जात आहे.

**मालमत्तेचे वर्णन**

मौजे-नवसारी, ता.जि.अमरावती येथील शेत भुमापन क्र.८८/१ (भो.वर्ग-१), एकुण क्षेत्रफळ ३ हे २८ आर (पैकी २ हे.२७.३३आर) आकार रुपये १८.०५ पैसे, ही जमीन माझे पक्षकार त्यांचे वडिल, भाऊ व बहिणी यांच्या सामाईक मालकीत व ताब्यात आहे. या जमिनीचा अद्यापपर्यंत पोट हिस्सा पाडण्यात आलेला नाही तसेच वेगवेगळया हिश्यात जाण्या-येण्याचा रस्ता देखील निच्छित करण्यात आलेला नाही.

ही शेत जमीन माझे पक्षकाराची संमती नसतांना परस्पर खरेदी विक्रीचा व्यवहार होतो आहे, अशी माहिती मिळाल्यामुळे ही जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यात येत आहे. या वरील वर्णनाच्या शेता संबंधित कोणीही कोणत्याही प्रकारचा खरेदी विक्री, गहाण किंवा भाडे पटटयाचा सौदा किंवा व्यवहार करु नये. तसा व्यवहार तो बेकायदेशिर असेल आणि आमचे पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

**अमरावती**
**दिनांक २८.०७.२०२६**

**सही/-**
**(ॲड.चंद्रशेखर व.डोरले)**
**अंबागेट, अमरावती**
**मो.९३७०१५४५१७,८३२९२२९१४९**



## कार्यालय नगर परिषद, अंजनगांव सुर्जी, जि.अमरावती
## आठवडी बाजार (सोमवार) साप्ताहिक वसुली व दैनिक भाजीपाला ओटे वसुली ठेका - वर्ष २०२६-२७

### जाहीर लिलाव सुचना

या जाहीर सुचनेद्वारे सर्व इच्छुक कंत्राटदारांना कळविण्यात येते की, अंजनगांव सुर्जी नगर परिषदेच्या अधिकार क्षेत्रातील आठवडी बाजार सोमवार साप्ताहिक वसुली चिठ्ठी ठेक्याचा जाहीर लिलाव व दैनिक चिठ्ठी वसुलीचा कंत्राट दिनांक ०१.०८.२०२६ ते ३१.०३.२०२६ या कालावधीकरीता दिनांक ३०.०७.२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता नगर परिषद कार्यालयातील अंजनगांव सुर्जी येथे जाहीररित्या बोलीद्वारे लिलाव करण्यात येईल. इच्छुक कंत्राटदाराने लिलावाचे वेळी उपस्थित रहावे. अटी व शर्ती कार्यालयीन सुटीचे दिवस वगळून मिळकत विभाग नगर परिषद अंजनगांव सुर्जी कार्यालयात पहावयास मिळेल.

| अ.क्र. | हर्रासाचा तपशील | स्थळ | दिनांक व वेळ | अभिरुप किंमत | अनामत रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १. | नगर परिषद आठवडी बाजार चिठ्ठी वसुली कंत्राट (सोमवार) | नगर परिषद कार्यालय अंजनगांव सुर्जी | ३०.०७.२०२६ वेळ दुपारी | रु.३०२६५० | रु.१००००/- |
| २. | न.प.हद्दीतील अंजनगांव सुर्जी दैनिक चिठ्ठी वसुली | नगर परिषद कार्यालय अंजनगांव सुजी | ३०.०७.२०२६ वेळ दुपारी ०१.०० वा. | रु.२४४००० | रु.१००००/- |

**अटी व शर्ती-**

**१)** वरील दर्शविल्याप्रमाणे अनामत रक्कम बोली बोलण्यापुर्वी संबंधित विभागात जमा करावी लागेल. अनामत रकमेत कोणत्याही प्रकारची सूट मिळणार नाही.
२) हर्रास कायम झाल्यास बोलीची रक्कम १/४ त्याच दिवशी न.प.कार्यालयामध्ये जमा करावी लागेल.
३) अटी व शर्ती बाबतची माहिती बोली बोलण्यापुर्वी हर्रास धारकाने मिळकत विभागात पाहून घ्यावी.

**(अविनाश गायगोले)** — **(विजय लोहकरे)**
**अध्यक्ष** — **मुख्याधिकारी**
**नगर परिषद अंजनगांव सुर्जी** — **नगर परिषद अंजनगांव सुर्जी**



## शुध्दीपत्रक

दै.जनमाध्यम मध्ये दि.२५.०७.२०२६ रोजी स्व.बाबासाहेब वऱ्हाडे शिक्षण संस्था, अमरावती यांची जाहिरात प्रकाशित करण्यात आली होती. त्यात अनावधानाने टिप मध्ये दि.१३ जुलै २०२५ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार दिव्यांग अनुशेष भरण्याची कार्यवाही करावी. असे मुद्रित झाले होते. त्याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे. तसदीबद्दल दिलगीर आहे.

**दि.३१ जुलै २०२५ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार दिव्यांग अनुशेष भरण्याची कार्यवाही करावी.**

व्यवस्थापक



## TENDER NOTICE

**FEED MILL MACHINE 500/KG. HOUR & FEED MILL ACCESSORIES**

The Government of Maharashtra is implementing the World Bank-funded Hon. Balasaheb Thackeray Agribusiness and Rural Transformation (SMART) Project. *Akhatwada Agri And Livestock Development Farmer Producer Company Ltd.* is one of the beneficiaries of the project and is inviting offline bids for the above-mentioned machinery. The bid document is available on the project website, **www.smart-mh.org**, in the tender and procurement section. The last date for submission of offline bids is **06/08/2026 up to 2.00 PM** Any updates or notices shall be published on the aforementioned website only.

*Akhatwada Agri And Livestock Development*
***Farmer Producer Company Ltd,***
**At. Akhatwada, Post Murtijapur Taroda, Tal Tiosa, Dist Amravati**



## TENDER NOTICE

***Incubator of 30000 Egg Capacity And Hatcher of 10000 Egg Capacity***

The Government of Maharashtra is implementing the World Bank-funded Hon. Balasaheb Thackeray Agribusiness and Rural Transformation (SMART) Project. *Akhatwada Agri And Livestock Development Farmer Producer Company Ltd.* is one of the beneficiaries of the project and is inviting offline bids for the above-mentioned machinery. The bid document is available on the project website, **www.smart-mh.org**, in the tender and procurement section. The last date for submission of offline bids is **06/08/2026 up to 2.00 PM** Any updates or notices shall be published on the aforementioned website only.

*Akhatwada Agri And Livestock Development*
***Farmer Producer Company Ltd,***
**At. Akhatwada, Post Murtijapur Taroda, Tal Tiosa, Dist Amravati**



## TENDER NOTICE

***Goods transport Vehicle with Hood***

The Government of Maharashtra is implementing the World Bank-funded Hon. Balasaheb Thackeray Agribusiness and Rural Transformation (SMART) Project. *Akhatwada Agri And Livestock Development Farmer Producer Company Ltd.* is one of the beneficiaries of the project and is inviting offline bids for the above-mentioned machinery. The bid document is available on the project website, **www.smart-mh.org**, in the tender and procurement section. The last date for submission of offline bids is **06/08/2026 up to 2.00 PM**. Any updates or notices shall be published on the aforementioned website only.

***Akhatwada Agri And Livestock Development Farmer Producer Company Ltd,***
**At. Akhatwada, Post Murtijapur Taroda, Tal Tiosa, Dist Amravati**



**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.बी.कळदाते सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१००९/२०२६
**सुलभा व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.०३.०९.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार ः** 1. Sulbha Prafulla Ronghe
Age 79 Yrs. Occu.: Doctor
R/o Snehagandha Hospital LIC Colony, Rukhmini Nagar, Amrvati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार ः** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **प्रफुल नारायणराव रोंघे** हे दिनांक 25.03.2026 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **सुलभा व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सुलभा व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२२.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती



**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ९ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.११०९/२०२६
**श्रीमती अनुसया अधिक दोन -वि- निरंक**
पुढील ता.२९.०७.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार ः**
1. Sulbha Prafulla Ronghe, Age 56 Yrs. Occu.: Household
2. Anand Ramcharan Pande, Age 34 Yrs. Occu.: Service
Both R/o Lontek, Tq. Dist. Amravati
3. Sau.Ashu Girish Joshi, Age 32 Yrs. Occu.: Household
R/o Rajputpura Walgaon, Tq. Dist. Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार ः** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **श्री.रामचरण गयाप्रसाद पांडे** हे दिनांक 17.12.2023 रोजी **लोणटेक, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **अनुसया अधिक दोन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **अनुसया अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१८.०६.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती



## जाहीर नोटीस

**अमरावती येथील विद्यमान तदर्थ जिल्हा व सत्र न्यायाधीश-०३, यांचे न्यायालय**

एम.ए.सी.पी. क्रमांक १२७/२०२५ — ने.ता.२७.०८.२०२६

**पिटीशनर - राजी देविदास सावंत**
-- वि --
**रिस्पांडंट - शेख अफजल शेख वसीम व ईतर**

**बनाम -** 1. Mohammad Azar Mohammad Salim
R/o Near Play Ground, Pakiza Colony.
Walgaon Road, Amravati.

**Application U/Sec.166 of Motor Vehicle Act 1988 for Grant of Compensation**

ज्याअर्थी वरील पिटीशनर **राजी देविदास सावंत** यांनी तदर्थ जिल्हा व सत्र न्यायालय-०३, अमरावती यांचे न्यायालयात नुकसान भरपाई मिळण्याकरीता दावा दाखल केला आहे.

त्याअर्थी वरील गैरअर्जदार **मोहम्मद अझर मोहम्मद सलीम**, यांना पेपर प्रसिध्दीद्वारे नोटीस देण्यात येते की, त्यांनी दाव्याचे सुनावणीसाठी दिनांक **२७.०८.२०२६** रोजी सकाळी ११.०० वाजता वि.जिल्हा व सत्र न्यायाधीश-०३, अमरावती यांचे न्यायालयात स्वतः किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर व्हावे. वर नमुद केलेल तारखेस जर कोणीही हजर न झाल्यास सदरहू दाव्याची एकतर्फी सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक २३/०७/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

शिक्का
आदेशान्वये,
सहायक अधीक्षक, (न्यायीक विभाग)
जिल्हा व सत्र न्यायालय,
अमरावती



**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी अचलपूर यांचे कार्यालय**
**जन्म बाबत जाहीरनामा**

**गैरअर्जदार -राजु नामदेव काळे,** रा.बिलनपुरा, अचलपूर, ता.अचलपूर, जि.अमरावती

-- विरुध्द --

**अर्जदार -** निबंधक जन्म/मृत्यू नोंदणी अधिकारी, नगर परिषद, अचलपूर ता.अचलपूर, जि.अमरावती

सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, अर्जदार हे वरील पत्त्यावर कायम रहिवासी आहेत. अर्जदार राजू नामदेव काळे, रा.बिलनपुरा, अचलपूर, ता.अचलपूर, जि.अमरावती यांची निबंधक जन्म/मृत्यू नोंदणी अधिकारी नगर परिषद अचलपूर, ता.अचलपूर, जि.अमरावती येथे जन्माची नोंद घेतली नाही. अर्जदाराला उपरोक्त जन्म प्रमाणपत्राची गरज असल्यामुळे जन्माची नोंद महानगरपालिका अधिनियम १९६९ मधील कलम १३५(३) व त्या अनुषंगाने तयार करण्यात आलेल्या महाराष्ट्र जन्म मृत्यू नोंदणी नियम २००० मधील नियम ९(३) नुसार जन्माच्या नोंदणीचा आदेश होणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास सदरहू तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार अचलपूर येथील अर्जदार राजू नामदेव काळे, रा.बिलनपुरा, अचलपूर, ता.अचलपूर, जि.अमरावती यांचा जन्म दिनांक १७.०२.१९६४ रोजी जन्मस्थह, बिलनपुरा, अचलपूर, ता.अचलपूर, जि.अमरावती येथे झाला. त्यांच्या जन्माच्या दिनांकास किंवा त्याबाबत हरकत असल्यास दिनांक ०७.०८.२०२६ पर्यंत स्वतः किंवा आपल्या वकीलामार्फत येवून हरकत न घेतल्यास सदरहू अर्जदार यांची साक्ष घेवून जन्म नोंद सदर कार्यालयात घेण्याचा आदेश किंवा तसे प्रामणपत्र देण्यात येईल.

**स्वा/-**
**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, अचलपूर**



जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक- प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ३२०**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :-** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६९
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# शिक्षण विभागाचा कारभार ढेपाळला?

## तालुक्यातील अनेक विद्यार्थी पाठ्यपुस्तकांपासून वंचित



**चांदूरबाजार/ वार्ताहर**

शैक्षणिक सत्र सुरू होऊन तब्बल एक महिना उलटला असतानाही तालुक्यातील काही विद्यार्थ्यांना, अद्याप ही संपूर्ण पाठ्यपुस्तके मिळालेली नाहीत. परिणामी विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणावर शैक्षणिक नुकसान होत आहे. या संदर्भात पंचायत समिती शिक्षण विभागाकडे माहिती विचारली असता, पाठ्यपुस्तकाचे तालुक्यात वितरण झाले असल्याचे सांगितले. मात्र अद्याप पर्यंत किती विद्यार्थी पाठ्यपुस्तकापासून वंचित आहेत. ही माहिती शिक्षण विभागामध्ये उपलब्ध नाही. यावरून शिक्षण विभागाच्या ढिसाळ नियोजनाचा फटका, थेट विद्यार्थ्यांना बसत असल्याचे तालुक्यातील विद्यार्थ्यांना बसत असल्याचे दिसून येते.

पाठ्यपुस्तक वितरणाबाबत माहिती विचारल्यानंतर गटशिक्षण अधिकारी कार्यालयाकडे, अद्ययावत माहितीच उपलब्ध नसल्याचे समोर आले आहे. त्यानंतर लगेच घाईघाईने केंद्रप्रमुखांकडून माहिती गोळा करण्यास सुरुवात करण्यात आली. त्यामुळे शिक्षण विभागाचा कारभाभरावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

यावर्षी इयत्ता सहावीचा नवीन अभ्यासक्रम लागू करण्यात आला. शासनाने प्रत्येक विद्यार्थ्याला वेळेत पाठ्यपुस्तके उपलब्ध करून देणे अपेक्षित होते. मात्र आजही अनेक विद्यार्थ्यांच्या हाती पूर्ण पुस्तकांचा संच पोहोचलेला नाही. त्यामुळे शिक्षकांनाही अध्यापन करताना अडचणी येत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान दिवसेंदिवस वाढत आहे.

सध्या गटशिक्षण अधिकाऱ्यांकडे चांदूर बाजार, अचलपूर आणि चिखलदरा या तीन तालुक्यांचा अतिरिक्त कार्यभार आहे. एका अधिकाऱ्यावर तीन तालुक्यांची जबाबदारी असल्याने कोणत्याही एका तालुक्याकडे पूर्ण लक्ष दिले जात नाही . ही वस्तुस्थिती आहे. याचाच परिणाम म्हणून विद्यार्थ्यांना वेळेत पाठ्यपुस्तके मिळाली नाहीत. असे खाजगीत बोलले जात आहे.

गटशिक्षण अधिकाऱ्यांनी शिक्षण विभागाच्या कामकाजावर प्रभावी नियंत्रण ठेवले असते, तर अशी परिस्थिती निर्माण झाली नसती. अशी प्रतिक्रिया पालकांमधून व्यक्त होत आहे. विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित शिक्षण विषयातही प्रशासनाकडून, हलगर्जीपणा होत असल्याने पालकांमध्ये तीव्र नाराजीचा सुर दिसून येत आहे.


चांदूर बाजार तालुक्यासाठी तातडीने, कायमस्वरूपी गटशिक्षण अधिकाऱ्याची नियुक्ती करावी. एका अधिकाऱ्याकडे फक्त एकाच तालुक्याचा कार्यभार द्यावा. अशी ही पालक वर्ग मधून बोलले जात आहे. तसेच पाठ्यपुस्तकांपासून वंचित असलेल्या सर्व विद्यार्थ्यांना, तात्काळ पुस्तके उपलब्ध करून द्यावीत. अशी मागणी पालक व नागरिकांनी केली आहे.

'या संदर्भात माहितीची विचारणा केल्यानंतर, शिक्षण विभागाची धावपळ उडाली. त्यानंतर केंद्रप्रमुखां कडून घाईघाईने माहिती संकलित करण्यास सुरुवात करण्यात आली. चांदूरबाजार शहरातील केंद्रप्रमुखांकडून लगेच माहिती पंचायत समिती शिक्षण विभागात प्राप्त झाली. केवळ नऊ शाळांमधील तब्बल ४०४ विद्यार्थी अद्यापही, पाठ्यपुस्तका 'पासून वंचित असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले.'

'ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक स्तर उंचावर म्हणून, शासनाने अनेक योजना सुरू केल्या आहेत. त्यात विद्यार्थ्यांना शाळा सुरू होताच त्याच्या हातात, पहिल्याच दिवशी पाठ्यपुस्तकी देण्याच्या योजनेचा समावेश आहे. मात्र शाळा सुरू होऊन एक महिन्याचा कालावधी झाला. तरी ही काही विद्यार्थ्यांच्या हाती पाठ्यपुस्तके न पोचणे याची माहिती शिक्षण विभागाकडे न राहणे. यावरून अधिकाऱ्यांची मानसिकता दिसून येते. विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर होणाऱ्या परिणामाला दोषी कोण? अशा अधिकाऱ्यांवर काय कारवाई होणार काय? याकडे तालुक्याचे लक्ष लागले आहे!'

## मांजरखेड (कसबा) येथील जि.प. उर्दू शाळेची उल्लेखनीय कामगिरी

### शिष्यवृत्ती परीक्षेत चार विद्यार्थ्यांचे यश



**चांदूर रेल्वे/ वार्ताहर**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षणाची जिद्द आणि शिक्षकांचे समर्पित मार्गदर्शन याचे उत्तम उदाहरण ठरलेल्या चांदूर रेल्वे तालुक्यातील मांजरखेड (कसबा) येथील जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक उर्दू शाळेने शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

सन २०२५-२६ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता सातवी शिष्यवृत्ती परीक्षेत शाळेतील चार विद्यार्थ्यांनी यश मिळवून शाळेचा आणि गावाचा नावलौकिक वाढविला आहे. यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये अशिमरा मकसूद कुरेशी, मसीरा मोहम्मद आरिफ, सना शेख इर्शाद आणि अलफैझ अयाज काझी यांचा समावेश आहे. ग्रामीण भागातील उर्दू माध्यमाच्या शाळेने मिळविलेल्या या यशाबद्दल मुख्याध्यापक मिर्झा गफ्फार बेग यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत त्यांच्या उज्ज्वल भवितव्यास शुभेच्छा दिल्या.

तसेच शाळेतील सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या यशात मोलाचे मार्गदर्शन केल्याचे सांगितले. या उल्लेखनीय यशाबद्दल शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष तसेच सर्व सदस्यांनी विद्यार्थ्यांचे, मुख्याध्यापक व शिक्षकवृंदाचे अभिनंदन करून शाळेच्या गुणवत्तापूर्ण शैक्षणिक कार्याचे कौतुक केले. ग्रामीण भागातील

उर्दू शाळेने मिळविलेल्या या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळणार असल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

## शिष्यवृत्ती परीक्षा निकालात भातकुली पंचायत समितीची जिल्ह्यात अव्वल



### ९१६ विद्यार्थी पात्र, जिल्ह्यात प्रथम क्रमांक तर राज्यातुन दुसरा क्रमांक

**अमरावती/ का.प्र.**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये एप्रिल २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता चौथी व इयत्ता सातवी शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. या निकालात पंचायत समिती भातकुलीने आपल्या उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखत संपूर्ण अमरावती जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. तर राज्यातुन दुसऱ्या क्रमांकावर आली आहे. इयत्ता चौथी व सातवी मिळून पंचायत समिती भातकुलीतील तब्बल ९१६ विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले आहेत.

जाहीर झालेल्या निकालानुसार, इयत्ता चौथीमध्ये ७४६ विद्यार्थ्यांपैकी ५०० विद्यार्थी पात्र ठरले असून निकालाची टक्केवारी ६७.०३ टक्के आहे. तर इयत्ता सातवीमध्ये ५४५ विद्यार्थ्यांपैकी ४१६ विद्यार्थी पात्र ठरले असून निकालाची टक्केवारी ७६.३४ टक्के आहे. या उल्लेखनीय यशामुळे पंचायत समिती भातकुलीने जिल्ह्यात अव्वल स्थान मिळविले असून शिष्यवृत्ती परीक्षेतील उत्कृष्ट कामगिरीची परंपरा कायम राखली आहे.

शिष्यवृत्ती परीक्षा उपक्रम वर्षभर प्रभावीपणे राबविण्यासाठी पंजाबराव पवार (शिक्षण विस्तार अधिकारी), जानराव सुलताने (केंद्रप्रमुख, आष्टी), राजेंद्र नकाशे (केंद्रप्रमुख, भातकुली), निता सोमवंशी (केंद्रप्रमुख, गणोरी), प्रशांत रघुवंशी (केंद्रप्रमुख, खारतळेगाव), बाळासाहेब धनस्कर (केंद्रप्रमुख, पूर्णानगर), उमेश चुनकिकर (केंद्रप्रमुख, खोलापूर), रविंद्र धरमठोक (केंद्रप्रमुख, वाठोडा शुक्लेश्वर), शैलेंद्र एस. दहातोंडे (केंद्रप्रमुख, आसरा), हर्षवर्धन इंगळे (विषय साधन व्यक्ती व तालुका समन्वयक), चंद्रकांत कडबे, हेमंत कुंभलवार, श्रीकांत खरबडे, मीनाक्षी खरटमोल, सतीश वानखडे, सुजाता सोनवणे, रुपाली शिरोट, पौर्णिमा काकड तसेच सर्व केंद्रस्तरीय विशेष शिक्षक अक्षय वैद्य, प्रज्ञा रामटेके, मंदा आंडे, रिता गुडदे, मेघा साबळे, कांचन दुधे आणि वैशाली शिरभाते यांनी विशेष मेहनत घेतली.

दरम्यान, नुकतेच पंचायत समिती भातकुलीचे गटशिक्षणाधिकारी म्हणून रुजू झालेले प्रेरक उजगरे यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे, त्यांच्या पालकांचे, मुख्याध्यापकांचे व शिक्षकांचे अभिनंदन केले. तसेच पंचायत समिती भातकुलीने जिल्ह्यात प्रथम क्रमांक तर राज्यातुन दुसरा क्रमांक मिळविल्याबद्दल समाधान व्यक्त करून भविष्यातही अशीच उज्ज्वल परंपरा कायम राहील, असा विश्वास व्यक्त केला.

## आषाढी एकादशी निमित्त गुरु ग्लोबल स्कूलमध्ये विविध कार्यक्रम



**नांदगाव पेठ** - येथील गुरु ग्लोबल स्कूलमध्ये आषाढी एकादशी निमित्त भक्तिमय वातावरणात विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी विठ्ठल-रुक्मिणी तसेच वारकऱ्यांच्या वेशभूषेत आकर्षक सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. टाळ-मृदंगाच्या गजरात आणि विठ्ठल नामाच्या जयघोषात संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी पीएसआय गोरे उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत भारतीय संस्कृती, संतपरंपरा आणि आषाढी एकादशीचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन केले. विठ्ठल-रुक्मिणीच्या भूमिकेत आरव सावरकर, पारस मदनकर, आदिराज दीक्षित, कपिल खेडकर, देवांश अग्रवाल, त्रिशूल राठोड, रुद्र काकाणी, सेजल काळे, ज्ञानदा कापडे, साचीका बोंडे, ध्रुवीनी कापडे, प्रकृती आखरे, ईशान्य फुटाणे आणि शाश्वती कापडे यांनी सहभाग घेत उत्कृष्ट सादरीकरण केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापिका अश्विनी मानेकर यांच्या मार्गदर्शनाखाली भाग्यश्री भगत, साक्षी भटकर, प्रतीक्षा बावनकुळे, पायल राऊत, सिद्धी बोंद्रे, अविनाश शिंदे तसेच जया इंगळकर यांसह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले.

या उपक्रमासाठी पालकांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद देत आपल्या पाल्यांना आकर्षक वेशभूषेत तयार करून पाठवले.

### श्री वल्लभ फाउंडेशन स्कूलमध्ये विद्यार्थ्यांनी

## विठ्ठल-रुक्मिणी व संतांच्या वेशभूषेत



**नांदगाव पेठ** - आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त श्री वल्लभ फाउंडेशन स्कूलमध्ये भक्तिमय वातावरणात विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी विठ्ठल, रुक्मिणी तसेच संतांच्या आकर्षक वेशभूषेत सहभागी होत वारकरी परंपरेचा संदेश प्रभावीपणे सादर केला. संपूर्ण परिसर 'विठ्ठल... विठ्ठल...' या नामघोषाने भक्तिरसात न्हाऊन निघाला. कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी वारकरी दिंडी, अभंग, भजन तसेच संतांच्या जीवनावर आधारित सादरीकरणातून भारतीय संस्कृती, भक्तीपरंपरा आणि नैतिक मूल्यांचा परिचय करून दिला. विठ्ठल-रुक्मिणी व संतांच्या वेशभूषेमध्ये विहान्श जाधव, अद्विका डोंगरे, आरोही सम्रीत, राजवी ढोके, स्मित मानकर (संत), मीकुल काळे, सिद्धी पाठे, अर्णव मुळे (संत नामदेव), पार्थ सदावर्ते, ट्विंकल गोरले, अंशिका रघुवंशी तसेच अनमोल पांडे यांनी संत तुकाराम यांच्या भूमिकेत उत्कृष्ट सादरीकरण केले. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अश्विनी मानेकर, दिव्या सोळंके, चैताली जांभुळकर, अश्विनी धांडे, तेजस्विनी टारपे, वैष्णवी इंगोले, मयुरी धर्माळे तसेच ऋषिकेश मानेकर यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी विद्यार्थ्यांच्या पालकांनीही मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवत मुलांना विविध वेशभूषा करून कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी मोलाचे सहकार्य केले.

## 'विठ्ठल... विठ्ठल...'च्या जयघोषाने घुईखेडनगरीत अवतरले 'मिनी पंढरपूर'

### संत बेंडोजी महाराजांच्या पालखी सोहळ्याने भक्तिमय वातावरण, चंद्रभागा पात्रात आरती



**चांदूर रेल्वे/ वार्ताहर**

चांदूर रेल्वे तालुक्यातील घुईखेड येथील श्री संत बेंडोजी महाराजांची संजीवन समाधी ही महाराष्ट्रातील भाविकांचे श्रद्धास्थान मानली जाते.

आषाढी एकादशीनिमित्त येथे हजारो भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली. दिवसभर 'विठ्ठल... विठ्ठल...'च्या जयघोषाने आणि भक्तिरसाने संपूर्ण घुईखेड नगरी 'मिनी पंढरपूर' बनल्याचे चित्र पाहायला मिळाले.

आषाढी एकादशीचा हा पारंपरिक सोहळा अनेक शतकांपासून अखंडपणे सुरू असून आजही त्याच उत्साहात साजरा केला जातो. या दिवशी पालखी सोहळ्याचे दर्शन घेण्यासाठी गावातील नवविवाहित मुली, बाहेरगावी नोकरी-व्यवसायानिमित्त वास्तव्यास असलेले ग्रामस्थ तसेच परिसरातील भाविक मोठ्या संख्येने गावात दाखल झाले होते.

श्री संत बेंडोजी महाराजांची पालखी मंदिरातून बाहेर पडून नागपूर–औरंगाबाद एक्सप्रेस महामार्गावरून पारंपरिक मार्गाने चंद्रभागा नदीच्या पात्रात पोहोचली. तेथे संस्थानचे विश्वस्त प्रविण घुईखेडकर व राधिका घुईखेडकर तसेच तळेगाव दशासर पोलीस ठाण्याचे ठाणेदार किरण औटे यांच्या हस्ते आरती करण्यात आली. त्यानंतर पालखीने संपूर्ण गावाची प्रदक्षिणा पूर्ण करून पुन्हा मंदिरात आगमन केले.

या सोहळ्याला विश्वेश्वर गावंडे, पांडुरंग भोयर, ज्ञानेश्वर इंगोले, जयकृष्ण येवले, संजय चणेकार, किशोर येवले, अनुराग वानखडे, रुपेश भोयर, अभिजित काकडे, कुणाल सिंगलवार, नकुल तिवाडे, प्रतीक येवले, प्रतिक काकडे, शतनू काकडे, भारत वानखडे, संगम तायडे, सूरज काकडे, हरीश मेश्राम, नामदेव मेश्राम, अजय मेश्राम, गंगाराम मेश्राम, अमर बनकर, मुकुंद काकडे, किशोर मेहर, नंदकिशोर काकडे, अमोल देशमुख, रवी गिरी, गजानन फिसके, अनिल शेंडे, वामनराव क्षीरसागर, अमोल बेंदरे, सुरेश पडघाम, दादाराव क्षीरसागर, सुबोध पांडे, सोमेश्वर भोयर, अरुण येवले, शुभम खोब्रागडे, कैलास सावनकार, प्रमोद ढवळे, तुषार बनकर, राजू घुगरे, राहुल बनकर, वैभव काकडे, ओम उघडे, अमोल पवार, संजय वरघट, अमोल खंडारे, दिलीप बागडे, अमोल कोल्हे यांच्यासह हजारो भाविक उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रमादरम्यान तळेगाव दशासर पोलीस ठाण्याचे ठाणेदार किरण औटे यांच्या नेतृत्वाखाली चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला.

# संक्षिप्त

## आझाद हिंद मंडळात गुरुपौर्णिमा उत्सव

### गुणवंत विद्यार्थी व खेळाडूंचा सत्कार

**अमरावती** - आझाद हिंद मंडळ, बुधवारा यांच्या वतीने भारतीय संस्कृतीचे जतन व गुरु-शिष्य परंपरेचा गौरव करण्यासाठी गुरुपौर्णिमा उत्सव आयोजित करण्यात आला आहे. तसेच देशभक्त स्व. नानासाहेब बामणगावकर स्मृती प्रित्यर्थ गुणवंत विद्यार्थी व खेळाडूंचा सत्कारही यावेळी करण्यात येणार आहे. हा कार्यक्रम बुधवार, २९ जुलै रोजी सायंकाळी ६.०० वाजता स्व. हरिभाऊ कलोती स्मारक मंदिर, बुधवारा, अमरावती येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमास नागरिक, मंडळाचे कार्यकर्ते, विद्यार्थी, खेळाडू तसेच गुरुजनांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन संयोजक तथा माजी महापौर तथा विरोधी पक्षनेता विलास इंगोले यांनी केले आहे. कार्यक्रमानंतर सर्व उपस्थितांसाठी सहभोजनाचे आयोजन करण्यात आले असून उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## 'जिंगल बेल' मध्ये भरली विठ्ठल नामाची शाळा




**चांदूर रेल्वे** - आषाढी एकादशीनिमित्त चांदूर रेल्वे तालुक्यातील सुप्रसिद्ध जिंगल बेल इंग्लिश स्कूलमध्ये भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावर णात सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. 'विठ्ठल... विठ्ठल...' या नामघोषाने संपूर्ण शाळा परिसर दुमदुमून गेला आणि जणू 'विठ्ठल नामाची शाळाच भरली' असल्याचा मनमोहक अनुभव उपस्थितांना आला. या विशेष उपक्रमात पूर्वप्राथमिक विभागातील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी विठ्ठल आणि रुक्मिणीची पारंपरिक वेशभूषा परिधान करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. चिमुकल्यांच्या निरागस सादरीकरणाने उपस्थितांचे मन जिंकले आणि आषाढी एकादशीचा उत्सव भक्तिमय वातावरणात साजरा झाला. या उपक्रमात सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे शाळेचे संस्थापक दीपक डहाणे, अध्यक्षा हिमाली डहाणे तसेच मुख्याध्यापक अतुल उज्जैनकर यांनी विशेष कौतुक केले. विद्यार्थ्यांना सुंदर वेशभूषा करून पाठविणाऱ्या पालकांचेही शाळेच्या वतीने मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले. शाळेत आयोजित करण्यात आलेला हा आगळावेगळा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी संस्कार, परंपरा आणि भक्तीचा सुंदर संगम ठरला.

## जंतर मंतर आंदोलनात स्वाती खेडकर सहभागी



**शिराळा** - अमरावती येथील परंतु नौकरी निमित्त दिल्ली राहणाऱ्या स्वाती खेडकर यांनी कॉकरोज विद्यार्थी आंदोलनाला समर्थन केले. स्वाती खेडकर यांनी आपल्या मुलीच्या भविष्या विषयी लोकमत आयबीएन ला मुलाखत दिली व आपल्या भावना व्यक्त केल्या माझ्या मुलीच्या भविष्यात काय होईल या चिंतेने शिवाय सर्व भारतातील विद्यार्थ्यांचे शिक्षण विषयी लोकमत आयबीएन मुलाखत देवुन चर्चा केली. यावेळेस त्यांना गहिवरून आले होते. स्वाती खेडकर यांनी कॉकरोज आंदोलनाचे नेतृत्व करणारे अभिजित दिपके यांची भेट घेतली. केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिला. त्यादिवशी सुध्दा सहपरिवार उपस्थित होत्या.

## डॉ. पद्माकर सोमवंशी यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबीर



**अमरावती** - डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या आपत्कालीन वैद्यक विभागाच्या वतीने माजी अधिष्ठाता डॉ. पद्माकर सोमवंशी यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांतर्गत अमरावती विमानतळ तसेच पंजाबराव देशमुख नर्सिंग इन्स्टिट्यूट येथे रक्तदान शिबीर पार पडले. या शिबिरात एकूण १३० रक्तपिशव्यांचे संकलन करण्यात आले. विमानतळ प्राधिकरणाचे अधिकारी कुलदीप काळे यांच्या सहकार्यामुळे विमानतळावरील सर्व कर्मचारी मोठ्या संख्येने रक्तदानासाठी सहभागी झाले. या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याने विक्रमी रक्तसंकलन करण्यात यश आले. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी डॉ. किशोर कांडळकर यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांना डॉ. गौरी मोरे, किरण कांबळे तसेच आपत्कालीन वैद्यक विभागातील सर्व डॉक्टर, कर्मचारी आणि स्वयंसेवक यांचे मोलाचे सहकार्य लाभले. डॉ. पद्माकर सोमवंशी हे दरवर्षी आपला वाढदिवस सामाजिक जबाबदारी जपत रक्तदानासारख्या जनहिताच्या उपक्रमातून साजरा करतात. त्यांच्या या प्रेरणादायी उपक्रमामुळे अनेकांना रक्तदानाचे महत्त्व पटत असून समाजात रक्तदानाबाबत जनजागृती होत आहे.

## बी.डी.एस. हायस्कूलमध्ये आषाढी एकादशी सोहळा उत्साहात



**चांदूर रेल्वे** - स्थानिक श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारे संचालित बापूसाहेब देशमुख शिवाजी (बी.डी.एस.) हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, येथे 'आषाढी एकादशी'चा पावन सोहळा अत्यंत उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी शाळेचे मुख्याध्या पक डॉ. अतुल ठाकरे हे लाभले होते. तर प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ शिक्षिका एस.बी.देशमुख आणि पालक सुरेंद्र फटींग यांची विशेष उपस्थिती लाभली. विद्यार्थ्यांनी विठ्ठल-रुक्मिणी, तुळशीवृंदावन घेतलेल्या भगिनी आणि टाळ-मृदंगाच्या तालावर तल्लीन झालेल्या वारकऱ्यांच्या देखण्या वेशभूषेत प्रवेश केला. त्यांनी सादर केलेले सुंदर नृत्य आणि गगनाला भिडणाऱ्या टाळ-मृदंगाच्या गजरात म्हटलेली अभंग-भजने यामुळे संपूर्ण शाळा परिसर पंढरपूरच्या पावन भूमीत रूपांतरित झाला होता. 'ज्ञानोबा-तुकाराम' आणि 'विठ्ठल-विठ्ठल'च्या जयघोषाने वातावरण पूर्णपणे भक्तिमय झाले. या सोहळ्याचे आयोजन शिक्षिका ए.एफ. मुल्ला आणि एम. बी. वाघमारे यांनी केले. या सोहळ्याला शाळेतील सर्व शिक्षक-शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक आणि बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# 'कुंपणच शेत खातंय का?'

## ना खदान... ना खनिज साठा-विक्रीचा परवाना

## तरीही संतोष चांडक यांचे दोन-दोन क्रशर सुसाट!

### गाजीपूरच्या खाण साम्राज्यावर संशयाचे गडद ढग

'राजा बोले... दल हाले' की महसूल विभागाची अर्थपूर्ण डोळेझाक?;

**ॲड. समीर ठाकूर**

**अकोला :** 'सत्याला कितीही झाकण्याचा प्रयत्न केला, तरी ते राखेतून उठणाऱ्या निखाऱ्यासारखे बाहेर येते,' असे म्हटले जाते. अकोट तालुक्यातील गाजीपूर-रुदाळी परिसरातील खाण आणि स्टोन क्रशर व्यवसायात नेमके हेच घडताना दिसत आहे. दिवसागणिक समोर येणाऱ्या नव्या माहितीमुळे संतोष चांडक यांच्या क्रशर साम्राज्याभोवती संशयाचे वादळ अधिकच घोंगावत आहे.




सर्वात मोठा प्रश्न एकच; खदान नाही, गौण खनिज साठा-विक्रीचा परवाना नाही, मग दोन-दोन स्टोन क्रशर अखेर कोणाच्या आशीर्वादाने धडाक्यात सुरू आहेत? हा प्रश्न आता केवळ सामान्य नागरिकांचाच नाही, तर संपूर्ण महसूल यंत्रणेच्या विश्वासार्हतेवर बोट ठेवणारा ठरत आहे.

अकोट तालुक्यातील सातपुड्याच्या पायथ्याशी, नरनाळा अभयारण्याच्या कुशीत वसलेल्या गाजीपूर आणि रुदाळी या आदिवासीबहुल भागात अनेक वर्षांपासून खाण आणि स्टोन क्रशरचे साम्राज्य उभे राहिले आहे. पर्यावरणाची होत असलेली हानी, वनक्षेत्राचा ऱ्हास आणि आदिवासींच्या जमिनींवर उभे राहिलेले कोट्यवधींचे उद्योग याबाबत अनेकदा तक्रारी झाल्या; पण 'आंधळं दळतं आणि कुत्रं पीठ खातं' अशीच अवस्था असल्याची टीका नागरिक करत आहेत.

शासनाने उपजीविकेसाठी दिलेल्या आदिवासींच्या जमिनी आज काही धनदांडग्यांच्या आर्थिक साम्राज्याचा पाया बनल्या आहेत. ज्यांच्या नावावर खाण आणि क्रशर आहेत, त्यातील अनेक आदिवासी आजही दारिद्र्यरेषेखाली जीवन जगत आहेत. मग कोट्यवधींची उलाढाल नेमकी कोणाच्या खिशात जाते? हा प्रश्न अनुत्तरित आहे.

याच परिसरातील गट क्रमांक २७ आणि ३८ मध्ये अतिरिक्त गौण खनिज उत्खनन केल्याप्रकरणी शासनाने तब्बल ४८ कोटी रुपयांचा दंड जमीनमालक विलास कालू चिमोटे आणि भाडेपट्टाधारक संतोष चांडक यांच्यावर ठोठावला. एवढा प्रचंड दंड झाल्यानंतरही व्यवसाय मात्र अव्याहत सुरू असल्याचे चित्र दिसत आहे. त्यामुळे 'हत्ती गेला, शेपूट राहिलं' की 'सापही जिवंत आणि काठीही अबाधित' असा प्रश्न उपस्थित होत आहे.

सन २०१० पासून गट क्रमांक ३८ वर मे. साई स्टोन क्रशर कार्यरत आहे. त्याशेजारी गट क्रमांक ३७ मध्ये मे. बालाजी स्टोन क्रशर नव्याने उभारण्यात आला आहे. परंतु चांडक यांच्या नावावर एकही खदान नसताना या क्रशरवर दररोज प्रक्रिया होणारा हजारो टन गौण खनिज नेमका कुठून येतो? हा प्रश्न आजही महसूल प्रशासन उत्तराविना ठेवत आहे.

जर खदान नाही, तर दगड कुठून येतो? जर साठा परवाना नाही, तर साठा कुठे दाखवला जातो? जर विक्री परवाना नाही, तर तयार माल कोणत्या अधिकाराने विकला जातो? जर सर्व काही कायदेशीर असेल, तर महसूल विभागाने आजवर एकदाही संपूर्ण तपासणी अहवाल सार्वजनिक का केला नाही? हे प्रश्न आता लोक विचारत आहेत; आणि उत्तरांची जबाबदारी प्रशासनावर आहे.

स्थानिकांच्या माहितीनुसार, या क्रशरवर दिवस-रात्र मोठ्या प्रमाणात दगड प्रक्रिया होतो. तयार झालेला माल विविध ठिकाणी पाठविला जातो. मग त्या मालाची जीएसटी बिले, रॉयल्टीची नोंद, ई-चलन, वाहतूक परवाने, स्टॉक रजिस्टर आणि महसूल विभागाची पडताळणी यांचा मेळ नेमका कसा बसतो? की 'वरून स्वच्छ, आतून सगळं गडबड' अशीच परिस्थिती आहे?

इतकेच नव्हे तर, गट क्रमांक ३७ मधील खदानीतून निघणारा गौण खनिज नेमका कोणाला विकला जातो? तो कोणत्या क्रशरवर प्रक्रिया होतो? शासकीय कामांमध्ये त्याचा वापर झाला असल्यास त्याची नोंद कुठे आहे? की नाव एका व्यक्तीचे आणि व्यवहार दुसऱ्याच व्यक्तीचे, अशी व्यवस्था सुरू आहे? अशी चर्चा परिसरात रंगली आहे.

या संपूर्ण प्रकरणात महसूल विभागाच्या भूमिकेवरही मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नियमित तपासण्या झाल्या का? झाल्या असतील तर अनियमितता दिसली नाही का? की पाहूनही न पाहिल्यासारखे करण्यात आले? 'कुंपणच शेत खात असेल तर न्याय मागायचा कुणाकडे?' असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

जाणकारांचे मत स्पष्ट आहे. या प्रकरणात महसूल, खनिकर्म, प्रदूषण नियंत्रण मंडळ, जीएसटी, वीज वितरण कंपनी आणि संबंधित यंत्रणांनी संयुक्त तपासणी केल्यास अनेक धक्कादायक व्यवहार उघड होण्याची शक्यता नाकारता येत नाही. कारण 'दूध का दूध आणि पाणी का पाणी' करण्याची वेळ आता आली आहे.

**उद्याच्या अंकात...**

**'खदानच नाही, मग ब्लास्टिंगची बिले कुठून?'**

संतोष चांडक यांच्या नावावर गाजीपूर-रुदाळी परिसरात एकही खदान नसल्याचे सांगितले जात असताना, खदानीतील ब्लास्टिंगसाठी लागणाऱ्या जिलेटीन आणि डिटोनेटरच्या खरेदीची बिले त्यांच्या नावाशी संबंधित असल्याची माहिती समोर आली आहे. संबंधित कागदपत्रांच्या आधारे या व्यवहाराचा सखोल मागोवा घेणारा विशेष वृत्तांत उद्याच्या अंकात प्रकाशित करण्यात येणार आहे. या प्रकरणात आणखी कोणकोणाची नावे समोर येणार? महसूल यंत्रणेची भूमिका काय होती? आणि खाण साम्राज्यामागचे खरे सूत्रधार कोण? याचा धक्कादायक खुलासा वाचा... फक्त उद्याच्या अंकात!

# आदिवासी मंत्र्यांच्या दौऱ्यानंतर पुन्हा दोन आश्रमशाळांतील विद्यार्थी आजारी

## बीजुधावाडी व सावलीखेड्यात फूड पॉइझनिंगचा संशय



**धारणी/प्रतिनिधी :-** टिटंबा शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना झालेल्या कथित अन्नविषबाधेची घटना ताजी असतानाच आता धारणी तालुक्यातील बीजुधावाडी आणि सावलीखेडा येथील शासकीय आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांचीही तब्येत बिघडल्याची घटना समोर आली आहे. सलग घडणाऱ्या या घटनांमुळे आदिवासी आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांच्या अन्नाच्या गुणवत्तेबाबत आणि व्यवस्थापनाबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, बीजुधावाडी शासकीय आश्रमशाळेतील ३९ विद्यार्थ्यांची प्रकृती बिघडल्याने त्यांना धारणी उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी सर्व विद्यार्थ्यांची प्रकृती सध्या स्थिर असून उपचारानंतर ते धोक्याबाहेर असल्याची माहिती दिली आहे.

दरम्यान, सावलीखेडा शासकीय आश्रमशाळेतील सुमारे ५० विद्यार्थ्यांचीही तब्येत बिघडल्याने त्यांना सादरवाडी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी दाखल करण्यात आले. संबंधित विद्यार्थ्यांची प्रकृतीही स्थिर असल्याचे आदिवासी विकास विभागाकडून सांगण्यात आले.

घटनेची माहिती मिळताच आदिवासी विकास विभागाचे अप्पर आयुक्त संदीप गोलाईत यांनी धारणी उपजिल्हा रुग्णालयात भेट देऊन उपचार घेत असलेल्या विद्यार्थ्यांची विचारपूस केली तसेच उपचाराची माहिती घेतली. अमरावती येथील आदिवासी विभागाच्या अधिकाऱ्यांनीही रुग्णालयात भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला. ☞(पान २ वर)

# बँक खाते आणि सिमकार्डाचा गैरवापर

## १०.९५ लाखांच्या ऑनलाइन फसवणुकीचे प्रकरण उघड

**अमरावती/प्रतिनिधीः-** परतवाडा येथील बँक ऑफ महाराष्ट्र शाखेत दुसऱ्याच्या नावाने उघडलेल्या बँक खात्याचा गैरवापर करून तब्बल १० लाख ९५ हजार ७३ रुपयांच्या सायबर फसवणुकीचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी परतवाडा पोलिसांनी एका युवकाविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अभिषेक दिलीप गायकवाड (वय ३०, रा. कांडली, ता. अचलपूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून प्रज्वल तायडे (वय २४, रा. सावंगी, ता. अचलपूर, जि. अमरावती) याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम ३१६(२) व ३१८(४) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी आणि आरोपी हे एकमेकांच्या परिचयातील असून, आरोपीने स्वतःचे बँक खाते बंद झाल्याचे सांगत फिर्यादीच्या नावाने नवीन बँक खाते उघडण्यास तसेच मोबाईल सिमकार्ड घेण्यास प्रवृत्त केले. विश्वास संपादन करून आरोपीने फिर्यादीच्या नावाने बँक खाते उघडले. त्यानंतर त्या खात्याचा गैरवापर करून संशयित खात्यांमधून १०,९५,०७३ इतकी रक्कम विविध खात्यांमध्ये वळविण्यात आली. ही बाब निदर्शनास आल्यानंतर फिर्यादीने परतवाडा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यावरून पोलिसांनी गुन्हा नोंदवून आर्थिक व्यवहारांचा मागोवा घेत पुढील तपास सुरू केला आहे. कोणाच्याही सांगण्यावरून आपल्या नावाने बँक खाते उघडून देऊ नये किंवा मोबाईल सिमकार्ड उपलब्ध करून देऊ नये. अशा खात्यांचा सायबर गुन्ह्यांसाठी वापर होऊ शकतो आणि खातेदारालाही कायदेशीर अडचणींना सामोरे जावे लागू शकते.

# मकोका आरोपींचा घटनास्थळी रिक्रिएशन पंचनामा

## असोरिया पेट्रोल पंप परिसरात पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त

### -गोळीबार व चाकूहल्ला प्रकरणातील ११ आरोपी घटनास्थळी



**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील असोरिया पेट्रोल पंपाजवळ १२ जुलै रोजी झालेल्या चाकूहल्ला आणि हवेत गोळीबार प्रकरणातील मकोका अंतर्गत अटक करण्यात आलेल्या आरोपींना सोमवारी घटनास्थळी आणून रिक्रिएशन पंचनामा करण्यात आला. या वेळी परिसरात कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. आरोपींना पाहण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जुन्या वैमनस्यातून जाकीर कॉलनी येथील शोएब अहमद (वय ३५) यांच्यावर १२ जुलै रोजी असोरिया पेट्रोल पंपाजवळ चाकूने हल्ला करण्यात आला होता. तसेच आरोपींनी हवेत गोळीबार केल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. घटनेची माहिती मिळताच नागपुरी गेट पोलीस, स्थानिक गुन्हे शाखेच्या दोन्ही पथकांनी घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन तत्कालीन पोलिस उपायुक्त श्याम घुगे यांनीही घटनास्थळी भेट दिली होती. तपासादरम्यान पोलिसांनी टप्प्याटप्प्याने ११ आरोपींना अटक केली. संघटित गुन्हेगारीचे स्वरूप लक्षात घेऊन सर्व आरोपींवर ☞(पान २ वर)

# मनपा आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले यांची पश्चिम प्रभागात पाहणी, - अधिकाऱ्यांना तातडीने कार्यवाहीचे निर्देश



**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील स्वच्छता व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी, पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर नाल्यांची साफसफाई वेळेत पूर्ण करण्यासाठी तसेच सार्वजनिक ठिकाणांवरील अतिक्रमण हटवून नागरिकांना सुरक्षित व स्वच्छ वातावरण उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने अमरावती महानगरपालिका आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले यांनी सोमवारी (दि. २७ जुलै) नागपुरी गेट परिसरात विविध ठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. यावेळी स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, नाल्यांची स्थिती, रस्त्यांची स्वच्छता, अतिक्रमणाची परिस्थिती तसेच विविध नागरी सुविधांचा आढावा घेऊन संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना तातडीने आवश्यक उपाययोजना राबविण्याचे निर्देश दिले. आयुक्तांनी पाहणीची सुरुवात नागपुरी गेट परिसरातून केली. परिसरातील मुख्य रस्ते, अंतर्गत मार्ग, सार्वजनिक ठिकाणे आणि नाल्यांची पाहणी करून साफसफाईची गुणवत्ता तपासली. पावसाळ्यात पाणी साचणार नाही यासाठी नाल्यांमधील गाळ व कचरा नियमितपणे काढण्यावर विशेष भर देण्याचे निर्देश त्यांनी दिले. नाल्यांमध्ये कचरा टाकणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याबरोबरच जनजागृतीही प्रभावीपणे राबविण्याच्या सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना केल्या.

यानंतर आयुक्तांनी नागपुरी गेट येथील महानगर ☞(पान २ वर)

# 'हेल्मेट घाला, जीव वाचवा'

## पोलिस आयुक्त राकेश ओला यांचे नागरिकांना आवाहन

### -१,५०० दुचाकीस्वारांवर कारवाई; पोलिसांसाठीही हेल्मेट सक्तीचे



**अमरावती/प्रतिनिधीः-** रस्ते अपघातांमधील मृत्यू व गंभीर दुखापतींचे प्रमाण कमी करण्यासाठी अमरावती शहर पोलिसांनी हेल्मेट सक्तीची मोहीम अधिक तीव्र केली आहे. 'हेल्मेट हा केवळ दंड टाळण्याचा मार्ग नसून, अपघाताच्या वेळी जीव वाचविणारे प्रभावी सुरक्षा कवच आहे,' असे प्रतिपादन पोलिस आयुक्त राकेश ओला यांनी सोमवारी केले. त्यांनी सर्व दुचाकीस्वारांना हेल्मेटचा नियमित वापर करून स्वतःचा आणि कुटुंबाचा जीव सुरक्षित ठेवण्याचे आवाहन केले.

शहरात हेल्मेट वापराबाबत जनजागृतीसाठी पोलिसांकडून विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. पोलिस आयुक्तांच्या निर्देशानंतर वाहतूक शाखेने नियमभंग करणाऱ्यांविरुद्ध विशेष मोहीम सुरू केली असून, २४ जुलैपासून आतापर्यंत हेल्मेटविना दुचाकी चालविणाऱ्या सुमारे १,५०० वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. ही मोहीम पुढेही सातत्याने सुरू राहणार असल्याचे पोलिस प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या पोलिसांनाही हेल्मेट वापरणे बंधनकारक करण्यात आले आहे. हेल्मेटशिवाय ☞(पान २ वर)

### हॉटेल व्यावसायिकाच्या घरातून

# ७ लाखांचा ऐवज लंपास

### -मसानगंज पोलीस चौकी परिसरातील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** नागपुरी गेट पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मसानगंज पोलीस चौकी परिसरात हॉटेल व्यावसायिकाच्या घरातून दिवसाढवळ्या सुमारे ७ लाख ६ हजार ९४४ रुपयांचा ऐवज चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी नागपुरी गेट पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मसानगंज परिसरात राहणारे हेमराज परसराम साहू (वय ५८) यांचे इतवारा बाजारात हॉटेल आहे. त्यांच्या पत्नी अमरनाथ यात्रेसाठी बाहेरगावी गेल्या असून, मुलेही पुण्याला होती. घरात केवळ ९० वर्षीय आई मनकीबाई होत्या. हेमराज साहू हे नेहमीप्रमाणे घराचा दरवाजा फक्त कडी लावून हॉटेलवर गेले होते.

सायंकाळी सुमारे ५ वाजता ते घरी परतले असता बेडरूममधील कपाटाला चावी लावलेली दिसली. कपाटाची पाहणी केली असता त्यातील १५.९०० ग्रॅम वजनाचे मंगळसूत्र ☞(पान २ वर)

# कंपनीविरुद्ध गुन्हा दाखल करण्याचे निर्देश

## काही दिवस सेंट्रल किचन बंद ठेवणार, -आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके



**टिटंबा आश्रमशाळा विषबाधा प्रकरण :**

**अमरावती/प्रतिनिधीः-** टिटंबा, ता. धारणी येथील शासकीय आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना झालेल्या संशयित विषबाधेच्या गंभीर घटनेची आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांनी दखल घेततली. त्यांनी तातडीने धारणी आणि टिटंबा येथे भेट देऊन संपूर्ण प्रकरणाचा आढावा घेतला. विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी कोणतीही तडजोड होऊ देणार नाही, असा ठाम निर्धार व्यक्त करत त्यांनी संबंधित कंपनीविरुद्ध गुन्हा दाखल करण्याचे निर्देश दिले. तसेच राज्यातील आदिवासी आश्रम शाळांमध्ये सुरू असलेली सेंट्रल किचन व्यवस्था पुढील काही दिवस बंद ठेवण्याची घोषणा केली.

शनिवारी टिटंबा आश्रम शाळेतील सुमारे ७० विद्यार्थ्यांना उलट्या, मळमळ व पोटदुखीचा त्रास झाल्यानंतर त्यांना धारणी उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. या घटनेची माहिती मिळताच आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक ☞(पान २ वर)

# नशामुक्त युवा फॉर विकसित भारत

## जिल्हास्तरीय स्पर्धेत सहभागाचे आवाहन

**अमरावती/प्रतिनिधीः-** युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालयाच्या 'माय भारत' उपक्रमांतर्गत 'नशामुक्त युवा फॉर विकसित भारत' अभियानांतर्गत विविध जिल्हास्तरीय स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धा गुरुवार, दि. ३० जुलै २०२६ रोजी सकाळी १० वाजता विद्याभारती महाविद्यालयात होणार आहे.

या अभियानाचा उद्देश युवकांमध्ये व्यसनमुक्तीबाबत जनजागृती निर्माण करणे, निरोगी जीवनशैलीला प्रोत्साहन देणे आणि 'विकसित भारत' उभारणीत युवाशक्तीचा सक्रिय सहभाग वाढविणे आहे.

स्पर्धांमध्ये सामूहिक लोकगीत, सामूहिक नृत्य, पथनाट्य, चित्रकला, लघुपट, रील निर्मिती, घोषवाक्य लेखन, मौखिक काव्य सादरीकरण आणि वक्तृत्व स्पर्धांचा समावेश आहे. सर्व स्पर्धांचे विषय व्यसनमुक्ती, निरोगी जीवनशैली आणि विकसित भारताशी संबंधित असतील. जिल्हास्तरीय स्पर्धांतील प्रथम क्रमांकाच्या विजेत्यांना राज्यस्तरीय स्पर्धेत जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळणार आहे. स्पर्धांमध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्या युवक-युवतींनी र्स्बुंदन्ग्ह या संकेतस्थळावर नोंदणी करून अधिक माहितीसाठी ☞(पान २ वर)

# महिलेच्या पोटातील १० किलोची गाठ काढली

## सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल अमरावती येथे यशस्वी शस्त्रक्रिया



अमरावती/प्रतिनिधीः- स्थानिक विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय (सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल), अमरावती येथे धारणी येथील ४३ वर्षीय महिलेच्या पोटातील तब्बल १० किलो वजनाची आणि ३०×२५ सें.मी. आकाराची अत्यंत गुंतागुंतीची गाठ यशस्वीरीत्या शस्त्रक्रियेद्वारे काढण्यात आली. आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अंतर्गत ही शस्त्रक्रिया रुग्णाला पूर्णपणे विनामूल्य करण्यात आली.

सदर महिला गेल्या वर्षभरापासून अधूनमधून होणाऱ्या पोटदुखीच्या त्रासाने ग्रस्त होती. प्राथमिक तपासणीत अल्ट्रासाऊंडद्वारे पोटात मोठी गाठ असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर करण्यात आलेल्या सीटी स्कॅनमध्ये ही गाठ अंडाशयाच्या भागातून निर्माण झाल्याचा संशय व्यक्त करण्यात आला. आवश्यक तपासण्या पूर्ण झाल्यानंतर तज्ज्ञ डॉक्टरांनी शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला.

शस्त्रक्रियेदरम्यान पोटात सुमारे ३०×२५ सें.मी. ☞(पान २ वर)

### शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त

# अंबादेवी मंदिरात शिवसेनेकडून महाआरती



**अमरावती/प्रतिनिधीः-** शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचा दिनांक २७ जुलै रोजी वाढदिवस असून त्यांच्या निरोगी आयुष्यासाठी व दीर्घायुष्यासाठी शिवसेना अमरावती महानगराच्यावतीने शिवसेना जिल्हाप्रमुख पराग गुडधे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये महानगरप्रमुख धीरज श्रीवास यांच्या नेतृत्वात अमरावती महानगराच्या वतीने अमरावती शहरातील अंबादेवी मंदिरात महाआरती करण्यात आली. शिवसेना पक्षावरील संकटे दूर होवो व उद्धव ठाकरे यांना दीर्घायुष्य लाभो ,उद्धव ठाकरे यांचा झंजावात संपूर्ण महाराष्ट्रभर झंझावात सुरू होऊन त्यांनी पुन्हा महाराष्ट्राचे ☞(पान २ वर)